यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.

# वार्तापत्र



**मा. यशवंतराव चव्हाण यांची २७ वी पुण्यतीथी.**
**त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.**

२५ नोव्हेंबर २०११

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार - २०१०

## गौरवार्थी ज्येष्ठ साहित्यिक महाश्वेतादेवी



**प्रदान समारंभ -१२ मार्च २०११.**

प्रकृती अस्वस्थ असल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांकडून पुरस्काराचा स्वीकार करण्यात आला. त्याप्रसंगी व्यासपीठावर प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. शरद पवार, न्यायमूर्ती मा. श्रीमती सुजाता मनोहर व प्रतिष्ठानचे पदाधिकारी




अध्यक्षीय भाषण करताना
मा. ना. शरद पवार व सन्माननीय व्यासपीठ




प्रास्ताविक करताना मा. सुप्रिया सुळे
व सन्माननीय व्यासपीठ

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. नं. एफ. १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. नं. एम.एम.एच./बी.ओ.एम.-५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.

## ⁂ विश्वस्त मंडळ सदस्य ⁂


| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. डॉ. रवींद्र बापट | उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. अरूण गुजराथी | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श.गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. मोहन धारिया | |
| ७. | मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर | |
| ८. | मा. श्री. हुसेन दलवाई | |
| ९. | मा. प्रा. पी. बी. पाटील | |
| १०. | मा. श्री. राम प्रधान | |
| ११. | मा. श्री. लक्ष्मण माने | |
| १२. | मा. श्री. वसंतराव कार्लेकर | |
| १३. | मा. सौ. सुप्रिया सुळे | |
| १४. | मा. श्री. दिलीप वळसे-पाटील | |
| १५. | मा. श्री. अजित निंबाळकर | |

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६. मा. श्री. नितीन करीर
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव

१७. मा. श्री. वि. ल. अचालिया
प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग


## ⁂ कार्यकारिणी मंडळ सदस्य ⁂


१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. डॉ. रवींद्र बापट
३. मा. श्री. अरूण गुजराथी
४. मा. श्री. श.गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धों. महानोर
९. मा. श्री. रा. सु. गवई
१०. मा. श्री. एन. के. पी. साळवे
११. मा. श्री. के. बी. आवाडे
१२. मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१३. मा. श्री. श्रीनिवास पाटील
१४. मा. सौ. सुप्रिया सुळे
१५. मा. श्री. अंकुशराव टोपे
१६. मा. श्री. अप्पासाहेब ऊर्फ सा. रे. पाटील
१७. मा. श्री. शामराव पा. पाटील
१८. मा. श्री. यशवंतराव गडाख - पाटील
१९. मा. श्री. चंद्रकांत घुले - पाटील
२०. मा. श्री. माणिकराव पाटील, अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पद्सिद्ध)
महाराष्ट्र शासन प्रतिनिधी
२१. मा. श्री. नितीन करीर
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव


## ⁂ कार्यकारी समिती ⁂


१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. डॉ. रवींद्र बापट
३. मा. श्री. अरूण गुजराथी
४. मा. श्री. श.गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. श्रीनिवास पाटील
७. मा. सौ. सुप्रिया सुळे
८. मा. श्री. अजित निबांळकर

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## विभागीय केंद्रे

| | | |
|---|---|---|
| विभागीय केंद्र, कऱ्हाड | अध्यक्ष | श्री. जयंत पाटील |
| विभागीय केंद्र, पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| विभागीय केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| विभागीय केंद्र, नाशिक | अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| विभागीय केंद्र, रत्नागिरी | अध्यक्ष | श्री. राजाभाऊ लिमये |
| विभागीय केंद्र, औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. नंदकिशोर कागलीवाल |
| विभागीय केंद्र, लातूर | अध्यक्ष | डॉ. जनार्दन वाघमारे |
| विभागीय केंद्र, अमरावती | अध्यक्ष | श्री. रा. सु. गवई |

## विविध उपक्रम

| | | |
|---|---|---|
| सृजन | संकल्पना व संयोजक | सौ. सुप्रिया सुळे |
| शिक्षण विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | प्रमुख संयोजक | डॉ. कुमुद बन्सल |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| | सहसंयोजक | श्री. विश्वास ठाकूर |
| अपंग हक्क विकास मंच | समन्वयक | श्री. विजय कान्हेकर |
| वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजक | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजक | श्रीमती ममता कानडे |
| कृषी व सहकार व्यासपीठ | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. म. बा. पवार |
| यशवंतराव चव्हाण सभागृह व कलादालन | व्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय | ग्रंथपाल | श्री. अनिल पाझारे |
| यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडीअर – श्री. सुशील गुप्तन |
| | मुख्य विपणन अधिकारी | श्री. विक्रम वासुदेव |

## मुख्य कार्यालय

| | | |
|---|---|---|
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | कार्यक्रम संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | प्रमुख लेखाधिकारी | श्री. महेश चव्हाण |
| मानद वास्तु विशारद | | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएटस |
| सांविधिक लेखा परिक्षक | | मे.सी.व्ही.के. असोसिएटस, मुंबई |
| अंतर्गत हिशोब तपासनीस | | मे. वैशंपायन आणि पाध्ये, चार्टर्ड अकाउन्टंट |

Website : www.ybchavanpratishthan.org E-mail: ybchavan@vsnl.com

# वार्तापत्र

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

वर्ष : पंधरावे ◆ अंक : २८ वा ◆ प्रकाशन : २५ नोव्हेंबर २०११ मा. यशवंतराव चव्हाण यांची २७वी पुण्यतिथी

◆

सल्लागार

**मा. शरद काळे**

**मा. रवींद्र बापट**

**मा. हेमंत टकले**

◆

मानद् संपादक

**दत्ता बाळसराफ**

◆

उपसंपादक

**सुरेश पाटील**

◆

विशेष सहाय्य

**अमृता मोरे**

**माधव सूर्यवंशी**

**रमेश सांगळे**

**अनिल पाझारे**

◆

सहाय्यक

**मीनल सावंत**

◆

**केंद्रातील सहकारी :**

संजय बनसोडे, अरूण शिंदे, विद्याधर खंडे, संगीता गवारे, प्रशांत राऊत, स्मिता रायकर, महेश चौधरी, राजेंद्र रूपवते, शोभा लोंढे, अनिल चिंदरकर, शमीम खान, सुहास बाभल, प्रियंका देसाई, विजय पां. नागरे, जयेश र. गुजराथी, विश्वदत्त मुळे, सुरेश कोठावळे, महादेव सगरे, सुरेश सावंत, अशोक जाधव, प्रकाश आंबेडकर, मंगेश शिंदे, सतिश लाड यांनी दिलेल्या सहकार्यबद्दल आभार

## *संपादकीय*

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या स्थापनेला गतवर्षी पंचवीस वर्ष पूर्ण झाली. स्थापनेनंतर सुरूवातीचा पाच वर्षाचा कालावधी निधी-संकलन, वास्तू उभारणी, भूमिका-धोरणांची आखणी, दैनंदिन कामकाजाचे नियोजन व व्यवस्थापन आदी बाबीमध्ये गेल्यानंतर पुढील दोन दशकात संस्थेच्या उद्दीष्टानुसार अनेक कार्यक्रम आणि उपक्रम हाती घेण्यात आले. पंचायत राज, पडिक भूमीविकास, सामाजिक न्याय, सहकार, शेती, कायदा, साहित्य, कला या क्षेत्रांमधील दिग्गजांच्या सहभागाने अनेक परिषदा व चर्चासत्रे संपन्न झाली. मौलिक प्रकाशने आणि उत्तम माहितीपट, लघुपटांची निर्मिती करण्यात आली. राष्ट्रीय व राज्य पातळीवरील विविध मान्यवरांना यशवंतरावजींच्या नावाने गौरविण्यात आले.

त्याच बरोबर युवा, महिला, बालके, ज्येष्ठ नागरिक, वंचित-उपेक्षित समाजघटक यांजसाठी विविध विभागांद्वारे कार्यक्रम हाती घेण्यात आले. याच काळात राज्यभरात अनेक विभागीय केंद्राची मान्यवरांच्या सहाय्याने उभारणी करण्यात आली. आज ती उत्तम रितीने सक्रीय झाली आहेत. जाणत्या व युवा पिढीच्या कार्यकर्त्यांचे जाळे महाराष्ट्रभर तयार झाले आहे. संस्थेबद्दल लोकांच्या मनात एक आपुलकीची भावना निर्माण झाली आहे.

पंचविशीचा टप्पा गाठत असतानाच संस्थेच्या कार्यात अनेक नव्या उपक्रमांची भर पडली आहे. अपंगाचे हक्क व विकास, शैक्षणिक गुणवत्ता, करिअर मार्गदर्शन, फेलोशिप, पर्यावरण संवर्धन, वाहतूक सुरक्षा, तंबाखूमुक्ती याबाबत नियमितपणे काम सुरु झाले आहे. स्त्री-भ्रूण हत्या प्रतिबंधासाठी 'जागर...' सारख्या महत्वपूर्ण उपक्रमाने राज्यात नवे वातावरण घडविले आहे. आणि अलीकडेच कुपोषणाच्या समस्येत लक्ष घालताना मेळघाटातही पाऊल टाकले आहे. रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेची परिणामकारकता व उपयुक्तता वाढविण्यासाठी या विषयांशी संबंधित यंत्रणा, संस्था, संघटना यांच्यासोबत संवाद सुरु आहे. या सर्व विषयांबाबत अधिक सखोल अभ्यासाची गरज लक्षात घेवून 'नवमहाराष्ट्र अभ्यास केंद्रा'चे कार्यही सुरु झाले आहे.

आगामी वर्षाच्या १२ मार्च पासून दिवंगत यशवंतराव चव्हाण साहेबांचे 'जन्मशताब्दी वर्ष' सुरु होईल. त्यांच्या विधायक, सर्जनशील, संयमित व्यक्तीमत्वाला साजेल, अशा रितीने ते साजरे करण्याचे आव्हान आपल्या सर्वांसमोरच आहे. महाराष्ट्र शासनही यानिमित्ताने अनेक कार्यक्रम करण्यात पुढाकार घेईलच. मात्र आपल्या संस्थेच्या होणाऱ्या अनेक उपक्रमाच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत यशवंतरावजींचे व्यक्तीत्व, विचार व कार्य पोहचविणे आवश्यक आहे. त्यातूनच 'नवा कार्यकर्ता' घडण्याची शक्यता आहे.

अलीकडेच प्रतिष्ठानचे संस्थापक सदस्य मा. बापूसाहेब खैरे, ज्येष्ठ सदस्य मा. बापूसाहेब काळदाते व आजीव सदस्य बी. बी. मोरे यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. प्रतिष्ठानच्या कार्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

मानद् सपांदक

# अनुक्रम...


- संपादकीय ............ ३
- राष्ट्ररचनेतील समाजसेवेचे महत्व-स्व. यशवंतराव चव्हाण ............ ५
- विशेष लेख-मा. शरदराव पवार ............ ८
- यशवंतराव चव्हाण विज्ञान-तंत्रज्ञान ............ १०
  राज्यस्तरीय पारितोषिक-२०११
  सन्मानपत्र

कार्यवृत्त

- नवमहाराष्ट्र युवा अभियान ............ १२
- अपंग हक्क विकास मंच ............ २२
- शिक्षण विकास मंच ............ २५
- सृजन, लोकसंवाद, चित्रपटचावडी ............ २८
- वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान ............ २९
- वाहतूक सुरक्षा अभियान ............ ३२
- कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम ............ ३३
- महाराष्ट्र महिला व्यासपीठ ............ ३६
- यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय ............ ३८

विभागीय केंद्र कार्यवृत्त

- विभागीय केंद्र, रत्नागिरी ............ ४२
- विभागीय केंद्र, नागपूर ............ ४७
- विभागीय केंद्र, औरंगाबाद ............ ५२
- विभागीय केंद्र, पुणे ............ ५६
- विभागीय केंद्र, कराड ............ ६२
- विभागीय केंद्र, नाशिक ............ ६५
- विभागीय केंद्र, लातूर ............ ७१
- माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी ............ ७६


अक्षरजुळणी आणि छपाई : हे त्रैमासिक मुद्रक-प्रकाशक-संपादक श्री दत्ता बाळसराफ यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई करिता, प्रिन्टोग्राफी सिस्टम (इं.) प्रा.लि., २८ मुंबई समाचार मार्ग, राजाबहादूर बिल्डींग, फोर्ट, मुबंई-४०० ०२३. फोन नं.: ४०७८ ५६५६ येथे छापून यशवंतराव चव्हाण केंद्र, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - २१ येथे प्रकाशित केले. नोंदणी क्रं. ७१५८७/९९

# राष्ट्ररचनेतील समाजसेवेचे महत्त्व

– स्व. यशवंतराव चव्हाण

आज येथें उपस्थित असलेल्या आपल्यासारख्या श्रोत्यांसमोर भाषण करणें यांत माझा गौरव होत असून मला ही संधि प्राप्त करून दिल्याबद्दल मी प्रोग्रेसिव्ह ग्रुपचे आभार मानतो.

आज मी आपणांसमोर 'समाजसेवेचे' राष्ट्ररचनेच्या कार्यांतील स्थान 'या विषयावर बोलणार आहे. वास्तविक हा विषय असा आहे की, या बाबतीत बोलण्यापेक्षा कृतीचीच जास्त आवश्यकता आहे. परंतु आपण आज ज्या महान प्रगतीच्या कार्यात गुंतलो आहोंत त्यांत समाजसेवेला फार महत्त्वाची भूमिका पार पाडावयाची आहे, ही वस्तुस्थिति लक्षांत घेऊनच आजच्या भाषणासाठी या विषयाची मी मुद्दाम निवड केली.

आपल्या देशांत समाजसेवेला अमर्याद वाव आहे. ही गोष्ट अर्थात् आपणांस भूषणावह वाटावी अशी नाही. कारण याचा अर्थ असा आहे की, आपल्या समाजांतील बहुसंख्य लोकांना जीवनांतील सुखसोयी अद्याप उपलब्धच झालेल्या नाहींत किंवा जेथे त्या उपलब्ध असतील तिथे त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. ज्या समाजांत आर्थिक व सामाजिक दृष्ट्या सर्व लोक समान पातळीवर असतात आणि ज्याला आपण समाजसेवा म्हणतों तिच्या मदतीशिवाय जीवनांतील सर्व उपलब्ध सुखसोयींचा जिथें सर्वांना सारख्या प्रमाणांत उपभोग घेता येतो, अशा प्रकारच्या समाजव्यवस्थेस आदर्श समाजव्यवस्था म्हणतां येईल, असे आदर्श समाज अर्थात् फारच थोडे असूं शकतील. परंतु दीर्घकाळ मागासलेल्या व अविकसित स्थितींत असलेल्या, आणि जुन्या धार्मिक रूढींचे व परंपरेचे ओझे सतत वाहणाऱ्या आपल्या या देशांत अलीकडच्या काळापर्यंत योजनाबद्ध अर्थव्यवस्थेचा मागमुसही नव्हता. त्यामुळें तेथे तीव्र आर्थिक व सामाजिक विषमता निर्माण होणे अगदी अपरिहार्य आहे. ही विषमता दूर करण्याचे काम लहानसहान नसून त्यासाठी शासनाकडून, समाजसंस्थांकडून व सामाजिक कार्यकर्त्यांकडून भरीव आणि सुसूत्र असे प्रयत्न व्हावयास पाहिजेत.

या ठिकाणीं असा एक प्रश्न उपस्थित होतो की सामाजिक संस्था व समाजसेवक यांच्याकडून अपेक्षित असलेले समाजसेवेचे हे कार्य, सर्व प्रकारची साधनसामुग्री आणि सत्ता हाती असणाऱ्या सरकारनेंच आपल्या शिरावर कां घेऊं नये? ज्या मूलभूत तत्वप्रणालीनुसार समाजव्यवस्था निर्माण करण्याचें आपले ध्येय आहे त्या तत्त्वप्रणालीशींच हा प्रश्न निगडित आहे. समाजवादी समाजव्यवस्था निर्माण करण्याचे आपले ध्येय आपण बुद्धिपुरःसर व पूर्ण विचारांतीच स्विकारले आहे. काही टीकाकार म्हणतात त्याप्रमाणे निर्भेळ समाजवादाचे स्वरूप सोयिस्करपणे बदलण्याचा किंवा त्याची गति मंद करण्याचा हा प्रयत्न नाही. सरकारने सेवेची आणि सुधारणेची सर्वच कामे आपल्या हाती घेतली तर ते हुकूमशाहीचेच राज्य बनेल. हुकूमशाहीत समाजात खरे म्हणा किंवा काल्पनिक म्हणा जे अन्याय व गैरव्यवस्था असेल ती दूर करण्याचे आणि आपल्याला पाहिजे तशी रचना करण्याचे सरकारला कर्तुमकर्तुम् अधिकार असतात. अशा प्रकारच्या समाजव्यवस्थेत स्वतंत्रपणे समाजकल्याणाचे कार्य करणारी संस्था अस्तित्वांत राहू शकत नाही. परंतु आपण यापेक्षा निराळ्या अशा लोकशाही मार्गाचा स्विकार केला आहे. त्यामुळे आपल्या समाजांत लोकसेवेचे काम करणाऱ्या व्यक्तींना व संस्थांना समाजसुधारणेचे व अन्याय निवारण्याचे कार्य नेहमीच पुढाकार घेऊन करता येईल व त्यासाठी त्यांना भरपूर वावही मिळेल. अशा रीतीने समता व सामाजिक न्याय यांवर आधारलेली नवीन समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या कामी त्यांना हातभार लावतां येईल. सरकारला अर्थातच या कार्यापासून अलिप्त राहतां येणार नाही किंवा त्यासंबंधी अनास्थाही दाखविता येणार नाही. समाजसेवा करणाऱ्या संस्थांच्या पाठीशी राहून सरकार त्यांना सर्व प्रकारचे सक्रिय साहाय्य करील. खरे म्हणजे आपल्या देशामध्ये याच पद्धतीनें समाजसेवेचे कार्य व्हावे यासाठी आमचा प्रयत्न आहे.

सुदैवाने या देशाला समाजसेवेची प्रदीर्घ परंपरा आहे. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरचा व विसाव्या शतकाच्या सुरुवातीचा असा जो पन्नास वर्षांचा काळ आहे त्या काळांत सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रांत सुधारणा घडवून

आणण्यासाठी या देशांत एक महान् चळवळ झाली. महाराष्ट्रामध्यें ज्योतिबा फुले, न्या. रानडे, डॉ. भांडारकर, आगरकर, गोखले यांच्यासारख्या अनेक समाजसुधारकांनी प्रस्थापित हितसंबंधाच्या प्रखर विरोधास तोंड देऊन व प्रसंगी त्यांचे वैमनस्यही पत्करून आपल्या ध्येयसिद्धीसाठी सतत कार्य केले. या समाजसुधारकांनी केलेल्या कार्याचे या ठिकाणी मूल्यमापन करण्याचा माझा इरादा नाही. परंतु समाजाच्या भौतिक, नैतिक व वैचारिक प्रगतिवर या सुधारकांचा फार मोठा प्रभाव पडला आहे, एवढेच मी येथे सांगितले तरी ते पुरेसें आहे. तथापि, समाजसुधारणा व समाजसेवा यांमध्ये फरक असून हा फरक आपणांस कदाचित सूक्ष्म अगर तात्त्विक स्वरूपाचा वाटेल. जीवनाच्या एकंदर पद्धतीलाच एक नवीन वैचारिक आशय देऊन तिच्यात बदल घडवून आणणे हे समाजसुधारणेचे उद्दिष्ट असते, तर समाजसेवा ही जीवनाच्या काही व्यवहार्य अंगापुरतीच मर्यादित असून, व्यक्तिगत किंवा व्यक्तिसमूहाचे दुःख किंवा त्यांच्या अडचणी दूर करण्याचा हेतु तिच्या मुळाशी असतो. सामाजिक सुधारणा घडवून आणणें हे जनमताचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांचे कार्य असते तर समाजसेवा करण्यासाठी योग्य प्रकारे शिक्षण घेतलेल्या माणसांची जरूरी असते. यामध्ये व्यावसायिक समाजसेवकांचाही समावेश करता येईल. या दोहोंमधील विभाजक रेषा अर्थात् अतिसूक्ष्म असते हे खरे आहे. कारण महात्मा फुले हे महान समाजसुधारकही होते व त्याचबरोबर ते निष्ठावंत समाजसेवकही होते. तथापि हा फरक आपण स्पष्टपणे लक्षात घ्यावयास पाहिजे. कारण समाजसेवेची जी पद्धत आपल्याला निर्माण करावयाची आहे ती त्यामुळे आपणांस नीटपणे समजू शकेल व तिच्यामध्ये समाजसेवकांचे स्थान कोणते आहे हेही आपल्या लक्षात येईल.

मी आतांच सांगितल्याप्रमाणे आपले प्रश्न अनेकविध असून ते सोडविण्याच्या कामी समाजसेवक यथाशक्ति हातभार लावू शकतील. या प्रश्नांचे स्थूल मानाने मी दोन प्रकार करतो. पहिल्या प्रकारांत हालअपेष्टा व सामाजिक अन्याय यांची झळ ज्यांना लागली आहे अशाना मदत देण्यासंबंधीचे प्रश्न येतात, तर दुसऱ्या प्रकारांत विकास कार्याशी संबंधित असलेल्या प्रश्नांचा समावेश होतो. पहिल्या प्रकारांत मुख्यतः शारीरिक दृष्ट्या अपंग असलेले, भिकारी, बालगुन्हेगार, वेश्या, स्त्रियांचा अनैतिक व्यापार करणारे व अमली पदार्थांचे सेवन करणारे व्यसनी लोक यांच्या प्रश्नांचा आणि त्याचप्रमाणे हरिजन, गिरिजन व माजी गुन्हेगार यांसारख्या समाजांतील सर्वसाधारण हक्कांपासून वंचित झालेल्या दलित लोकांच्या उद्धारासंबंधीच्या प्रश्नांचा समावेश होतो, तर दुसऱ्या प्रकारात बालक व युवक कल्याण, ग्रामीण पुनर्रचना, समाजविकास, कुटुंबनियोजन वगैरे प्रश्नांचा अंतर्भाव होतो.

समाजकल्याणाचे ध्येय स्विकारल्यानंतर मी आतांच ज्यांचा उल्लेख केला त्या समाजसेवेच्या निरनिराळ्या क्षेत्रात सरकार जोमाने कार्य करीत आहे. पूर्वी शिक्षण व सार्वजनिक आरोग्य या दोन क्षेत्रांपुरतेच सरकारचे कल्याणकारी कार्य, बहुतांशी मर्यादित होते. पण आतां इतर अनेक क्षेत्रांत हे कार्य सुरू करण्यांत आलेले आहे. १९५३ साली स्थापन झालेले मध्यवर्ती समाजकल्याण मंडळ आणि त्यानंतर राज्यांमध्ये स्थापन झालेल्या त्याच्या शाखा हा कल्याणकारी ध्येयाच्या मार्गावरील एक महत्त्वाचा असा टप्पा आहे. खाजगी सामाजिक संस्थांना आर्थिक आणि इतर प्रकारचे साहाय्य देऊन आणि त्याचबरोबर विविध प्रकारच्या समाजसेवेत गुंतलेल्या संस्थांच्या कार्यात एकसूत्रीपणा आणून समाजकल्याण मंडळाने समाजकल्याणाच्या कार्यात एक प्रकारचा पद्धतशीरपणा आणला आहे. याशिवाय निरनिराळी सरकारी खाती सुद्धा, थोड्याफार प्रमाणात समाजकल्याणविषयक कार्य करीत असतात.

आज अनेक खाजगी संस्था स्वयंस्फूर्तीने अतिशय उपयुक्त असे सामाजिक कार्य करीत आहेत. यांपैकी कांही संस्थांनी आघाडीवर राहून जे कार्य केले आहे, त्याबद्दल आपल्या राज्याने खरोखर अभिमान बाळगावा इतके तें महत्त्वाचे आहे. स्त्रियांच्या, विशेषतः विधवा व मागासलेल्या वर्गांतील स्त्रियांच्या कल्याणाकरतां कार्य करीत असलेली हिंगणे स्त्री-शिक्षण संस्था, ग्रामीण शिक्षणक्षेत्रांत कार्य करीत असलेली रयत शिक्षण संस्था, सामाजिक प्रश्नांचे शास्त्रीय रित्या संशोधन करण्यात गुंतलेली टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस यांचा त्या त्या क्षेत्रांत प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. याशिवाय जनतेच्या सामाजिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्याचे बहुमोल असें कार्य आज इतर अनेक संस्था करीत आहेत.

तथापि, निरनिराळ्या क्षेत्रांत सरकारी व बिनसरकारी संस्थांकडून होत असलेले कार्य जमेस धरून सुद्धां, कल्याणकारी राज्याचे आपले उद्दिष्ट गाठण्यासाठी आपणांस अद्यापि बरीच मजल मारावयाची आहे. या दोन्ही प्रकारच्या संस्थांमध्ये योग्य प्रकारचे सहकार्य व सुसूत्रता आणण्याची आज अतिशय गरज आहे. कार्य-निपुणतेच्या दृष्टीने समाजसेवेच्या कार्याचे आपण

निरनिराळे भाग करतो. तथापि सामाजिक प्रश्नांना असे स्वतंत्र अस्तित्व असूं शकत नाही. एकाच सामाजिक परिस्थितीमधून ते निर्माण झालेले असल्यामुळे ते एकमेकांवर अवलंबून असतात. तेव्हा ते सोडविण्याच्या आपल्या प्रयत्नांमध्ये एकसूत्रता असावयास पाहिजे आणि ही एकसूत्रता केवळ माहितीची देवाणघेवाण करण्यापुरतीच असावयास पाहिजे आणि ही एकसूत्रता केवळ माहितीची देवाणघेवाण करण्यापुरतीच मर्यादित न राहता त्याची व्याप्ति पुष्कळ वाढली पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या सामाजिक प्रश्नांचे विशाल व गुंतागुंतीचे स्वरूप लक्षांत घेतां, अशा प्रकारचे समाजसेवेचे कार्य हाती घेण्याकरितां अधिकाधिक संघटना व संस्था पुढे यावयास पाहिजेत. त्या तशा येतील अशी आपण आशा करू या.

सामाजिक कार्य शास्त्रोक्त पद्धतीने केले तर ते अधिक परिणामकारक होते आणि त्याकरिता आवश्यक ती सर्व माहिति व त्यासंबंधीची आकडेवारी आपल्याजवळ असावी लागते. आकडेवारी गोळा करणे हे एक मोठे किचकट काम असून ते अत्यंत काळजीपूर्वक व बारकाईने करावे लागते. विद्यापीठे, महाविद्यालये व इत्तर शैक्षणिक संस्था हे कार्य हाती घेऊ शकतील. क्रीडामंडळे, गायन, समाज, कलाकेंद्रे वगैरेसारख्या सामाजिक संघटनांना अल्पबचत मोहिमेत भाग घेता येईल, तर महिला मंडळांना कुटुंबनियोजनाचे कार्य उत्कृष्ट रीतीने करता येईल. आजही अनेक संघटना या सर्व क्षेत्रांत उत्तम प्रकारचे कार्य करीत आहेत. परंतु यापेक्षांही अधिक संस्थांनी पुढे येऊन या महान राष्ट्रीय कार्याला आपला हातभार लावला पाहिजे.

काही लोकांनी अशी एक समजूत करून घेतलेली दिसते की, देशांत अमलात येत असलेल्या विकासविषयक कार्यक्रमाची जबाबदारी सर्वस्वी सरकारचीच आहे. परंतु ही समजूत आपल्या नियोजनाच्या उद्दिष्टाशीं सर्वस्वी विसंगत आहे. अधिक व्यापक दृष्टिकोनांतून पाहिल्यास आपणांस असे दिसून येईल की, सरकार अधिकारावर येते आणि जाते तर विकासकार्य ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. हे विकासकार्य म्हणजे नवी समाजरचना नर्माण करण्याचे प्रयत्न होत आणि म्हणून त्यांत पक्षीय किंवा जातीय विचारांना थारा असतां कामा नये. लोकशाहीमधल्या नियोजनाच्या या महान आणि एका अर्थाने अद्वितीय अशा प्रयोगांत, सरकारी कार्याइतकेच, किंबहुना त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाचे स्थान सामाजिक कार्याला असते. या बाबतीत जर आपण अयशस्वी झालो तर लोकशाही पद्धतीच्या नियोजनाचा आपला दावाच खोटा ठरेल. लोकशाही पद्धतीच्या नियोजनांत कार्यपद्धतीच्या दृष्टीने काही उणीवा असू शकतील. परंतु मानव हा या नियोजनाचा केंद्रबिंदु असल्याने या उणिवांची एका अर्थाने भरपाई होते. यालाच आपल्या नियोजनाची मानवी अथवा नैतिक बाजू असे म्हणता येईल. हा मानवी दृष्टिकोन जर आपल्या नजरेआड झाला तर योजनेचे मूळ उद्दिष्टच नष्ट होईल. हा धोका टाळण्यासाठी नियोजनांतील समाजकार्यावर आपणांस जास्तीत जास्त भर द्यावयास पाहिजे आणि त्याचबरोबर, नियोजनांत या कार्याला भरपूर वाव मिळतो आहे किंवा नाही हेही आपण पाहिले पाहिजे. अशा प्रकारची शाश्वती आपण देऊ शकलो तर ज्या नव्या समाजव्यवस्थेचे स्वप्न आपण अनेक दिवस आपल्या उराशी बाळगले आहे, तिची उभारणी आपण भक्कम पायावर करू शकू. मला खात्री आहे की, पुरोगामी कल्पना व ध्येये यांचा पुरस्कार करणारी प्रोग्रेसिव्ह ग्रुप ही आपली संस्था या राष्ट्रीय प्रयत्नांस आपला नैतिक पाठिंबा व सक्रिय साहाय्य देईल.

माझे भाषण संपविण्यापूर्वी, सर्वांच्या अतिशय जिव्हाळ्याच्या अशा या विषयावर माझे विचार व्यक्त करण्याची आपण मला संधी दिलीत त्याबद्दल ग्रुपचे मी पुन्हा एकदां आभार मानतो.

**– प्रोग्रेसिव्ह ग्रुप**
**मुंबई, दि. ११ ऑगस्ट १९६०**
**'सह्याद्रीचे वारे' या ग्रंथातून साभार**

❑❑❑

# बापूसाहेब काळदाते : निरलस राजकारणी, उत्तम संसदपटू

– शरद पवार

> **सार्वजनिक जीवनात बापूसाहेबांसारखा निर्मळ मित्र, स्वच्छ राजकारणी, कौटुंबिक सलोखा जपणारा सहकारी मिळणे दुर्मिळ. ते उत्तम संसदपटू होते. सामाजिक आणि शैक्षणिक कार्यात निरलस वृत्तीने काम करणारे बापूसाहेब म्हणजे सार्वजनिक क्षेत्रात कार्य करु इच्छिणाऱ्यांसाठी एक दीपस्तंभच...**
>
> **मा. शरद पवार**

बापूसाहेबांच्या निधनाचे वृत्त समजले. अलीकडे झालेल्या आम्हा उभयतांच्या भेटीत त्यांच्या प्रकृतीचा अंदाज आला होता. उपचारासाठी त्यांना मुंबईत आणले होते. माझा वाढदिवस १२ डिसेंबर व माझ्या पत्नीचा १३ डिसेंबर आहे. बापू मुंबईत हॉस्पिटलमध्ये होते. १२ नोव्हेंबरला मला व प्रतिभाला उभयताच्या वाढदिवसासाठी, १२ व १३ डिसेंबरसाठी अभीष्टचिंतनाचे पत्र बापूसाहेबांकडून आले. त्यांनी हे पत्र महिनाभर आधीच का पाठविले याचा मी विचार करत होतो. १२ डिसेंबरपूर्वी बापूसाहेब निघून गेले. कदाचित आपण नसू याचा अंदाज व खात्री त्यांना असावी. म्हणून जाण्यापूर्वीच आम्हा उभयतांचे त्यांनी अभीष्टचिंतन केले असावे.

१९७६ मध्ये मी बारामती व बापूसाहेब लातूरहून दोघेही महाराष्ट्र विधानसभेत आलो. बापूसाहेबांनी राज्याचे सहकारमंत्री केशवराव सोनावणे यांचा पराभव केला होता. मी सुद्धा एका साखर कारखान्याच्या धनाढ्याचा पराभव केला होता. मी सत्ताधारी काँग्रेस पक्षाचा सदस्य, तर बापूसाहेब विरोधी समाजवादी पक्षाचे सदस्य. पण आमची मैत्री विधिमंडळाच्या पहिल्या अधिवेशनातच झाली. बापूसाहेब उत्तम वक्ते होते. फार थोड्या कालावधीत वैधानिक कार्यात त्यांना मान्यता मिळाली. विधानसभेचे अधिवेशन असो किंवा राष्ट्रकुल संसदीय दलाची बैठक असो, मी आणि बापूसाहेब कायम बरोबर असायचो. पुढील निवडणुकीत बापूसाहेबांनी मतदारसंघ बदलला मात्र, त्यांना त्या निवडणुकीत यश आले नाही. त्यांच्याविरुद्ध अंबाजोगाई पंचायत समितीचे सभापती बाबूराव आडसकर यांनी निवडणूक लढविली. बापूसाहेब उत्तम वक्ते असल्याने त्यांच्या भाषणाला उपस्थिती चांगली असायची. पण मतदारसंघातील विकासाची कामे करण्याचा अधिकार पंचायत समितीच्या सभापतींकडे असायचा. त्याचा फायदा श्री. आडसकरांना झाला. कोणत्याही खेड्यात गेले की श्री. आडसकर लोकांना विचारायचे आणि जाणवून द्यायचे. ''तुझ्या गावचा रस्ता कोणी केला? म्या केला. तुझ्या गावाला पाणी कोणी दिले? म्या दिलं. ही प्रचाराची पध्दत. ''कामाला मत द्यायचे की उत्तम भाषणाला मत द्यायचे?'' ''उत्तम भाषण ऐकावयाचे असल्यास बापूसाहेबांचे भाषण मी गणपती उत्सवात ठेवीन. सबब मला मत द्या!'' अशा श्री. आडसकरांच्या प्रचाराच्या गमती बापूसाहेब आम्हाला हसून सांगायचे.

१९७५ मध्ये देशात आणीबाणी जाहिर झाली. बापूसाहेबांनी जयप्रकाशजींच्या आंदोलनात पुढाकार घेतला होता. त्यांना अटक होऊन १९ महिने कारावासाची शिक्षा झाली. आणीबाणी संपली, बापूसाहेबांची सुटका झाली. जनता पक्षाची स्थापना झाली. सर्व आणीबाणीविरोधक जनता पक्षात एकत्र आले. बापूसाहेबांनी औरंगाबादमधून लोकसभेची निवडणूक लढवून मोठ्या मताधिक्याने जिंकली. बापूसाहेब दिल्लीला आले. जनता पक्षाच्या नेतृत्वाची जबाबदारी चंद्रशेखर यांच्याकडे देण्यात आली होती. मोरारजीभाई देसाईंच्या नेतृत्वाखाली सरकार केंद्रात आले. बापूसाहेबांना केंद्रीय मंत्रिमंडळात संधी मिळण्याची परिस्थिती होती, पण बापूसाहेबांनी मात्र चंद्रशेखर यांच्याबरोबर जनता पक्षाच्या सरचिटणीसपदाची जबाबदारी घेणे पसंत केले. पुढे राज्यसभेत बापूसाहेब आले, तेथेही उत्तम संसदपटू म्हणून त्यांचा लौकिक झाला.

बापूसाहेबांचा पिंड राष्ट्र सेवादलाच्या सैनिकाचा. सुरुवातीच्या काळात बिहारला जाऊन जयप्रकाशजींबरोबर त्यांनी काम केले. महाराष्ट्र राष्ट्र सेवादलाचे नेतृत्व अनेक वर्षे त्यांनी केले. १९८० मध्ये आम्ही मंडळींनी काढलेली जळगाव

ते नागपूर शेतकरी दिंडी असो, की चंद्रशेखर यांची भारत यात्रा असो, कोठेही सामान्य माणसाच्या प्रश्नासाठी संघर्ष वा कार्यक्रम यामध्ये बापूसाहेबांचा सक्रीय सहभाग होता. एस.एम. जोशी हे बापूसाहेबांचे श्रद्धास्थान. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या वेळी नामांतराला पाठिंबा दिल्याने बापूसाहेबांना फार यातना सहन कराव्या लागल्या, त्याची बापूसाहेबांनी कधीही खंत बाळगली नाही. परंतु औरंगाबादला एस.एम. जोशींना यातना सहन कराव्या लागल्या, याचे दु:ख बापूसाहेबांना झाले. पुढे दिल्लीमध्ये संसदीय काम, पक्षाचे संघटनात्मक काम करताना बापूसाहेब मराठवाडा विकासाच्या चळवळीत गोविंदभाई श्रॉफ, अनंत भालेराव यांच्या समवेत राहिले. पण या चळवळीच्या काळात महाराष्ट्राच्या ऐक्याच्या संदर्भात मात्र कधीही तडजोड केली नाही.

दलित, शोषितांवरील अत्याचाराचे किंवा अधिकाराचे प्रश्न असोत, अशात बापूसाहेबांनी कधीही माघार घेतली नाही. राजकीय, सामाजिक चळवळीसाठी त्यांनी आयुष्याचा फार कालावधी घालवला. अखेरच्या काळात सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या कामाला वाहून घेतले. राज्यातील सर्व थरांतील शैक्षणिक प्रश्नांकडे त्यांनी लक्ष दिले. एक उत्तम सहृदयी मित्र, जीवाभावाचा सहकारी म्हणून बापूसाहेब आम्हा सहकाऱ्यांबरोबर होते. आम्हा दोघांचा पंचेचाळीस वर्षाचा स्नेहभाव होता. आम्हा दोघांचेही श्रद्धास्थान म्हणजे यशवंतरावजी चव्हाण व एस.एम. जोशी. एस.एम. जोशी यांच्या निधनानंतर बापूसाहेब फारच हळवे झाले. एस.एम. नाहीत हे त्यांना पटतच नव्हते. किशोर पवार, भाई वैद्य, मृणालताई गोरे अशांची संगत म्हणजे बापूसाहेबांचे टॉनिक होते. अखेरपर्यंत या सहकारी मित्रांच्या सार्वजनिक कामात रमत होते. सार्वजनिक जीवनात बापूंसारखा निर्मळ मित्र, स्वच्छ राजकारणी कौटुंबिक सलोखा जपणारा सहकारी मिळणे दुर्मीळ, सुधाताई व मुलींच्या दु:खाला कसा आवर घालावा, हे काही समजत नाही.

**(दैनिक सकाळ मधून साभार)**

**दि. १८ नोव्हेंबर २०११**

❑❑❑

## विनम्र अभिवादन.

देशात आणि महाराष्ट्रात पुरोगामी विचारवंत आणि संसदपटू आणि गरीब-कष्टकरी जनतेचे नेते म्हणून ओळखले जाणारे दिवंगत बापूसाहेब काळदाते हे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे कार्यकारिणी मंडळाचे सदस्य होते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वाटचालीत त्यांचे मार्गदर्शन व सल्ला यांचे महत्वाचे योगदान आहे. नुकतेच त्यांचे १७ नोव्हेंबर २०११ रोजी औरंगाबाद येथे निधन झाले. त्यांच्या स्मृतीस आमचे विनम्र अभिवादन !

# यशवंतराव चव्हाण विज्ञान-तंत्रज्ञान राज्यस्तरीय पारितोषिक २०११
## मराठी विज्ञान परिषद
### सन्मानपत्र

आजचे युग हे विज्ञान व तंत्रज्ञानाचे आहे. मानवी इतिहासात एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत भौतिक शास्त्रात जेवढी प्रगती झाली होती, त्यापेक्षा जास्त प्रगती फक्त विसाव्या शतकात झाली असे विज्ञान इतिहासकार सांगतात. अशाच वेगाने विज्ञान पुढे जात राहिले व तंत्रज्ञानही तितक्याच वेगाने साथ देत राहिले तर एकविसाव्या शतकात सामान्य माणसाचे जीवन ओळखू नये इतके बदललेले असेल. सुप्रसिध्द शास्त्रज्ञ जे. बी. एस. हाल्डेन यांनी असे म्हटले होते की, विश्व आपण तर्क करतो त्यापेक्षा फार विचित्र आहेच, ते आपण जेवढा तर्क करु शकतो त्याहीपेक्षा विचित्र आहे.

विज्ञान सातत्याने या 'विचित्र' विश्वातील अणुरेणूच्या अंतरंगाचा व वेगाने विस्तार पावणाऱ्या ब्रह्मांडाचा वेध घेत असते व त्या पाठोपाठ तंत्रज्ञानही नवनवीन साधनांनी पूर्वी अशक्य कोटीत असलेली कृती सहजसुलभ करून टाकते. अर्थात जे घडते ते सर्व समाजाच्या हिताचे ठरते असे नाही. विज्ञान व तंत्रज्ञानातील बदलाच्या झंजावाताने व्यक्ती, कुटुंब, समूह, राष्ट्रे व त्यांचे आपापसातील संबंध यावर नेमका काय परिणाम होईल याचा आज अंदाज बांधणेही शक्य नाही. तथापि मानवी समाजाला आपल्या व्यापक हितासाठी विज्ञानाची व तंत्रज्ञानाची नवीन वळणे व वाटा यांची माहिती करून घेणे अनिवार्य आहे. भारतीय संविधानानुसार वैज्ञानिक वृत्तीची जोपासना करणे हे प्रत्येक नागरिकाचे मूलभूत कर्तव्य आहे. या पार्श्वभूमीवर विज्ञानशिक्षण व विज्ञानप्रसार तसेच वैज्ञानिक दृष्टी व पध्दती यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

'विज्ञानम् जनहिताय' हे ब्रीदवाक्य समोर ठेवून गेली ४५ वर्षे मराठी विज्ञान परिषद सातत्याने आणि निष्ठेने मराठी भाषेतून विज्ञानशिक्षण व विज्ञानप्रसाराचे महत्त्वाचे कार्य करीत आहे. या संस्थेची अनौपचारिक सुरुवात १९६३ मध्ये झाली. त्यावेळी मुंबई मराठी साहित्य संघात शास्त्रीय साहित्य समितीची स्थापना झाली. त्यानंतर २४ एप्रिल १९६६ रोजी साहित्य संघाच्या वास्तूत बोलाविलेल्या सभेला सुमारे १०० लोक उपस्थित होते. याच सभेत श्री.म.ना.गोगटे यांच्या पुढाकाराने व नामवंत डॉ.रा.वि.साठे, प्रख्यात अभियंते श्री.बाधे यांच्या सारख्या तज्ञांच्या सहकार्याने 'मराठी विज्ञान परिषद' या संस्थेची स्थापना करण्याचा ठराव संमत झाला. परिषदेची घटना, चिन्ह, रीतसर नोंदणी इत्यादी औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर मराठी विज्ञान परिषदेने केलेला पहिला कार्यक्रम म्हणजे डिसेंबर १९६६ मध्ये मुंबई येथे भरविलेले पहिले मराठी विज्ञान संमेलन.

जानेवारी १९६७ पासून सुरु झालेला महत्त्वाचा उपक्रम म्हणजे मराठी विज्ञान परिषद पत्रिका हे विज्ञान विषयक मासिक. सुरुवातीला परिषदेचे मुखपत्र या स्वरूपात असलेले हे मासिक आता जिज्ञासू वाचकांमध्ये आपले स्थान निर्माण करुन सुप्रतिष्ठित झाले आहे. 'पत्रिका' या सुटसुटीत नावाने ओळखल्या जाणाऱ्या मासिकाला सुमारे पाच हजार वर्गणीदार आहेत. 'पत्रिका' हे विज्ञान प्रसाराचे एक महत्त्वपूर्ण साधन आहे. या त्यावेळी प्रस्तुत असलेल्या विषयांवर सविस्तर माहिती, विज्ञान संशोधनाची अद्ययावत् माहिती देणारी सदरे, दैनंदिन जीवनाशी निगडीत विज्ञान विषयक लेख, विज्ञान विषयक पुस्तकांचे परीक्षण, विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल निर्माण करणारी कोडी यांचा समावेश असलेला 'पत्रिके'चा अंक म्हणजे घरोघरी जाणारा विज्ञानदूत आहे.

विज्ञान विषयक तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित करुन समाजातील विविध वर्गांमध्ये त्या त्या विषयावर शास्त्रशुद्ध माहिती देऊन परिषदेमार्फत जागृती केली जाते. विशेषतः तरुण वर्गाने विज्ञान संशोधनाकडे वळावे हा संदेश विस्तृत प्रमाणात विद्यार्थी व शिक्षकांपर्यंत परिषदेने पोहोचविला आहे.

विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम परिषदेमार्फत घेतले जातात-यामध्ये विविध प्रकारचे प्रायोगिक मेळावे, विज्ञान खेळणी, शिबीरे, पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांकरिता 'बालोद्योग' या नावाने केले जाणारे छोटे वैज्ञानिक प्रयोग, पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांकरिता घेतले जाणारे 'संकल्पना विकसन अभ्यासक्रम,' शालेय विज्ञान मंडळे, शैक्षणिक सहली, बाल विज्ञान संमेलन व विज्ञान परीक्षा यांचा प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे. त्याशिवाय समाजातील महत्त्वाचे प्रश्न व गरजा लक्षात घेऊन जे कार्यक्रम घेतले जातात त्यामध्ये वयात येणाऱ्या मुलांमुलींसाठी लैंगिक शिक्षण देण्याचा उपक्रम मराठी विज्ञान

विषयी परिषद पार पाडत आहे. एडस् विषयी दृकश्राव्य कार्यक्रम ही गेली काही वर्षे मराठी विज्ञान परिषद अनेक ठिकाणी दाखवित आहे. त्याशिवाय दृष्टिदोष किंवा श्रवणदोष असलेल्या विद्यार्थ्यांकरिता मराठी विज्ञान परिषदेतर्फे विज्ञान जागृतीचे विशेष कार्यक्रम घेतले जातात. तसेच मराठी विज्ञान परिषदेने पुस्तिका व ग्रंथ प्रकाशित केलेले आहेत व नेहमीच्या वर्तमानपत्रात विज्ञान विषयक सदरे चालविली आहेत.

असाच एक समाजोपयोगी उपक्रम म्हणजे परिषदेतर्फे चालविण्यात येणारा 'शहरी शेती' हा प्रकल्प. मोकळ्या जागेची आत्यंतिक कमतरता असलेल्या मुंबईसारख्या महानगरातही शहरी शेतीच्या रूपाने भाज्या आणि फळे यांचे उत्पादन घेता येते व ते करीत असताना घरोघरी निर्माण होणारा सेंद्रिय कचरा उत्पादक कामासाठी वापरला जातो हे या प्रकल्पाचे लक्षणीय योगदान आहे. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने मराठी विज्ञान परिषद पावसाचे पाणी साठविणे व सौर ऊर्जेचा वापर करणे या क्षेत्रातही कृतिशील आहे.

रंजक माध्यमांतून विज्ञानाविषयी कुतूहल जागृत करण्याचे एक साधन म्हणजे विज्ञान साहित्य. १९७० मध्ये मराठी विज्ञान परिषदेने विज्ञान कथा स्पर्धा सुरु केली व या स्पर्धांमधून शारदेच्या दरबारी एक नवीन दालन उघडून मराठी साहित्याला अनेक प्रथितयश विज्ञानकथा लेखक मिळवून दिले. याबाबतीत उल्लेखनीय बाब म्हणजे १९७४ च्या स्पर्धेत श्री. नारायण विनायक जगताप यांच्या कथेला पारितोषिक मिळाले. हे श्री. जगताप म्हणजे सुप्रसिद्ध वैज्ञानिक डॉ. जयंत नारळीकर होते. परीक्षकांवर प्रभाव पडू नये म्हणून त्यांनी टोपण नांवाने आपली विज्ञानकथा पाठविली होती.

मराठी विज्ञान परिषदेने गेली अनेक वर्षे समाज हितासाठी चालविलेले कार्य हळूहळू पण निश्चितपणे विस्तार पावत आहे. मराठी विज्ञान परिषदेच्या महाराष्ट्रामध्ये ६६ शाखा आहेत. त्याशिवाय बेळगांव, बडोदा, भोपाळ आणि गोवा या ठिकाणीही मराठी विज्ञान परिषदेच्या शाखा आहेत. चुनाभट्टी येथे परिषदेची स्वतःची वास्तू असून नवीन वास्तू उभारण्यासाठी मराठी विज्ञान परिषद सध्या निधी संकलन करीत आहे. परिषदेत समृद्ध असे ४५०० पुस्तके उपलब्ध असलेले संदर्भालय आहे व नुकताच नवीन तंत्रज्ञानाची दखल घेऊन कॉम्पॅक्ट डिस्कचाही संग्रह करण्यात आलेला आहे.

मराठी विज्ञान परिषद करीत असलेले काम म्हणजे मराठी भाषेचे ज्ञानभाषेत रूपांतर करण्याच्या उच्च आकांक्षेच्या मार्गावर टाकलेली पावले आहेत. मा. यशवंतराव चव्हाण यांनी विदर्भ साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना फेब्रुवारी १९६० मध्ये असे उद्‌गार काढले होते की, ''मराठी भाषेचे राज्य झाल्यानंतर ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांतील विचारांची संपदा तिने मराठी जीवनात आणली पाहिजे. ...... त्याकरिता मराठी भाषा ही अधिक विचार प्रवाही, अधिक विचारवाही झाली पाहिजे. ज्ञानाच्या व विज्ञानाच्या क्षेत्रातील मूलभूत संशोधन हाती घेण्याचा प्रयत्न ज्या भाषेत होतो तीच भाषा ज्ञानाची भाषा होऊ शकते. ........ मराठी भाषेचा तुमचा-आमचा अभिमान जर खऱ्या अर्थाने पहिल्या प्रतीचा राहणार असेल तर हे काम मराठी भाषेमध्येही झाले पाहिजे.''

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेपूर्वी आणि मराठी विज्ञान परिषदेच्याही निर्मितीपूर्वी मा. यशवंतरावांनी व्यक्त केलेले हे विचार त्यावेळी जितके महत्त्वाचे होते तितकेच किंबहुना आज अधिकच महत्त्वाचे व दिशादर्शक आहेत. मराठी विज्ञान परिषद जे कार्य करीत आहे ते या दिशेशी सुसंगत आहे.

मराठी विज्ञान परिषद या संस्थेला आज दि. २५ नोव्हेंबर २०११ रोजी मा. यशवंतरावांच्या पुण्यस्मृतिदिनी यशवंतराव चव्हाण विज्ञान-तंत्रज्ञान राज्यस्तरीय पारितोषिक २०११ देताना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईला विशेष आनंद होत आहे.

मुंबई

दिनांक : २५ नोव्हेंबर, १०११

शरद पवार
अध्यक्ष
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# नवमहाराष्ट्र युवा अभियान
# कार्यवृत्त

नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे काम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, सहसंयोजक-श्री. विश्वास ठाकूर, संघटक श्री. निलेश राऊत हे पाहतात. तर कार्यालयीन संघटक म्हणून श्री. सुरेश पाटील व मीनल सावंत सहाय्यक म्हणून काम पाहतात.

**राज्य युवा धोरण शासकीय मसुदा राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. पृथ्वीराज चव्हाण यांना सादर** (दि. ५ फेब्रुवारी २०११)

महाराष्ट्र राज्याच्या क्रीडा व युवा कल्याण विभागाच्या शासकीय मसुदा समितीच्या वतीने तयार करण्यात आलेल्या राज्याच्या युवा धोरणाचा अंतिम मसुदा शनिवार, दि. ५ फेब्रुवारी २०११ रोजी राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. पृथ्वीराज चव्हाण यांना सादर करण्यात आला. यावेळी नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री मा. पद्माकर वळवी, आरोग्यमंत्री मा. डॉ. सुरेश शेट्टी, युवा धोरण उपसमितीचे अध्यक्ष मा. विश्वास ठाकूर, क्रिकेटपटू मा. दिलीप वेंगसरकर, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संयोजक मा. दत्ता बाळसराफ, संघटक मा. नीलेश राऊत, मा. प्रा. लता नारायण, मा. नीलेश पुराडकर, मा. अभिजीत खानविलकर, मा. डॉ. सचिन जाधव, मा. उमाकांत जगदाळे, मा. आ. दीपक केसरकर, मा. सुरेश पाटील आदींची उपस्थिती होती.

**अभिसरण विभागीय बैठक** (दि. ६ मार्च २०११)

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई–नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे रविवार, दि. ६ मार्च २०११ रोजी नाथ सीड्स, औरंगाबाद येथे अभिसरण उपक्रमासंदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीकरिता विभागीय केंद्र, औरंगाबादचे अध्यक्ष मा. नंदकिशोर कागलीवाल, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संयोजक मा. दत्ता बाळसराफ, समन्वयक मा. विजय कान्हेकर, विभागीय समन्वयक मा. सुहास तेंडुलकर, संघटक मा. नीलेश राऊत, राज्य विशेष निमंत्रित मा. डॉ. सचिन जाधव, विभागीय संघटक मा. श्रीधर पाटील, मा. अभिजीत खानविलकर, मा. हर्षद स्वार, मा. सुबोध जाधव, मा. रेणूका कड, मा. अभिजीत विटोरे, मा. रणजीत शिंदे, मा. किरण काळे, मा. ॲड. विवेक घोगरे, मा. अर्जुन भिसे, मा. अरविंद मुरमे, मा. सुधीर सेवेकर, मा. दीपक जाधव उपस्थित होते.

संघटक मा. नीलेश राऊत यांनी बैठकीमध्ये आगामी अभिसरण उपक्रमासंदर्भात नियोजन कसे करावे, याविषयी पी.पी.टी सादरीकरण करुन माहिती दिली.

**नॅशनल स्किल डेव्हलपमेंट प्रोग्राम** (२९ मार्च २०११)

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, नवमहाराष्ट्र युवा अभियान व युवा सेल्स तर्फे मंगळवार, दि. २९ मार्च २०११ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे राज्यस्तरीय कौशल्य विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी निमंत्रक मा. सुप्रिया सुळे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. ना. राजेश टोपे, मा.खा. डॉ. भालचंद्र मुणगेकर, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक मा. जे. डी. भुतांगे, एम.के.सी.एलचे व्यवस्थापकीय संचालक मा. विवेक सावंत आदी मान्यवर या कार्यशाळेसाठी उपस्थित होते.

सामाजिक–आर्थिक पार्श्वभूमीवर कौशल्य विकास कार्यक्रमाची आवश्यकता समजून घेणे आणि कौशल्य विकास कार्यक्रमासंदर्भात निश्चित धोरणाकडे वाटचाल करणे, हा या कार्यशाळेमागील हेतू होता. यानुसार दिवसभरातील कार्यशाळेमध्ये विविध तज्ज्ञांनी या विषयावर मते नोंदविली. कुशल मनुष्यबळ तयार होणे, उद्योगजगत व प्रशिक्षण संस्था यांच्यात कुशल मनुष्यबळाची मागणी व पुरवठ्याबाबत संतुलनासाठी कायम संवाद व्हावा, कौशल्यविकासाला गती मिळण्यासाठी ज्ञानाधिष्ठित शिक्षणाला तंत्रज्ञानाची जोड मिळावी, माध्यमे व स्वयंसेवी संस्थांची भूमिकाही यामध्ये महत्त्वपूर्ण ठरावी, शिष्यवृत्ती व सुलभ शैक्षणिक कर्ज यांसारख्या उपायांची अंमलबजावणी व्हावी आदी मुद्दयांवर चर्चा करण्यात आली.

कार्यशाळेसाठी विविध संस्थांचे सुमारे ५० प्रतिनिधी उपस्थित होते.

**व्हिजन करिअर फेअर (महाराष्ट्र) दि. २२ एप्रिल ते २२ मे २०११**

**कराड** (दि. २२ ते २४ एप्रिल २०११)

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई – नवमहाराष्ट्र युवा

अभियान, रिसोर्सेस व सनबीन एज्युकेशन व रिसर्च ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २२ ते २४ एप्रिल २०११ या दरम्यान लिबर्टी ग्राउंड, सौ. वेणुताई चव्हाण सभागृहाजवळ, कराड, जि. सातारा येथे व्हिजन करिअर फेअरचे आयोजन करण्यात आले होते. येथील प्रदर्शनाचे स्वागताध्यक्ष मा. सारंग पाटील होते. या प्रदर्शनामध्ये ३१ स्टॉल्स सहभागी झाले होते. प्रदर्शनाला सुमारे दोन हजारांवर विद्यार्थी-पालकांनी भेटी दिल्या.

**कोल्हापूर** (दि. २९ एप्रिल ते १ मे २०११)

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियान व रिसोर्सेस यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २९ एप्रिल ते १ मे २०११ दरम्यान प्रायव्हेट हायस्कूल मैदान, कोल्हापूर येथे व्हिजन करिअर फेअरचे आयोजन करण्यात आले होते. येथील प्रदर्शनाचे स्वागताध्यक्ष राज्याचे कामगार मंत्री मा. ना. हसन मुश्रीफ होते. या प्रदर्शनामध्ये २८ स्टॉल्स सहभागी झाले होते. प्रदर्शनाला सुमारे पाच हजारांवर विद्यार्थी-पालकांनी भेटी दिल्या.

**सांगली** (दि. ६ ते ८ मे २०११)

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियान व रिसोर्सेस यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ ते ८ मे २०११ दरम्यान नेमिनाथ नगर मैदान, नेमिनाथ नगर, सांगली येथे व्हिजन करिअर फेअरचे आयोजन करण्यात आले होते. येथील प्रदर्शनाचे स्वागताध्यक्ष मा. ना. जयंत पाटील होते. या प्रदर्शनामध्ये ८५ स्टॉल्स सहभागी झाले होते. तीन दिवसांमध्ये एकूण नऊ करिअरविषयक व्याख्याने आयोजित करण्यात आली. प्रदर्शनाला सुमारे वीस हजारांवर विद्यार्थी-पालकांनी भेटी दिल्या.

**चिपळूण** (दि. ६ ते ८ मे २०११)

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि ओंकार कला व क्रीडा अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ ते ८ मे २०११ दरम्यान न्यू युनायटेड इंग्लिश स्कूल, चिपळूण, जि. रत्नागिरी येथे व्हिजन करिअर फेअरचे आयोजन करण्यात आले होते. येथील प्रदर्शनाचे स्वागताध्यक्ष मा. ना. भास्कर जाधव होते. या प्रदर्शनामध्ये २६ स्टॉल्स सहभागी झाले होते. प्रदर्शनाला सुमारे पाच हजारांवर विद्यार्थी-पालकांनी भेटी दिल्या.

**सोलापूर** (दि. १३ ते १४ मे २०११)

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियान व शरद प्रतिष्ठान, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ ते १४ मे २०११ दरम्यान डॉ. वा. का. किर्लोस्कर सभागृह, हिराचंद नेमिचंद वाचनालय, सोलापूर येथे व्हिजन करिअर फेअरचे आयोजन करण्यात आले होते. येथील प्रदर्शनाचे स्वागताध्यक्ष मा. महेश गादेकर होते. या प्रदर्शनामध्ये २८ स्टॉल्स सहभागी झाले होते. प्रदर्शनाला सुमारे सात हजारांवर विद्यार्थी-पालकांनी भेटी दिल्या.

**ठाणे** (दि. १३ ते १५ मे २०११)

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियान व समन्वय प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ ते १५ मे २०११ या दरम्यान घंटाळी मैदान, घंटाळी मंदिराच्या बाजूला, नौपाडा, ठाणे (प.) येथे व्हिजन करिअर फेअरचे आयोजन करण्यात आले होते. येथील प्रदर्शनाचे स्वागताध्यक्ष मा. निरंजन डावखरे होते. या प्रदर्शनामध्ये २७ स्टॉल्स सहभागी झाले होते. प्रदर्शनाला सुमारे दोन हजारांवर विद्यार्थी-पालकांनी भेटी दिल्या.

**कुडाळ** (दि. १७ ते १८ मे २०११)

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियान व ध्येय प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ ते १८ मे २०११ या दरम्यान कुडाळ हायस्कूल ग्राउंड, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथे व्हिजन करिअर फेअरचे आयोजन करण्यात आले होते. येथील प्रदर्शनाचे स्वागताध्यक्ष मा. अमित सामंत होते. या प्रदर्शनामध्ये ४० स्टॉल्स सहभागी झाले होते. प्रदर्शनाला सुमारे पंधरा हजारांवर विद्यार्थी-पालकांनी भेटी दिल्या.

**बदलापूर** (दि. २० ते २२ मे २०११)

बदलापूर शहरात यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, नवमहाराष्ट्र युवा अभियान, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, ग्रंथसखा वाचनालय आदि संस्थाच्या सहकार्याने व्हिजन करिअर फेअर २०११ - शैक्षणिक प्रदर्शन व व्याख्यानमाला या महत्त्वाकांक्षी प्रदर्शनाचे आयोजन दि. २०, २१, २२ मे रोजी करण्यात आले होते. दि. २० मे रोजी कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र विधानपरिषदेचे उपसभापती मा. श्री. वसंत डावखरे, सिने अभिनेत्री गिरीजा ओक, कोकण पाटबंधारे महामंडळाचे उपाध्यक्ष व आमदार मा. श्री. किसन कथोरे, कार्यक्रमाचे संयोजक व कुळगांव बदलापूर नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष श्री. श्रीधर पाटील तसेच कुळगांव बदलापूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष श्री. राजेंद्र घोरपडे, ग्रंथसखा वाचनालयाचे संचालक श्री. श्याम जोशी आदी मान्यवर उपस्थित

होते. प्रदर्शन पाहणी, येणाऱ्या विद्यार्थ्यांची अॅप्टीटयूड टेस्ट, व्याख्यानमाला अशा विविध उपक्रमांची सुरुवात कार्यक्रमाचे स्थळी सुरु झाली. तीन दिवस चाललेल्या या शैक्षणिक प्रदर्शनाला १४००० विद्यार्थी, पालक यांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला.

**औरंगाबाद** (दि. २० ते २२ मे २०११)

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियान, विभागीय केंद्र-औरंगाबाद, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट व अभ्युदय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने औरंगाबाद येथे दि. २० ते २२ मे २०११ दरम्यान व्हिजन करिअर फेअर शैक्षणिक प्रदर्शन व करिअर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. करिअर फेअरचे उद्घाटन प्रसिध्द दिग्दर्शक मा. चंद्रकांत कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. मंचावर महापौर अनिता घोडेले, मधुकरअण्णा मुळे, बापूसाहेब काळदाते, सचिन मुळे, विजय कान्हेकर, नीलेश राऊत, घाटी रुग्णालयाचे अधिष्ठाता के. एस. भोपळे, मनमोहनसिंग ओबेरॉय, विजेंद्र जाधव, उल्हास उढाण यांची उपस्थिती होती.

प्रदर्शनाला तीनही दिवस विविध मान्यवरांनी भेट दिली. यामध्ये महाराष्ट्र राज्याचे नागरी पाणीपुरवठा मंत्री मा. ना. लक्ष्मणराव ढोबळे, क्रांतिवीर लहुजी, साळवे, मातंग समाज अभ्यास आयोगाचे अध्यक्ष मा. रमेश कदम, उद्योजक मा. पद्माकर मुळे, मा. रणजीत मुळे यांचा समावेश होता. करिअरविषयी मार्गदर्शन करण्याकरिता तीनही दिवस विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्तींना व्याख्यानांसाठी आमंत्रित करण्यात आले. दि. २० मे रोजी सायंकाळी प्रा. अपर्णा अष्टपुत्रे यांचे 'व्यक्तिमत्त्व आणि करिअर', मा. मेजर चंद्रसेन कुलथे यांचे 'भारतीय सशस्त्र दल-संधी व तयारी', ग्रुप कॅप्टन पी. के. तिवारी यांचे 'भारतीय हवाई दलातील करिअर' या विषयांवर व्याख्याने संपन्न झाली. दि. २१ मे रोजी सायंकाळी मा. संदीप भाजीभाकरे यांचे 'आयपीएस भरती प्रक्रिया', मा. तुकाराम जाधव यांचे 'एमपीएससी-यूपीएससी परीक्षांची तयारी' या विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली. तर व्ही. बी. जी. ग्रुपचे मा. हनुमंत गायकवाड यांच्या प्रकट मुलाखतीची चित्रफित दाखविण्यात आली. दि. २२ मे रोजी सायंकाळी मा. नीलेश खरे यांचे 'पत्रकारितेतील संधी', मा. योगेश जाधव यांचे 'अॅनिमेशन क्षेत्रातील करिअर' व मा. संदिप पैठणकर यांचे ऍन्ड्रॉइड प्रणालीतील करिअर या विषयांवर व्याख्याने संपन्न झाली.

प्रदर्शनामध्ये भारतीय भूदल, नौदल व हवाईदलांचे स्टॉल्स सहभागी झाले होते. अॅनिमेशन, फॅशन डिझायनिंग, कॉम्प्युटर सायन्स, बायोटेक्नोलॉजी, स्वयंरोजगारासंदर्भात प्रशिक्षण देणाऱ्या संस्था, नृत्य-नाट्य-संगीत, एम.बी.ए., जॉब कन्सल्टन्सी, व्यावसायिक शिक्षणाशी संबंधित संस्था, शासकीय विभाग, समुपदेशन केंद्र, परकीय भाषांचे शिक्षण देणाऱ्या संस्था, पर्यटन, कृषीविषयक संस्थांचा सहभाग होता. या प्रदर्शनामध्ये एकूण ५६ संस्था सहभागी झाल्या होत्या. प्रदर्शनाला भेट देणाऱ्या प्रत्येक विद्यार्थी, विद्यार्थिनीची मोफत बुध्दीमापन चाचणी करण्यात आली. प्रदर्शन व व्याख्यानमालेला विद्यार्थी-विद्यार्थिनी व पालकांनी प्रचंड गर्दी केली होती. येथे आयोजित व्हिजन करिअर फेअरमध्ये सुमारे २० हजारांवर विद्यार्थी-पालकांनी भेट दिली.

**मराठवाडा ते मुंबई युवा अभिसरण** (दि. २५ मे ते २ जून २०११)

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे दि. २५ मे ते २ जून २०११ या दरम्यान मराठवाडा ते मुंबई व उपनगर विभाग युवा अभिसरण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दि. २५ मे रोजी मराठवाड्यातील सहभागी युवा टूरिस्ट होम, औरंगाबाद येथे जमले. येथे मराठवाड्याची ओळख या संदर्भात एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यशाळेमध्ये दुपारच्या सत्रात ओळख मराठवाड्याची यावर व्याख्यानाकरिता लेखक व समीक्षक मा. प्रा. जयदेव डोळे यांना आमंत्रित करण्यात आले होते.

दुसऱ्या दिवशी दि. २६ मे २०११ रोजी सर्व सहभागी युवा सकाळी ६ वाजता राष्ट्रीय मिल मजदूर संघ, परेल (मुंबई) येथे पोहोचले. सकाळच्या सत्रामध्ये मा. उमेश खाडे यांनी खेळ व मागील दिवसाचा आढावा घेतला. यानंतर 'ओळख मुंबईची' या विषयावर मा. संदिप आचार्य यांनी युवांशी संवाद साधला. मुंबईची सामाजिक, आर्थिक, भौगोलिक, राजकीय इत्यादी पार्श्वभूमी सांगत मुंबईविषयी मराठवाड्यातील युवांच्या मनात असलेल्या जाणिवा अधिक व्यापक केल्या.

दि. २७ मे ते १ जून २०११ या दरम्यान सहभागी युवांनी ६ गटांमध्ये विभागून मुंबई शहर व उपनगरातील विविध ठिकाणी भेटी दिल्या. पहिल्या गटाने सेंट्रल चौक, सेंट्रल जेल, सेंट्रल कोर्ट, शासकीय विश्रामगृह, सेंट्रल ग्राउंड, ठाणे मेंटल हॉस्पिटल, आनंद विश्वगुरुकुल, कोरम मॉल, मुंब्रादेवी गड, बिग्रस कारखाना, राम गणेश गडकरी नाट्यमंदिर आदी ठिकाणी भेटी दिल्या. या दरम्यान या गटाने मा. दिगंबर नाईक, मा. अशोक समीळ,

मा. निरंजन डावखरे, उपजिल्हाधिकारी मा. अमोल यादव, वसईचे तहसीलदार मा. विश्वास गुजर, ठाणे मेंटल हॉस्पिटलचे अधिष्ठाता मा. कुमावत, शारदा एज्युकेशन सोसायटीचे मा. प्रदीप ढवळ यांना भेटून चर्चा केली. दुसऱ्या गटाने मुंबई पोर्ट ट्रस्ट, कोरबा मीठागर, जहांगीर आर्ट गॅलरी, गेट वे ऑफ इंडिया, फिरोजशहा मेहता उद्यान, गिरगाव चौपाटी आदी ठिकाणांना भेटी दिल्या. तिसऱ्या गटाने धारावी, धोबीघाट, मेटल फॅक्टरी, कुंभारवाडा, ढोरवाडा, सोशल नगर कॉलनी, खानदेवी, खांबनगर, विकास नगर, कोळीवाडा आदी ठिकाणांना भेटी दिल्या. चौथ्या गटाने तोरस जिम, त्रिमूर्ती गृह उद्योग, अस्तित्व मतिमंद शाळा, सावित्रीबाई फुले नाट्य मंदिर, आम्ही सारे नाटक संस्था, विजयंता रणगाडा, सिध्दीविनायक मंदिर, सैनिकी शाळा, काळूज नदी, पोईवाडा आदिवासी वस्ती, बिर्ला मंदिर आदी ठिकाणी भेटी दिल्या. या दरम्यान या गटाने मा. शं. ना. नवरे, फयेगावचे सरपंच, कल्याण पंचायत समितीच्या उपसभापती मा. मीनाक्षी बंदूर आदी मान्यवरांशी चर्चा केली. पाचव्या गटाने बोधिसत्व विहार, निर्मळ गावातील होलिक्रॉस चर्च, अर्नाळा किल्ला, समुद्र किनारा, वसईचा किल्ला आदी ठिकाणी भेटी दिल्या. या दरम्यान या गटाने नगरसेवक मा. सूरज कोळी यांची भेट घेतली; तसेच वसई मच्छिमार संघाला भेट देऊन माहिती जाणून घेतली. सहाव्या गटाने युसूफ बुक सेंटर, चले जाओ आंदोलन मैदान, महात्मा गांधी मणिभवन, गिरगाव चौपाटी, एलिफंटा गुंफा, गेट वे ऑफ इंडिया आदी ठिकाणी भेटी दिल्या.

उपक्रमाच्या शेवटच्या दिवशी दि. २ जून २०११ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे समारोप समारंभ संपन्न झाला. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे सरचिटणीस मा. श. ग. काळे, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संयोजक मा. दत्ता बाळसराफ, संघटक मा. नीलेश राऊत, मा. उमाकांत जगदाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मुंबई विभागाला भेट दिल्यानंतर आलेल्या अनुभवांचे कथन व सादरीकरण सहभागी युवांच्या गटागटांनी केले. सादरीकरणानंतर सर्वच सहभागी युवांना मा. श. ग. काळे याच्या हस्ते प्रशस्तिपत्र, भारतीय घटनेचा सरनामा, यशवंत चिंतनिका आदी भेट देण्यात आले. सायंकाळी सर्व युवा आपापल्या गावांकडे रवाना झाले. या उपक्रमामध्ये मराठवाड्यातील ४० युवा सहभागी झाले होते.

**कोकण ते उत्तर महाराष्ट्र युवा अभिसरण** (दि. ५ ते १३ जून २०११)

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई–नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे दि. ५ ते १३ जून २०११ या दरम्यान कोकण ते उत्तर महाराष्ट्र विभाग युवा अभिसरण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दि. ५ जून रोजी कोकणातील सहभागी युवा युसूफ मेहरअली सेंटर, पनवेल येथे जमले. येथे 'कोकणाची ओळख' या संदर्भात एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या विषयावर संवाद साधण्यासाठी कोकणातील ज्येष्ठ पर्यावरणवादी मा. पार्थ व मा. दीप्ती बापट यांना निमंत्रित करण्यात आले.

दुसऱ्या दिवशी दि. ६ जून २०११ रोजी सर्व सहभागी युवा सकाळी ६ वाजता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र–नाशिक येथे पोचले. ओळख खान्देशाची या विषयावर मा. विनायकदादा पाटील यांनी सहभागी युवांशी संवाद साधला. खान्देशला लाभलेला राजकीय व सामाजिक वारसा त्यांनी उलगडून सांगितला. दुपारच्या सत्रामध्ये मा. स्वानंद बेदरकर यांनी खान्देशला लाभलेला सांस्कृतिक व साहित्यिक वारसा उलगडून सांगितला. दि. ७ ते १२ जून २०११ या दरम्यान सहभागी युवांनी गटांमध्ये विभागून उत्तर महाराष्ट्र विभागातील ठराविक ठिकाणी भेटी दिल्या. पंचवटी परिसर, गंगाघाट, सूर्यनारायण मंदिर, वाईनरी प्रकल्प, नाशिक येथील सेंट्रल जेल, भगूर व टेंपल हिल, लूम मिल, द्राक्षांच्या बागा, रोजगार हमी योजनेची कामे, फ्रावशी इंटरनॅशनल स्कूल, गंगापूर धरण, अभिव्यक्ती मिडिया फॉर डेव्हलपमेंट संस्था, आनंद निकेतन, कुसुमाग्रज प्रतिष्ठान, प्रगती अभियान, हुतात्मा स्मारक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, स्नेहालय स्वयंसेवी संस्था, लोकमत कार्यालय, बँक ऑफ महाराष्ट्र विभागीय कार्यालय, चाँदबीबी महाल, रेडिओ कम्युनिटी सेंटर या ठिकाणांना भेटी देतानाच कला, साहित्य, अर्थकारण, राजकारण, समाजकारणातील नामांकित व्यक्तींबरोबर सहभागी युवांनी संवाद साधला.

उपक्रमाच्या शेवटच्या दिवशी दि. १३ जून २०११ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, नाशिक येथे समारोप समारंभ संपन्न झाला. यावेळी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे सहसंयोजक मा. विश्वास ठाकूर, संघटक मा. नीलेश राऊत, डॉ. अमित नागरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उत्तर महाराष्ट्र विभागाला भेट दिल्यानंतर आलेल्या अनुभवांचे कथन व

सादरीकरण सहभागी युवांच्या गटागटांनी केले. सादरीकरणानंतर सर्वच सहभागी युवांना मा. विश्वास ठाकूर यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र, भारतीय घटनेचा सरनामा, यशवंत चिंतनिका आदी भेट देण्यात आले. सायंकाळी सर्व युवा आपापल्या गावांकडे रवाना झाले.

**विदर्भ ते पश्चिम महाराष्ट्र युवा अभिसरण** (दि. १६ ते २४ जून २०११)

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे दि. १६ ते २४ जून २०११ या दरम्यान विदर्भ ते पश्चिम महाराष्ट्र विभाग युवा अभिसरण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दि. १६ जून २०११ रोजी विदर्भातील सर्व युवा झुनझुनवाला धर्मशाळा, अमरावती येथे जमले. येथे विदर्भातील युवांसाठी ओळख विदर्भाची या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या सुरुवातीला मा. देवेंद्र गणवीर व मा. महेश पवार यांनी नवमहाराष्ट्र युवा अभियानाची संकल्पना आणि अभिसरण उपक्रमामागील भूमिका विशद केली. दुपारच्या सत्रात मा. अविनाश सावजी यांनी ओळख विदर्भाची सत्रामध्ये युवांशी संवाद साधला. विदर्भाची भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक ओळख उपस्थित युवांसमोर नव्याने मांडण्यात आली. सायंकाळी सर्व युवा पश्चिम महाराष्ट्रातील पुण्याकडे रवाना झाले.

दि. १७ जून रोजी पुणे येथे निसर्ग कार्यालयात ओळख पश्चिम महाराष्ट्राची या विषयावर युवांची एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. दि. १८ ते २३ जून दरम्यान विदर्भातील युवा पश्चिम महाराष्ट्र विभागातील पुणे, सोलापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यांमध्ये गटागटांनी रवाना झाले. पश्चिम महाराष्ट्रातील भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक पैलूंशी युवांनी ओळख करुन घेतली. या विभागातील विविध क्षेत्रांमधील मान्यवरांशी संवाद साधून जाणिवांची व्यापकता वाढविली.

दि. २४ जून रोजी सर्व युवा पुणे येथे निसर्ग कार्यालयात पुन्हा एकत्र जमले. पश्चिम महाराष्ट्रातील अभिसरण उपक्रमादरम्यान आलेल्या अनुभवांचे कथन व सादरीकरण केले. विदर्भातील युवांना समारोप समारंभात प्रशस्तीपत्र, घटनेचा सरनामा व स्थित्यंतरे हे पुस्तक भेट देऊन सन्मानित करण्यात आले. या समारंभासाठी मा. नीलेश राऊत, मा. दिनेश शिंदे, मा. विलास लोंढे, मा. रश्मी कामतेकर यांची उपस्थिती होती. सायंकाळी सर्व युवा विदर्भाकडे रवाना झाले.

**जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा... राज्यस्तरीय महाविद्यालयीन निबंध व चित्रकला (घोषवाक्यासह) स्पर्धा :**

दि. ४ ऑगस्ट २०११ : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा... महाविद्यालयीन युवक-युवतींसाठी राज्यस्तरीय निबंध व चित्रकला (घोषवाक्यासह) स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. दि. ४ ऑगस्ट २०११ पर्यंत या दोन्हीही स्पर्धांकरिता प्रवेशिका मागविण्यात आल्या होत्या. या स्पर्धांना राज्यभरातून विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

महाराष्ट्र राज्यात मुलींचा कमी होणारा जन्मदर ही गंभीर समस्या लक्षात घेता मा. सुप्रिया सुळे यांनी जागर हा जाणिवांचा, तुमच्या-माझ्या लेकींचा हा उपक्रम हाती घेतला आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून महाविद्यालयीन युवक-युवतींकरिता राज्स्तरीय निबंध व चित्रकला (घोषवाक्यासह) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सदर स्पर्धा उच्च माध्यमिक (११ वी, १२ वी) व पदवी-पदविका या दोन गटांमध्ये घेण्यात आली. चित्रकला स्पर्धेसाठी स्त्रीभ्रूण हत्या - एक अक्षम्य चूक, करुया स्त्री जन्माचे स्वागत, हुंडाबळी व स्त्री अत्याचार- समाज व्यवस्थेला लागलेले ग्रहण हे विषय देण्यात आले. तर निबंध स्पर्धेसाठी या तीन विषयांबरोबरच स्त्रीविषयक कायदे स्त्रियांच्या संरक्षणासाठी पुरेसे आहेत काय, स्त्रियांच्या निवडणुकीतील आरक्षणाने स्त्रियांना समान संधी प्राप्त होईल का हे विषय देण्यात आले. निबंध व चित्रासोबत ४ घोषवाक्ये पाठविणे बंधनकारक करण्यात आले होते. या स्पर्धेत मुंबई, विदर्भ, कोकण, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा या सहा विभागीय स्तरावर विजेते निवडण्यात आले. चित्रकला स्पर्धेत ११ वी, १२ वी गटामध्ये २० युवक-युवतींनी व पदवी-पदविका गटामध्ये २९ युवक-युवतींनी विजेतेपद मिळविले. निबंध स्पर्धेमध्ये ११ वी, १२ वी गटामध्ये २१ युवक-युवतींनी व पदवी-पदविका गटामध्ये ३० युवक-युवतींनी विजेतेपद मिळविले. या स्पर्धांमधील विजेत्यांना पारितोषिक वितरण केंद्रीय कृषिमंत्री तथा प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा.ना.शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते दि.२८ ऑगस्ट २०११ रोजी जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा पदयात्रेच्या समारोप कार्यक्रमामध्ये पुणे येथे करण्यात आले.

**लिंगभाव समानता राष्ट्रीय चर्चासत्र :**

दि. ५ व ६ ऑगस्ट २०११ : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियान, आयसीआरडब्ल्यू, कोरो, टीआयएसएस यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे दि. ५ व ६ ऑगस्ट २०११ या दरम्यान स्त्री-पुरुष समानता या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राचा मुख्य विषय अध्ययन आणि अनुभवांचे आदानप्रदान हा होता. या चर्चासत्रासाठी भारतातील विविध स्वयंसेवी संघटनांचे प्रतिनिधी तसेच मुंबई महानगरपालिकेच्या अनेक शाळांमधील मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी यांसह मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.रवी वर्मा यांनी केले. समाजामध्ये स्त्री-पुरुष भेदभाव केला जातो. परंतु स्त्री-पुरुष समानतेविषयी विद्यार्थीदशेतच मुले व मुलींना मार्गदर्शन केले गेले, तर खऱ्या अर्थाने समाजामध्ये लिंगभाव समानता प्रस्थापित होईल. याकरिताच 'GEMS' (Gender Equity Movement in Schools project) या उपक्रमाची निर्मिती करण्यात आलेली आहे. या उपक्रमामध्ये मुंबई महानगरपालिकेच्या ३० शाळांमधील इयत्ता ६ वी व ७ वी तील विद्यार्थी-विद्यार्थिनींची निवड करण्यात आलेली असल्याचे त्यांनी सांगितले.

दुसऱ्या दिवशी दि. ६ ऑगस्ट रोजी सकाळच्या सत्रामध्ये गटचर्चा आयोजित करण्यात आली. या सत्रामध्ये शालेय शिक्षण राज्यमंत्री मा. फौजिया खान उपस्थित होत्या. उपस्थित प्रतिनिधींची सहा गटांमध्ये विभागणी करण्यात आली. रचना व कार्यपद्धती, समता आणि समानता, मूल्यमापन आणि नियंत्रण या विषयांवर चर्चा करण्यात आली. दुपारच्या सत्रामध्ये गोवंडीच्या शाळा क्र.१ मधील मुलांनी स्त्री-पुरुष समानतेविषयी पथनाट्य सादर केले. यावेळी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संयोजक मा. दत्ता बाळ सराफ यांनी मनोगत व्यक्त करताना हा उपक्रम नागरी तसेच ग्रामीण भागातही राबविला गेला पाहिजे, यावर भर दिला. चर्चासत्रामध्ये सहभागी मुख्याध्यापक, शिक्षक विद्यार्थी तसेच समन्वयकांनी मनोगते व्यक्त केली.

**स्त्रीभ्रूणहत्येविरोधी जनजागृतीसाठी अहमदनगरमध्ये रॅली :**

दि. १२ ऑगस्ट २०११ : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियान व उन्नती फाउंडेशन, अहमदनगर यांच्यातर्फे दि.१२ ऑगस्ट २०११ रोजी अहमदनगर शहरात स्त्रीभ्रूणहत्येविरोधी जनजागृती करण्यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. पत्रकार चौक, अप्पू हत्ती, लालटाकी, तोफखाना, बागडपट्टी, सर्जेपुरा, एम.जी.रोड, जिल्हाधिकारी कार्यालय, माणिक चौक, दाळमंडई, कापड बाजार, घासगल्ली, नेता सुभाष चौक या भागांमधून पदयात्रा काढण्यात आली. पदयात्रेत विविध सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रातील संघटना, क्रीडा मंडळे व शहरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. 'लेक वाचवा, लेक जगवा', 'स्त्रीजन्माचे स्वागत करा' आदी घोषणांमुळे रॅलीने लक्ष वेधून घेतले होते. पदयात्रेचा समारोप गांधी मैदान येथे चौकसभेने झाला. यावेळी पोलीस अधीक्षक मा. कृष्णप्रकाश, मनपा आयुक्त मा.संजय काकडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. देविदास आठवले, डॉ. सुधा कांकरिया, डॉ. रवींद्र साताळकर, आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे, ॲड. शारदा लगड, मा. गुलाबराव काळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. समारोप प्रसंगी अपत्य असणाऱ्या आणि त्यानंतर कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केलेल्या दोन कुटुंबीयांचा प्रातिनिधिक स्वरूपात मा. कृष्णप्रकाश यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच 'मी स्त्रीभ्रूणहत्या करणार नाही आणि करूही देणार नाही' अशी सामूहिक शपथ घेण्यात आली. प्रास्ताविक नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे अहमदनगर जिल्हा संघटक मा. किरण काळे यांनी केले. पदयात्रा यशस्वीतेसाठी मा. भाऊसाहेब जगताप, मा. अनिल आठरे, मा. संजय कळमकर, मा. मच्छिंद्र मालूजकर, मा. सुरेश मुघूटमल, मा. शिंदे आदींनी परिश्रम घेतले.

**राखीपौर्णिमेनिमित्त केडगाव उपनगरात (अहमदनगर) स्त्रीभ्रूणहत्येविरोधी जनजागृतीसाठी पदयात्रा :**

दि. १३ ऑगस्ट २०११ : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियान व उन्नती फाउंडेशन, अहमदनगर व महाराणी ताराबाई कन्या विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ ऑगस्ट २०११ रोजी केडगाव उपनगरात (अहमदनगर) राखी पौर्णिमेचे औचित्य साधून स्त्रीभ्रूणहत्येविरोधी जनजागृती पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. अंबिकानगर, केडगाव वेस, शाहू नगर आदी भागातून ही पदयात्रा मार्गस्थ झाली. यात सुमारे ८५० युवती सहभागी झाल्या. पदयात्रेचा समारोप शाहूनगर बसस्थानक परिसरात चौकसभेने झाला. यावेळी डॉ. सुधा कांकरिया म्हणाल्या की, स्त्रियांची घटती संख्या ही

सार्वजनिक चिंतेची बाब झाली आहे. अशीच परिस्थिती राहिली तर राखी बांधण्यासाठी आगामी काळात बहीण शोधावी लागेल. तेव्हा स्त्रीजन्माचे स्वागत करून बहिणीला जगण्याची संधी द्या. यावेळी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे अहमदनगर जिल्हा संघटक मा. किरण काळे यांनी पदयात्रेमागील भूमिका विशद केली. प्रास्ताविक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मा. प्रमिला कार्ले यांनी केले. आभार मा. छाया शेळके यांनी मानले.

**युवा स्वातंत्र्यज्योत रॅली :**

दि. १४ ऑगस्ट २०११ : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियानतर्फे रविवार दि.१४ ऑगस्ट २०११ रोजी राज्यातील विविध शहरांमध्ये युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले. मुंबई, नवी मुंबई, बदलापूर, नाशिक, सोलापूर, औरंगाबाद, बुलडाणा, नागपूर, अंबाजोगाई, यवतमाळ, नांदेड, चिपळूण, लांजा आदी ठिकाणी दि. १४ ऑगस्ट २०११ रोजी मध्यरात्री रॅली काढण्यात आली.

मुंबई येथे मा. उमाकांत जगदाळे, मा. विजय कसबे, मा. सुरेश पाटील, नवी मुंबई येथे मा. उमेश खाडे, बदलापूर येथे मा. अनिल चाळके, नाशिक येथे मा. विश्वास ठाकूर, डॉ. अमित नागरे, सोलापूर येथे मा. दिनेश शिंदे, औरंगाबाद येथे मा. नीलेश राऊत, मा. सुबोध जाधव, बुलढाणा येथे मा. नरेश शेळके, यवतमाळ येथे मा. महेश पवार, नागपूर येथे मा. अभिजीत राऊत, नांदेड येथे मा. देवेंद्र गणवीर, मा. जयसिंग हंबर्डे, अंबाजोगाई (जि. बीड) येथे मा. डॉ.नरेंद्र काळे, चिपळूण (जि. रत्नागिरी) येथे मा. अभिजीत खानविलकर, लांजा (जि. रत्नागिरी) येथे मा. अभिजीत राजेशिर्के यांनी रॅलीचे आयोजन केले होते. सर्वच ठिकाणी रॅलीला युवांनी, नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

**स्त्रीभ्रूणहत्येविरोधात चित्रप्रदर्शन (अहमदनगर) :**

दि. १६ व १७ ऑगस्ट २०११ : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई नवमहाराष्ट्र युवा अभियान व उन्नती फाउंडेशन, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१६ व १७ ऑगस्ट २०११ रोजी अहमदनगर महानगरपालिकेच्या सभागृहात स्त्रीभ्रूणहत्येविरोधी जनजागृतीसाठी दोन दिवसीय चित्रप्रदर्शन आयोजित करण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन महापौर मा. शीला शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी उपमहापौर मा. गीतांजली काळे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. देविदास आठवले, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे, आयएमएचे अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर, गुलाबराव काळे, डॉ. सुधा कांकरिया, मा. निर्मला मालपाणी आदींची उपस्थिती होती. सदर प्रदर्शनास शहरातील १७ शाळांमधील सुमारे १६०० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी भेट दिली. तसेच शहरातील नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

**जागर महाविद्यालयीन संवाद कार्यक्रम (औरंगाबाद) :**

दि. २९ सप्टेंबर २०११ : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वतीने देवगिरी कला महाविद्यालय, औरंगाबाद येथे दि. २९ सप्टेंबर रोजी जागर हा जाणिवांचा महाविद्यालयीन संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास प्राचार्य प्रदीप जब्दे यांची उपस्थिती होती. यावेळी स्त्रीभ्रूणहत्येविरोधात व आगामी जागर हा जाणिवांचा पदयात्रेसंदर्भात माहिती देणारे प्रा. महेश अचिंतलवार यांचे व्याख्यान झाले. व्याख्यानानंतर चंद्रकांत कुलकर्णी दिग्दर्शित स्त्रीभ्रूणहत्येविरोधात जगजागृती करणारा लघुपट दाखविण्यात आला. तसेच नायगाव ते पुणे पदयात्रेचे फोटो स्लाइड शोद्वारे दाखविण्यात आले. कार्यक्रमाच्या आवारात स्त्रीभ्रूणहत्येविरोधात जगजागृती करणारे पोस्टर्सचे प्रदर्शन उभारण्यात आले होते. या पोस्टर्स प्रदर्शनाला विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमासाठी सुमारे २०० विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या वतीने आयोजित 'जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा'... या उपक्रमांतर्गत सिंदखेडराजा ते औरंगाबाद पदयात्रेचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमाची माहिती देण्याकरिता व आगामी पदयात्रेत तरुण वर्गाचा सहभाग व सहकार्य वाढविण्यासाठी औरंगाबाद, बुलढाणा, जालना आदी शहरांमध्ये जागर महाविद्यालयीन संवाद कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. जागर हा जाणिवांचा उपक्रम व स्त्रीभ्रूणहत्या या सामाजिक समस्येसंदर्भात व्याख्यान व गटचर्चा, माहितीपट व पोस्टर्स प्रदर्शने असे या कार्यक्रमाचे स्वरुप आहे.

**यशवंत युवा फेलोशिप :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियानतर्फे निसर्ग व मानवी जीवनामध्ये भेडसावणाऱ्या विविध मूलभूत प्रश्नांची तीव्रता जाणून सामाजिक क्षेत्रात रचनात्मक कार्य सुरु केलेल्या युवांना प्रोत्साहन, तज्ज्ञांचे मार्गदर्शन व आर्थिक पाठबळ देण्याकरिता २०१० सालापासून यशवंत युवा

फेलोशिप हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. उपक्रमाच्या दुसऱ्या वर्षामध्ये वेगवेगळ्या विभागातील स्थानिक सामाजिक संस्थांना बरोबर घेऊन फेलोशिप उपक्रम राबविला जात आहे. यानुसार कोकण, उत्तर महाराष्ट्र व विदर्भ या तीन विभागांमधून एकूण चार युवा कार्यकर्त्यांची १ वर्षाकरिता फेलो म्हणून निवड केलेली आहे. सदर फेलोंनी या एका वर्षामध्ये निश्चित ध्येय ठेवून त्या-त्या संस्थांतर्गत त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये फलोंकरिता नियमितपणे प्रशिक्षण व अभ्यासदौरेही आयोजित केले जाणार आहेत.

या फेलोशिपअंतर्गत कोकण विभागातील मा. साहिला कुडाळकर (सहभागी संस्था - सह्याद्री निसर्ग मित्र, चिपळूण) यांचा विषय 'जैव विविधता संवर्धन' (स्थानिक समाजघटकांच्या सहभागाने चिपळूण भागातील जैव विविधतेचे संवर्धन, वेगवेगळ्या कृतिकार्यक्रमांच्या सहाय्याने जैव प्रजातींचे संरक्षण आणि सहभागी समाजघटकांना त्याचा लाभ मिळवून देणे) हा असून पर्यावरणतज्ज्ञ मा. भाऊ काटदरे हे त्यांचे मेंटॉर म्हणून कार्य पाहत आहेत. उत्तर महाराष्ट्र विभागातील मा. अजय होले (प्रगती अभियान नाशिक) यांचा विषय 'रोजगार हमी योजना प्रभावी अंमलबजावणी' (रोहयो तरतुदी, वैशिष्ट्ये, यंत्रणा अंमलबजावणीचे तंत्र, येणाऱ्या अडचणी तसेच बांधकामासंबंधी घटकांचा अभ्यास करणे आणि रोहयोच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कृतिकार्यक्रम आखणे) हा असून त्यांचे मेंटॉर म्हणून मा. आश्विनी कुलकर्णी कार्य पाहत आहेत. विदर्भ विभागातून मा. लालसू नागोटी (सहभागी संस्था-सृजन, नागपूर) यांचा विषय ''आदिवासी वन हक्क कायदा' (या कायद्यातील तरतुदी, याची यंत्रणा, अंमलबजावणी, केसेस, सध्याची जनजागृती अभ्यासणे आणि याविषयी पुढाकार घेऊन कृतिकार्यक्रम आखणे) हा असून मा. अजय डोळके त्यांचे मेंटॉर म्हणून कार्य पाहत आहेत. विदर्भ विभागातील मा. स्नेहा धांडे (सहभागी संस्था - धरामित्र, अमरावती) यांचा विषय 'जंगली भाज्यांचे (रानभाज्या) संवर्धन' (स्थानिक समाजघटकांच्या सहभागाने मेळघाट परिसरातील जंगली भाज्यांचे संवर्धन, वेगवेगळ्या कृतिकार्यक्रमांच्या सहाय्याने या जैव प्रजातींचे दस्तैवजीकरण, प्रयोगशालीय पृथःकरण करून पोषणमूल्य ठरवणे आणि सहभागी समाजघटकांना त्याचा लाभ मिळवून देणे) हा असून पर्यावरण तज्ज्ञ मा. तारक काटे हे त्यांचे मेंटॉर म्हणून कार्य पाहत आहेत.

**मा. ना. फौजिया खान यांची अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना भेट : स्त्रीभ्रूणहत्येविरोधात ग्रामसभांमध्ये ठराव मंजूर**

दि. २ ऑक्टोबर २०११ : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या पुढाकाराने अहमदनगर जिल्ह्यातील सारोळा कासार ग्रामपंचायतीच्या वतीने गांधी जयंतीनिमित्त, दि.२ ऑक्टोबर २०११ रोजी जाहिर विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. प्रतिष्ठानच्या विश्वस्त मा. सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली 'जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा...' या उपक्रमाच्या जनजागृतीकरिता ग्रामीण भागात या ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आरोग्य व शिक्षण राज्यमंत्री ना.फौजिया खान, आदिवासी विकास मंत्री ना. बबनराव पाचपुते, अहमदनगर जि.प.उपाध्यक्ष मा. सीताराम देशमुख, सरपंच मा. अर्चना धामणे, उपसरपंच मा. गुलाबराव काळे, यशस्विनी अभियानाच्या उत्तर महाराष्ट्र समन्वयिका मा. निर्मला मालपाणी, नगरसेविका मा. क्रांतिकला अनुभुले, परिक्रमाच्या मा. प्रतिभा पाचपुते, मा. शारदा लगड, मा. हानिफ जरिवाला. मा. नीलेश राऊत यांसह महिला व बालकल्याण, आरोग्य व शिक्षण विभागाचे अधिकारी, व ग्रामस्थ यावेळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

यावेळी मा. फौजिया खान म्हणाल्या की, ''ग्रामपंचायत व ग्रामसभा हे पंचायतराज व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वपूर्ण असे घटक आहेत. तेव्हा प्रत्येक गावाने याविषयीची चळवळ गावागावांमधून हाती घेऊन समाजाची मानसिकता बदलण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. गावांमधील अंगणवाडी सेविका व प्राथमिक केंद्राच्या आरोग्य सेविका यांचाही या कामी एक सक्षम यंत्रणा म्हणून सहभाग घेणे गरजेचे आहे. या दोन घटकांनी समुपदेशनाद्वारे मुलींच्या जन्माचे महत्त्व गावकऱ्यांना पटवून द्यायला हवे.'' ना. पाचपुते म्हणाले की, ''महिला बचतगटांच्या माध्यमातून आज मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झाली आहे. महिला आता स्वावलंबी झाल्या असून सन्मानाने जगत असल्याचे चित्र आहे. तेव्हा महिला बचतगटानेही मुली वाचविण्यासाठी समाजामध्ये जनजागृती केली पाहिजे. यासाठी सारोळा कासार ग्रामपंचायतीने घेतलेला पुढाकार अभिनंदनीय आहे.'' याचे अनुकरण इतर ग्रामपंचायतींनी करावे, असे त्यांनी आवाहन केले.

या जाहीर विशेष ग्रामसभेत उपसरपंच गुलाबराव काळे यांनी गावात स्त्रीभ्रूणहत्येविरोधी जनजागृती अभियान यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या सहाय्याने राबविण्याचा ठराव ग्राम-स्थांसमोर मांडला. सदर ठरावास संजय धामणे यांनी अनुमोदन दिले. उपस्थित सुमारे तीन हजार ग्रामस्थांनी दोन्ही हात उंचावून ठरावास मंजुरी देत टाळ्यांच्या कडकडाटात ठरावाचे स्वागत केले. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या पुढाकाराने सारोळा कासार ग्रामपंचायतीच्या वतीने एकूण निधीपैकी १० टक्के निधी महिला व बाल विकासासाठी राखीव ठेवण्याबाबतचा निर्णय यावेळी घेण्यात आला. या अंतर्गत ना. फौजिया खान यांच्या हस्ते पहिल्या किवा दुसऱ्या स्त्री-अपत्यास जन्म देणाऱ्या गावातील १२ मातांना त्यांच्या मुलींच्या नावे रोख रक्कम रु. २,०००/- चा धनादेश वीस वर्षांच्या मुदत ठेवीसाठी देण्यात आला. त्याचबरोबर गावातील ज्या जोडप्यांना एक किंवा दोन स्त्री-अपत्य आहेत आणि त्यावर त्यांनी कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केली आहे, अशा ९ कुटुंबांचा यावेळी ना. बबनराव पाचपुते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ग्रामसभेपूर्वी स्त्रीभ्रूणहत्येविरोधी जनजागृती पदयात्रा आयोजित करण्यात आले.

तत्पूर्वी ना. फौजिया खान यांनी नगर तालुक्यातील अरणगाव, खंडाळा, अकोळनेर व सोनेवाडी या गावांना भेटी दिल्या. या भेटीदरम्यान प्रत्येक गावातील ग्रामपंचायत कार्यालयांच्या आवारात गावाचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, तलाठी व ग्रामस्थांशी ना. खान यांनी अनौपचारिक संवाद साधून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या वतीने विश्वस्त मा. सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित स्त्रीभ्रूणहत्येविरोधी अभियानात सहभागी होण्याची विनंती केली. या दरम्यान प्रतिष्ठानच्या वतीने तयार करण्यात आलेला ठरावाचा नमुना सरपंचांकडे सुपूर्द करण्यात आला. तसेच उपरोक्त सर्वच ग्रामपंचायत निधीतून स्त्री अपत्यास जन्म दिलेल्या २३ मातांच्या नावे रु. २,०००/- रकमेचा धनादेश मुलींच्या नावे वीस वर्षांच्या मुदतठेव पावती करण्यासाठी ना. खान यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

'जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा'. उपक्रमांतर्गत अहमदनगर व पारनेर तालुक्यातील सर्वच ग्रामपंचायतींना लेखी पत्राद्वारे दि. २ ऑक्टोबर रोजी आयोजित ग्रामसभेत स्त्रीभ्रूणहत्येविरोधी जनजागृती अभियान राबविण्यासंदर्भात ठराव मंजूर करावा, असे आवाहन करण्यात आले. यास प्रतिसाद देत नगर तालुक्यातील ६२ तर पारनेर तालुक्यातील ७९ ग्रामपंचायतींनी तसे ठराव मंजूर केले आहेत.

**नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि पिनॅकल क्लब आयोजित विविध कार्यक्रम :**

नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि पिनॅकल क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने सह्याद्री पर्वतरांगांत हिमालयात मोहिमयशस्वीपणे आयोजित करण्यात आल्या. सह्याद्रीमध्ये ९ भटकंतीच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यात २१७ गिर्यारोहक सहभागी झाले. गिर्यारोहण तसेच साहसाची आवड लहान वयातच (वय वर्षे ८ ते १५) निर्माण होण्यासाठी एकूण ७ साहस शिबिराचे कान्हेरी गुंफा, बोरीवली येथे आयोजन आली. शिबिरात रॅपलिंग, रिव्हर क्रॉसिंग, झुमारिंग, रायफल शूटींग, आकाश निरीक्षण, पशु, पक्षी, फुले निसर्ग यांच्याबद्दल माहिती दाखविण्यात आली. ३ ठिकाणी उंच इमारतीवरून गिर्यारोहणाची प्रात्यक्षिके करून दाखविण्यात आली. त्यांचा लाभ एकूण १४९ लोकांनी घेतला. तसेच तरुणांसाठी गांधी स्मारक/कान्हेरी गुंफा बोरीवली येथे प्रस्तरारोहणाच्या एकूण ४ शिबिरांचे आयोजन करण्यात आले. त्याचा लाभ एकूण ९६ तरुणांनी घेतला.

सलग २३ व्या वर्षी रायगडावरील टकमक टोकावरून रॅपलिंगच्या कार्यक्रम आयोजिण्यात आले. संपूर्ण महाराष्ट्रातून एकूण १०१ गिर्यारोहकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. पूर्वतयारी म्हणून कान्हेरी गुंफा येथे रॅपलिंगबाबत प्रशिक्षण देण्यात आले त्याचा लाभ एकूण १३८ गिर्यारोहकांनी घेतला.

संस्थेच्या ६ तरुणांनी अलिबाग ते रत्नागिरी असेसाहसी मोटर सायकल मोहीम पूर्ण केली. दि. २२/५/२०१० ते १८/६/२०१० या कलावधीत हिमालयात थारकोट (उंची २००१० फूट) तसेच भानोटी (उंची १८५२० फूट) या शिखरावर मोहीम आखण्यात आली. खराब हवामानामुळे थारकोट शिखरावरील मोहीम अर्धवट सोडावी लागली. परंतु भानोटी शिखरावर यशस्वी चढाई करण्यात आली. तसेच दि.२३/८/२०१० ते ३/९/२०१० या कालावधीत हिमालयातील दयारा बुग्यालनचिकेत ताल - यम नोत्री या ठिकाणी यशस्वी मोहीम आखण्यात आली आहे.

❑❑❑


YCP'sAIT
Yashwantrao Chavan Pratishthan's
Academy Of Information Technology
Special Courses
Basics
KIDS
Animation
learn With Fun
Diwali & Christmas
Vacation Batches
Basics & Multimedia
Cool Technology for Kids
Admission Open
Yashwantrao Chavan Pratishthan's
Academy Of Information Technology
Y. B. Chavan Centre, 5th Floor,
Opp. Mantralaya,
Nariman Point, Mumbai - 21.
22817975, 22043617, 09769256343

# अपंग हक्क विकास मंच
## कार्यवृत्त

अपंगांचे विविध प्रश्न संवाद व समन्वयाच्या भूमिकेतून सोडविण्यासाठी अपंग हक्क विकास मंचाची निर्मिती झाली आहे. मंचाच्या संयोजक मा. सुप्रिया सुळे असून समन्वयक विजय कान्हेकर व दत्ता बाळसराफ तसेच संघटक अभिजीत राऊत आणि कार्यालयीन संघटक म्हणून शमीम खान व सुकेशनी मर्चंडे काम पहातात.

• लातूर

दिनांक २६ मार्च ते ३० मार्च २०११

लातूर येथे आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, जीवन विकास प्रतिष्ठान, लातूर, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, शाखा लातूर, यांच्या विद्यमाने लातूर जिल्ह्यातील अपंग व्यक्तिंसाठी मोफत तपासणी व कृत्रिम अवयव वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात एकूण १०० लाभार्थ्यांची नोंदणी होऊन ८५ अपंग लाभार्थ्यांना कृत्रिम अवयव साधने वाटप करण्यात आली. यात जयपूर फूट, जयपूर हॅन्ड, कॅलिपर, तीन चाकी सायकल, ब्रेलकीट गॉगल, ब्लाईंड स्टीक, वॉकर, क्रचेस, श्रवणयंत्र आदी साहित्याचे वाटप करण्यात आले.

या शिबिराचे उद्‌घाटन जिल्हा शल्यचिकित्सक बी.एस.कोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी निवासी वैद्यकिय अधिकारी एस.जी.पाठक, डॉ. वट्टमवार, बी.के.मोकाशी, चंद्रकांत जाधव, ईश्वर आवाळे, विजय कान्हेकर, समन्वयक सुहास तेंडुलकर, आदी मान्यवर उपस्थित होते.

• औरंगाबाद

दिनांक २७ एप्रिल, २०११

आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन, जिल्हा रुग्णालय, औरंगाबाद, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, औरंगाबाद, महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने औरंगाबाद जिल्ह्यातील १५० गरजू अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने (जयपूर फूट, जयपूर हॅंड, कॅलिपर्स, कुबड्या, श्रवणयंत्र, अंधकाठी) वाटप करण्यात आले. या कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. डी.एन.पाटील होते. ते म्हणाले की, ''अपंगांनी आपल्या मनातील न्यूनगंड झुगारुन समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी व्हावे. यापुढेही सातत्याने प्रयत्न करुन आरोग्य विभागा मार्फत कृत्रिम अवयव व साधनांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन दिला जाईल. आपल्याला मिळालेल्या या कृत्रिम अवयव व साधनांचा पुरेसा वापर करावा.''

यावेळी व्यासपीठावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अस्थिव्यंग विभाग प्रमुख डॉ. सी. आर. थोरात, तसेच श्री. सतीश निर्मळ, श्री. संतोष राठोड उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक जिल्हा अपंग समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर, तर उपस्थित मान्यवरांचे स्वागत व आभार प्रदर्शन श्री. राजाभाऊ अष्टमी यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संदिप शिरसाट, नसिम खान, प्रीतम ठाकूर, वसिम खान, प्रदीप नवकीकर, प्रशांत काकडे, एकनाथ बावळे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील अपंग व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

• पाचोड

(औरंगाबाद दिनांक २२ मे. २०११)

सामाजिक न्याय एवम् अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, अपंग हक्क विकास मंच, मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने औरंगाबाद जिल्ह्यातील पाचोड येथे ग्रामीण रुग्णालयात ८० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. गरजू अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधन (जयपूर फुट, जयपूर हॅंड, कॅलिपर्स, कुबड्या, श्रवणयंत्र, अंधकाठी) वाटप करण्यात आली.

• पुणे

दिनांक ४ ते ६ जून, २०११

आरोग्य विभाग महाराष्ट्र राज्य महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद व बाल कल्याण संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने अपंगांसाठी मोफत तपासणी व कृत्रिम अवयव वाटप शिबिराचे आयोजन पुणे जिल्ह्यात करण्यात आले होते. या शिबिरात एकूण ३१४ लाभार्थ्यांची नोंदणी होऊन १०३ लाभार्थ्यांना जयपूर फूट, जयपूर हॅन्ड, कॅलिपर, तीन चाकी सायकल, ब्रेलकीट गॉगल, ब्लाईंड स्टीक, वॉकर, क्रचेस, श्रवणयंत्र आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. तर १३० अपंगांना विविध शासकीय योजनांची

माहिती देण्यात आली. यावेळी नोकर भरती विषयक असणाऱ्या अडचणी, तीन टक्के आरक्षणाचा मुद्दा आदी विषयांवर अपंगांनी चर्चा केली.

या शिबिरात एकूण २११ अपंग लाभार्थी अजून प्रतीक्षा यादीवर आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बाल कल्याण संस्थेच्या विश्वस्त भारतीताई पवार, अपंग हक्क विकास मंचाच्या संयोजिका मा. सुप्रियाताई सुळे, सहाय्यक आयुक्त श्री. दळवी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बिलोलीकर हे उपस्थित होते. तर श्रीमती मिनिता पाटील, श्री. दत्ता बाळसराफ, श्री. विजय कान्हेकर, श्री. सुहास तेंडुलकर, श्री. नीलेश राऊत, श्री. भैय्यासाहेब खैरे, डॉ. श्री. सचिन जाधव, श्री. श्रीधर पाटील यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

**• औरंगाबाद**

दिनांक ८ व ९ जून २०११

आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद औरंगाबाद, यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील अपंग व्यक्तीसाठी मोफत तपासणी व कृत्रिम अवयव वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात एकूण २१५ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी करुन १६५ लाभार्थ्यांना कृत्रिम अवयव व साधने वाटप करण्यात आली. जयपूर फुट, जयपूर हॅन्ड, कॅलिपर, तीन चाकी सायकल, ब्रेलकीट गॉगल, ब्लाईंड स्टीक, वॉकर, क्रचेस, श्रवणयंत्र आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. डी. एन. पाटील, डॉ. चंद्रकांत थोरात, समन्वयक सुहास तेंडुलकर, राजाभाऊ गोकुळअष्टमी आदी उपस्थित होते.

**• जालना**

दिनांक १२ व १३ जून, २०११

सामाजिक न्याय एवम् अधिकारीता मंत्रालय भारत सरकार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, अपंग हक्क विकास मंच, मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद व मत्स्योदरी शिक्षण संस्था जालना यांच्या संयुक्त विद्यमाने जालना जिल्ह्यात अपंगांसाठी मोफत तपासणी व कृत्रिम अवयव वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण २३५ लाभार्थ्यांची नोंदणी होऊन ८५ लाभार्थ्यांना जयपूर फूट, जयपूर हॅन्ड, कॅलिपर, तीन चाकी सायकल, ब्रेलकीट गॉगल, ब्लाईंड स्टीक, वॉकर, क्रचेस, श्रवणयंत्र आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. तर १०० अपंगांना विविध शासकीय योजनांची माहिती, कायदेविषयक सल्ला व मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरात एकूण १२५ अपंग लाभार्थी अजून प्रतीक्षा यादीवर आहेत.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उच्च व तंत्रशिक्षणमंत्री राजेश टोपे, मा. आ. अरविंद चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. राधाकृष्णन, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रताप जाधव, समाज कल्याण अधिकारी शेख, अपंग वित्त आणि विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सुहास काळे, श्री. विजय कान्हेकर, श्री. सुहास तेंडुलकर, मत्स्योदरी संस्थेचे प्राचार्य डॉ. राजेंद्र गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

**• धुळे**

दिनांक २४ व २५ जून, २०११

धुळे जिल्ह्यातील विविध प्रवर्गातील अपंग लाभार्थ्यांना सामाजिक न्याय एवम् अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, अपंग हक्क विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने अपंगांसाठी मोफत तपासणी व कृत्रिम अवयव वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण १४५ लाभार्थ्यांना जयपूर फूट, जयपूर हॅन्ड, कॅलिपर, तीन चाकी सायकल, ब्रेलकीट गॉगल, ब्लाईंड स्टीक, वॉकर, क्रचेस, श्रवणयंत्र आदी साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपायुक्त अपंग कल्याण आयुक्तालय पुणे, श्री अरविंद वळवी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, धुळे, श्रीमती वैशाली हिंजे-देवरे, डॉ. दीपक खलाणे, डॉ. अरुण साळुंखे, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता श्री. विजय पाटील, श्रीमती अनघा ओक, प्रकल्प संचालक श्री. विजय कान्हेकर, समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर व इतर मान्यवरांसह जिल्हाभरातील अपंग लाभार्थी व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी फिरत्या बहुविध पुनर्वसन केंद्राच्या माध्यमातून अपगांच्या पुनर्वसनासाठी संस्था राबवित असलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. प्रकल्प संचालक श्री. विजय कान्हेकर यांनी प्रास्ताविकात अपंगांच्या विविध शासकीय योजनांची माहिती दिली.

**• हिंगोली**

दिनांक २८ व २९ जून २०११

हिंगोली जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्रातर्फे विविध प्रवर्गातील अपंगांसाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक न्याय एवम् अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, अपंग हक्क विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष श्री बाळासाहेब आटकोरे, समाज कल्याण सभापती श्रीमती पुष्पाताई थोरात, जि. प. सदस्य श्री. अनंतराव जगताप, समाज कल्याण अधिकारी श्रीमती संगीता मकरंद, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक बोल्डे, डॉ. मनीष बागडीया, डॉ. कुलकर्णी, प्रकल्प संचालक श्री. विजय कान्हेकर, समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर, श्री अनिल बोरीकर आदींची यावेळी उपस्थिती होती. यावेळी विविध प्रवर्गातील १५० लाभार्थ्यांची नोंदणी करुन ८० लाभार्थ्यांना साहित्य व साधने वाटप करण्यात आले.

• **वाशिम**

दिनांक १ व २ जुलै, २०११

वाशिम येथे सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, हिंगोली, समाज कल्याण विभाग, जि. प. वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने जिजाऊ सांस्कृतिक सभागृह येथे अपंग व्यक्तींसाठी मोफत तपासणी व कृत्रिम अवयव वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात एकूण २२१ लाभार्थ्यांना कृत्रिम अवयव साधने वाटप करण्यात आली. यात जयपूर फूट, जयपूर हॅण्ड, कॅलीपर, तीन चाकी सायकल, वॉकर, कुबडी, ब्रेलकिट, अंध गॉगल, अंध काठी, श्रवण यंत्र आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी समाज कल्याण विभागाचे श्री. पुंड साहेब, समन्वयक सुहास तेंडुलकर आदी मान्यवर उपस्थित होते.

• **नंदूरबार**

दिनांक २९, ३० व ३१ जुलै २०११

नंदूरबार येथे सामाजिक न्याय एवंम् अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ शाखा धुळे, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद नंदुरबार, यांच्या संयुक्त विद्यमाने नंदूरबार येथील महात्मा फुले विद्यालय, कोरीट रोड येथे अपंग व्यक्तींसाठी मोफत तपासणी व कृत्रिम अवयव वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण २१० लाभार्थ्यांची नोंदणी होऊन १९० लाभार्थ्यांना कृत्रिम अवयव व साधने वाटप करण्यात आली. यात जयपूर फूट, जयपूर हॅण्ड, कॅलीपर, तीन चाकी सायकल, वॉकर, कुबडी, ब्रेलकिट, अंध गॉगल, अंध काठी, श्रवण यंत्र आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. समन्वयक सुहास तेंडुलकर आदी मान्यवर उपस्थित होते.

• **सोलापूर,**

दिनांक २२ जुलै ते ७ ऑगस्ट, २०११

सोलापूर जिल्हा प्रशासनाच्यावतीने समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, महात्मा गांधी सेवा संघ व अपंग हक्क विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २२ जुलै ते ७ ऑगस्ट या दरम्यान सोलापूर जिल्ह्यातील अपंगांसाठी तालुका निहाय शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांत सर्व प्रवर्गातील अपंगांची नोंदणी करुन त्यांना वैद्यकीय प्रमाणपत्रे, बसचे पासेस, रेल्वे पास, अपंग ओळखपत्र देऊन या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींतर्फे त्यांना विविध विषयाची माहिती देण्यात आली. तसेच गरजू अपंगांची कृत्रिम अवयव व साधनांसाठी नोंदणी करुन घेण्यात आली.

या जिल्ह्याभरातील मेळाव्यात एकूण ७५० अंध, ७७७ कर्णबधिर, १६१४ अस्थिव्यंग व ४४८ मतीमंद अशा एकूण ३५८९ विशेष व्यक्तींनी सहभाग घेतला. या लाभार्थ्यांना सर्व प्रमाणपत्रे देण्यात आली.

या मेळाव्यात यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने काही लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रतिनिधिक स्वरुपात जयपूर फूट, जयपूर हॅन्ड, कॅलिपर, तीन चाकी सायकल, ब्रेलकीट गॉगल, ब्लाईंड स्टीक, वॉकर, क्रचेस, श्रवणयंत्र आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी सोलापूरचे पालक मंत्री मा. प्रा. लक्ष्मण ढोबळे, आमदार गणपतराव देशमुख, आमदार दीपक साळुंके पाटील, तहसीलदार सुधील भोसले, पंचायत समिती सभापती बाळासाहेब काटकूर, उपसभापती संतोष देवकते, नगर परिषदेचे विरोधी पक्षनेते नवनाथ पवार, युवा नेते चंद्रकांत देशमुख तसेच महात्मा गांधी सेवा संघाचे स्वयंसेवक व तंत्रज्ञ प्रदीप नावकीकर, मोहित तोमर, चांदोबा बिरागड, दादामियाँ आदी उपस्थित होते.

❑❑❑

# शिक्षण विकास मंच
# कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईने शिक्षणविषयक कार्यासाठी शिक्षण विकास मंचाची स्थापना केली असून गेल्या तीन वर्षापासून हा मंच कार्यरत आहे. मा. सुप्रिया सुळे शिक्षण विकास मंचाच्या निमंत्रक म्हणून, तर राज्यात व केंद्रात शिक्षण विभागाच्या सचिव पदाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळलेल्या व शिक्षण क्षेत्रात मानाचे स्थान असलेल्या डॉ. कुमुद बन्सल प्रमुख संयोजक म्हणून या कार्याची जबाबदारी पाहतात. डॉ. वसंत काळपांडे, श्रीमती बसंती रॉय हे विशेष सल्लागार, दत्ता बाळसराफ हे संयोजक, तर सुरेश पाटील, माधव सूर्यवंशी, मिनल सावंत हे समन्वक म्हणून काम पाहतात. या कामात ज्येष्ठ पत्रकार श्रीमती शुभदा चौकर यांचे वेळोवेळी होणारे सहाय्यही महत्त्वाचे आहे. शिक्षण विकास मंचाच्या कार्यात वेळोवेळी राज्यातील शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांची मदत घेण्यात येते.

**बाल आनंद मेळावा व वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम -**

दि. २ फेब्रु. २०११

गुहिणी, ता. भोर, जि. पुणे

शिक्षण विकास मंचच्यावतीने भुतोंडे केंद्रातील गुहिणी येथे बाल आनंद मेळावा आयोजित करण्यात आला. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी शिवचरित्रावर आधारित 'शिवसूर्य' हे ऐतिहासिक नाटक पारंपारिक वेशभूषेद्वारे सादर केले. या बाल आनंद मेळाव्यातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करण्यासाठी ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविला. त्यावेळी शिक्षण विकास मंचच्या मुख्य संयोजक डॉ. कुमुद बन्सल, विशेष सल्लागार डॉ. वसंत काळपांडे, शिक्षणाधिकारी, डॉ. दत्तात्रय शेंडकर, गटशिक्षणाधिकारी मा. अशोक कडलक यांनी यावेळी शिक्षकांना तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन मा. आप्पा सावंत व त्यांच्या सहकार्याने उत्कृष्टपणे पार पाडले. यावेळी श्री. दत्ता बाळसराफ, श्री. सुरेश पाटील, श्री. नीलेश राऊत तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

**आढावा बैठक -**

दि. ९ फेब्रु. २०११

शिक्षण विकास मंचच्या मुख्य संयोजक डॉ. कुमुद बन्सल यांच्या प्रमुख उपस्थितीत पुढील कार्यक्रमाच्या नियोजनासाठी आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीसाठी शिक्षण विकास मंचचे सल्लागार डॉ. वसंत काळपांडे, श्रीमती बसंती रॉय, संयोजक दत्ता बाळसराफ, समन्वयक सुरेश पाटील, माधव सूर्यवंशी, मिनल सावंत हे उपस्थित होते.

**आढावा बैठक - शिक्षण कट्टा सुरु करणेसंदर्भात चर्चा**

दि. २५ फेब्रु. २०११

शिक्षण विकास मंचच्या मुख्य संयोजक डॉ. कुमुद बन्सल यांच्या प्रमुख उपस्थितीत पुढील बैठक घेण्यात आली. या बैठकीसाठी शिक्षण विकास मंचचे सल्लागार डॉ. वसंत काळपांडे, श्रीमती बसंती रॉय, श्रीमती शुभदा चौकर उपस्थित होत्या. सदर बैठकीत शिक्षण विकास मंचच्यावतीने ''शिक्षण कट्टा'' हा उपक्रम सुरु करण्यात यावा असे ठरले. शिक्षण विषयक विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी मुंबई व उपनगर परिसरातील मुख्याध्यापक, शिक्षक, अधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार व पालक या सर्वांचा सहभाग असेल. याद्वारे शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी शिफारशी करणे तसेच शिक्षणातील विविध अडचणी/समस्यांची चर्चा करणे, प्रचलित शैक्षणिक उपक्रमांचा परामर्श घेऊन त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी सूचना देणे, शिक्षकांची व्यावसायिक क्षमता उंचावण्यासाठी विविध स्रोतांचा शोध घेणे, चांगले शैक्षणिक उपक्रम/प्रयोग यांचे आदान-प्रदान करणे या व अशा विविध उद्देश असणाऱ्यांचे शिक्षण कट्टा हे व्यासपीठ असणार आहे. या उपक्रमाच्या समन्वयक श्रीमती बसंती रॉय असणार आहेत. श्रीमती नझमा काझी, श्रीमती सुचिता भवाळकर, श्रीमती राज अलोनी, श्रीमती रेखा विजयकर, श्री. मोहन फणसेकर, श्री. माधव सूर्यवंशी तसेच इतर मान्यवर मंडळींचाही आयोजनामध्ये सक्रीय सहभाग असतो.

**दि. १५ मार्च २०११**

शिक्षण विकास मंचच्यावतीने निसर्ग कार्यालय, पुणे येथे आगामी काळात घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांच्या नियोजनासाठी बैठक आयोजित करण्यात आली. जिल्हा परिषद

प्राथमिक शाळांच्या-स्तरावर खेळ, नाटके, संगीत, नृत्य आणि सांस्कृतिक कार्यक्रम या क्षेत्रात तालुका आणि जिल्हा पातळीवर स्पर्धा होत असतात आणि त्यांना विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांचा प्रतिसादही चांगला मिळत असतो. पण अभ्यासक्रमाशी संबंधित स्पर्धा जवळ-जवळ होतच नाही. शिक्षण विकास मंचच्या वतीने आगामी काळात शैक्षणिक वर्षात अभ्यासक्रमाशी संबंधित स्पर्धा आयोजित करण्याबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली. यामध्ये दोन प्रकारच्या स्पर्धा घेण्यात याव्या असे ठरले. **'माझा गाव'** या विषयावर सर्वेक्षणात्मक प्रकल्प, गणित, मराठी आणि इंग्रजी या तीन विषयात प्रश्नमंजुषा या स्पर्धा केंद्र, तालुका, जिल्हा आणि राज्य या चार स्तरांवर आयोजित करण्यात याव्यात असे या बैठकीत ठरले. या बैठकीसाठी डॉ. वसंत काळपांडे, श्रीमती बसंती रॉय श्री. दत्ता बाळसराफ, श्रीमती संध्या इदलाबादकर, श्रीमती दीपा देशमुख, सुरेश पाटील तसेच पुण्यातील काही प्रमुख शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते.

**आढावा बैठक –**

दि. २५ आणि २६ मार्च २०११

शिक्षण विकास मंचच्या वतीने घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमांच्या तयारीसाठी डॉ. कुमुद बन्सल यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली. यावेळी शिक्षण विकास मंचच्या वतीने आगामी काळात घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांबाबत चर्चा झाली. या बैठकीसाठी डॉ. वसंत काळपांडे, श्रीमती बसंती रॉय, श्री. दत्ता बाळसराफ, श्री. विजय जामसंडेकर, श्री. सुरेश पाटील, श्री. माधव सूर्यवंशी इ. उपस्थित होते. दि. २६ मार्च २०११ रोजी शिक्षण विकास मंचच्या निमंत्रक मा. सुप्रियाताई सुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली.

**दत्तक शाळा –**

दि. ५ एप्रिल २०११

राज्य शासनाने आणि केंद्र शासनाने प्राथमिक शिक्षणाच्या विकासासाठी अनेक योजना हाती घेतल्या असून त्यासाठी पुरेसा निधीही उपलब्ध करून दिला आहे. असे असले तरी सध्या सुरु असलेल्या प्रयत्नांना पूरक ठरेल अशा रीतीने या योजनांची शाळांच्या स्तरावर योग्य रीतीने अंमलबजावणी होत असल्याची खात्री करून घेणे, अंमलबजावणीशी संबंधित असणारी शालेय शिक्षण विभागाची विविध कार्यालये आणि शासनाचे इतर संबंधित विभाग यांचा परस्पर संबंध प्रभावी असणे याबाबी सुद्धा खूपच महत्त्वाच्या आहेत.

याच उद्देशाने शिक्षण विकास मंचच्या वतीने पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील भुतोंडे आणि बारामती तालुक्यातील मुरटी या दोन केंद्रांतील अनुक्रमे ९ आणि १४ अशा एकूण २३ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दत्तक घेतल्या आहेत. या सर्व शाळांना अधून-मधून भेटी देऊन त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी किंवा अडचणी सोडविण्यासाठी जिल्हा परिषद पुणे किंवा कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा. शिक्षण विकास मंचच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे यांनी मुरटी केंद्रास भेट देऊन शाळेतील विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. यावेळी पुणे जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (प्रा.) मा. शेंडकर, बारामतीचे गटशिक्षणाधिकारी, मा.कदम, मा. दत्ता बाळसराफ, मा. सुरेश पाटील इ. उपस्थित होते.

**शिक्षण कट्टा –**

दि. ३० एप्रिल २०११

शिक्षण कट्ट्याच्या पहिल्या सत्रात 'विद्यार्थ्यांची वर्तणूक संहिता व शिस्तीचे प्रश्न' या विषयावर चर्चा आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस श्रीमती बसंती रॉय यांनी याबाबतची भूमिका विषद केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. वसंत काळपांडे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ मानसोपचार तज्ज्ञ डॉ. आशीष देशपांडे उपस्थित होते. या शिक्षण कट्ट्याला श्रीमती शुभदा चौकर, श्रीमती सुचिता भवाळकर, श्रीमती फ्रेणी मेहता, श्रीमती राज अलोनी, श्रीमती नझमा काझी, श्री. विलास कांबळे, श्री. सुरेश पाटील, श्री. माधव सूर्यवंशी व इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे बैठक**

दि. २२ जून २०११

शिक्षण विकास मंचच्या वतीने राष्ट्रीय शिक्षण दिनाच्या निमित्ताने दि. ११ नोव्हेंबर २०१० रोजी शाळांची परिणाम कारकता या विषयावर परिषद घेण्यात आली. या परिषदेच्या अनुषंगाने शिक्षण विकास मंचच्या वतीने शालेय प्रतवारी तयार करण्यात आली. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने तयार केलेल्या प्रतवारीमध्ये यामधील काही प्रमुख बाबींचा समावेश व्हावा यासाठी डॉ. कुमुद बन्सल, मुख्य संयोजक तसेच राज्य शिक्षण मंडळाचे प्रमुख अधिकारी यांचे सोबत पुण्यात बैठक पार पडली. या बैठकीसाठी श्रीमती बसंती रॉय, श्री. दत्ता बळसराफ, श्री. सुरेश पाटील इ. उपस्थित होते.

**तंबाखूविरोधी बालमहोत्सव**

दि. ४ आणि ५ जुलै २०११

तंबाखूमुळे दरवर्षी जगात जवळ-जवळ ५४ लाख तर भारतात १० लाखांहून अधिक व्यक्ती मरण पावतात. जगात आणि खास करून भारतात तंबाखू सेवनाची समस्या अत्यंत गहन आहे. भारत जो विकसनशील देश आहे. तिथे तंबाखूमुळे होणारे व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, आरोग्य आणि पर्यावरणाचे नुकसान हे देशाच्या विकासासाठी हानिकारक आहे. तंबाखूमुळे मरणाऱ्यांपैकी बहुतांश व्यक्ती प्रौढ आणि उत्पादक वयोगटातील असतात. प्रौढ आणि उत्पादक वयोगटात मरणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या कुमारावस्थेत व युवावस्थेत तंबाखू सेवनाची सवय लागते. त्यामुळे समाजातील विविध घटकांसोबतच मुलामुलींना तंबाखूच्या दुष्परिणामांबाबत मोठ्या प्रमाणावर जागरुक करून त्यांना तंबाखू सेवनापासून दूर ठेवणे आवश्यक आहे.

त्यासाठी सलाम मुंबई फाऊंडेशन आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्यावतीने बारामती येथे तंबाखूविरोधी बालमहोत्सव आयोजित करण्यात आला. दि. ४ आणि ५ जुलै २०११ रोजी सदर बालमहोत्सव आयोजित करण्यात आला. यासाठी मा. सुप्रिया सुळे, सलाम मुंबई फाऊंडेशनच्या विश्वस्त, श्रीमती पद्मीणी सोमाणी, मा. दत्ता बाळसराफ, श्रीमती राजश्री कदम, श्री. सुरेश पाटील, श्री. अजय पिळणकर, श्री. दीपक पाटील इ. उपस्थित होते. या बालमहोत्सव मेळाव्यात एकूण ५०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. 'मनोरंजनातून उद्बोधन' या उक्तीद्वारे तंबाखूविरोधी संदेश विविध खेळांच्या माध्यमातून देण्यात आला.

**शिक्षण कट्टा**

दि. २३ जुलै २०११

शिक्षण कट्ट्याच्या दुसऱ्या सत्रात शनिवार दि. २३ जुलै २०११ रोजी 'सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन' (Continuous Comprehensive Evaluation) या विषयावर चर्चा आयोजित करण्यात आली. नांदेडचे ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ मा. हरी नारलावार यांनी यावर सविस्तर विवेचन केले. आपल्या देशातील गुरुकुल शिक्षण पद्धतीत गुरु शिष्याचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करीत असत. नंतरच्या काळात परीक्षा पद्धतीचा पगडा वाढला. त्यातून अनेक समस्या निर्माण होत गेल्या. विद्यार्थी आणि पालक यांच्यावर परीक्षेचे दडपण वाढत गेले. याला परीक्षा पद्धतीतील त्रुटी/दोष/उणिवा कारणीभूत आहेत. परीक्षा पद्धतीतील दोष घालविण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धतीचा आग्रह धरण्यात आला आहे. मूल्यमापन प्रक्रिया आणि परीक्षा पद्धतीमध्ये सुधारणेबाबत सूचना तसेच मूल्यमापन हा अध्ययन-अध्यापन पद्धतीचा एक अंगभूत भाग होय. निकोप शैक्षणिक तंत्राचा भाग म्हणून शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी परीक्षा घेतल्या गेल्या पाहिजेत.

सातत्यपूर्ण सर्वांकष मूल्यमापन कार्यपद्धतीमुळे खालील प्रमुख गोष्टी साध्य होतील, असे यावेळी मा. नारलावार यांनी सांगितले.

१. या पद्धतीमुळे अध्ययन सुरु असतानाच नियमितपणे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन होईल.

२. वेळोवेळी मिळालेले मार्गदर्शन, सकारात्मक शेरे यामुळे विद्यार्थ्यांना शिकण्याची प्रेरणा मिळावी.

३. या मूल्यमापन पद्धतीच्या अवलंबनामुळे शिक्षण प्रक्रिया जीवनाशी जोडली जाण्यास मदत होईल.

४. विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण मूल्यमापन होत असल्यामुळे शिक्षकांनाही वेळोवेळी आपल्या अध्यापनातील उणिवा लक्षात घेऊन त्या वेळीच दूर करण्याची संधी मिळेल.

५. शिक्षकांच्या उपक्रमशीलतेला, प्रयोगशीलतेला आणि कल्पकतेला अधिक चालना मिळेल.

६. पालकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत माहिती मिळेल.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. वसंत काळपांडे होते. श्रीमती बसंती रॉय यांनी शिक्षण कट्ट्याबाबतची पार्श्वभूमी विषद करून मागील शिक्षण कट्ट्याच्या विषयाची थोडक्यात माहिती दिली. यावेळी श्री. दत्ता बाळसराफ, श्री. सुरेश पाटील, श्री. माधव सूर्यवंशी, श्रीमती शुभदा चौकर, श्रीमती सुचिता भवाळकर तसेच इतर प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

❑❑❑

# सृजन, लोकसंवाद व चित्रपट चावडी
# कार्यवृत्त

## सृजन

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर विभागामार्फत शालेय विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास आणि विविध कलांची तोंडओळख करून त्यांचे विद्यार्थी जीवन समृध्द व्हावे यासाठी सृजन हा अभिनव उपक्रम चालविण्यात येतो. सृजनच्या माध्यमातून समाजातील मान्यवर व्यक्तींच्या सृर्जनशीलतेचा अविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सृप्त कलागुणांना वाव देण्याचा हा प्रयत्न आहे.

सृजनची संकल्पना व संयोजन मा. सौ. सुप्रियाताई सुळे यांची असून यामध्ये सन्माननीय सल्लागार म्हणून सुप्रसिध्द चित्रकार श्री. डग्लस जॉन आणि सुलेखनकार श्री शुभानंद जोग काम पाहतात.

दर महिन्याच्या पहिल्या रविवारी सृजन कार्यशाळा स. ९.०० वा. चव्हाण सेंटरमध्ये आयोजित करण्यात येते. श्री. विद्याधर खंडे या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम पाहतात.

| अनु. | दिनांक | विषय | प्रशिक्षक |
|---|---|---|---|
| १. | ९-२-११ | स्टडी डेव्हलपमेंट | श्री. अरुण नाईक |
| २. | १२-६-११ | ॲनिमेशन | श्री. अनंत देशमुख |
| ३. | ३-७-११ | नाट्यानुभव | श्री. आशुतोष आपटे |
| ४. | ४-८-११ | क्ले वर्क | श्रीमती स्वाती गांगल |
| ५. | ४-९-११ | ओरीगामी | श्रीमती सम्यका अहिरे |
| ६. | ९-१०-११ | सिव्हिल डिफेन्स | अग्निशमन दल |

## लोकसंवाद व चित्रपट चावडी

''देशातील विचारवंत, कलावंत, लेखक, शास्त्रज्ञ व संशोधक यांच्या प्रयत्नाने निर्माण होणारे विचारधन हेच समाजाचे फार मोठे धन आहे असे मी आणि महाराष्ट्र शासन मानते. ते असले तरच देश ओळखला जातो, समाज ओळखला जातो. समाजाचे जीवन प्रवाही राहते, चिरंतन राहते. समाज जिवंत राहतो तो त्यांच्या जवळ असलेल्या भौतिक सामर्थ्याने नव्हे, तर त्याच्या जवळ असलेल्या सांस्कृतिक मूल्यांवर आणि विचारधनावर तो जिवंत राहतो आणि वाढतो. असाच इतिहासाचा दाखला आहे.'' – **यशवंतराव चव्हाण**

(संदर्भ – महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळाचे उद्घाटन नागपूर दि.२२ डिसेंबर १९६०)

लोकसंवाद उपक्रमात चित्रपट, (माहितीपट, लघुपट) ग्रंथ तसेच चालू घडामोडींवर जाणकारांसोबत मनमोकळी चर्चा होते. समाजातील सर्व स्तरांत सांस्कृतिक जाण वाढावी यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास वाटतो. या योजनेत दर महिन्यात एकदा होणाऱ्या कार्यक्रमाला सर्वांना अगत्यपूर्वक निमंत्रण आहे.

चित्रपट हे आजच्या काळातले सर्वात प्रभावी आणि लोकप्रिय माध्यम आहे. चित्रपट आज आपल्या रोजच्या जगण्याचा भाग बनला आहे. आपल्या प्रत्येक विचारात, प्रत्येक कृतीत आणि अनुभवात सिनेमा प्रत्यक्ष – अप्रत्यक्ष असतोच. आपल्या रोजच्या जगण्याला तो त्वचेसारखा 'घट्ट' जखडलेला आहे.

विलक्षण अनुभव देणारे मात्र सर्वसामान्य रसिकापर्यंत पोहचू न शकणारे अनेक चित्रपट 'सिनेमा' या माध्यमाला समृद्ध करीत असतात. असे चित्रपट आणि रसिक यांच्यात थेट भेट घडवून आणण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्यावतीने 'चित्रपट चावडी' या उपक्रमाची सुरुवात केली आहे. त्याचं नाव आहे 'अनुभव'. हा चित्रपट प्रेमींचा स्वतःचा 'अड्डा' असेल. केवळ चित्रपट पाहणे नव्हे तर त्यावर खुलेपणाने चर्चा करून चित्रपट या माध्यमाचं आकलन वाढवणं हा चावडीच्या स्थापनेमागचा मूळ उद्देश आहे.

श्री. शरद काळे व श्री. रवी बुद्धीराजा यांच्या मार्गदर्शनाने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. चव्हाण सेंटरच्या चौथ्या मजल्यावरील सांस्कृतिक सभागृह/रंगस्वर सभागृहात हे कार्यक्रम होतात. कार्यक्रमाचे संयोजन श्रीमती ममता कानडे व श्री. दत्ता बाळसराफ करतात. तर समन्यक म्हणून सुरेश पाटील, भक्ती भावे, अमृता मोरे जबाबदारी पाहतात.

❑❑❑

# वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अंतर्गत 'वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान' या नावाने पर्यावरणावर काम करणाऱ्या विभागाची स्थापना करण्यात आली आहे. मा. सुप्रिया सुळे या विभागाच्या निमंत्रक आहेत. या विभागाचे विशेष सल्लागार श्री. सदा डुंबरे, संयोजक दत्ता बाळसराफ व समन्वयक प्रशांत शिंदे, अमेय जगताप, सुरेश पाटील आहेत. त्यांना श्रीमती वंदना चव्हाण, श्री. अभिजित घोरपडे, श्री. पार्थ बापट, सचिन टिवले, अमृता प्रधान यांचे सहकार्य लाभते. महाराष्ट्रातील पर्यावरणीय प्रश्न, माती-पाणी-हवा-जंगल आणि जैवविविधतेच्या संवर्धनाचे प्रश्न आणि त्यासाठी उल्लेखनीय काम करणाऱ्या संस्था-संघटना व्यक्तींची दखल या विभागातर्फे घेण्यात येईल. त्याचबरोबर पर्यावरणीय प्रश्नांचे धोरणात्मक स्वरुप आणि अपेक्षित बदल सर्वांमोर मांडण्यासाठी शिबीर-कार्यशाळा-परिषदा-क्षेत्रभेटी आणि अध्ययन करण्यात येईल.

• दिनांक : १८ जून २०११. वेळ : सकाळी १० ते ११-३० स्थळ : महाराष्ट्र हायस्कूल क्र. २, दादर (प.) विद्यार्थ्यांची संख्या : ८ वी व ९ वी चे १२५ विद्यार्थी

महाराष्ट्र हायस्कूल क्र. २ च्या मुख्याध्यापिका श्रीम. सुनंदा शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख वक्त्या डॉ. श्रेया भानप यांनी हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढ या विषयावर स्लाईड शो दाखविला आणि हा कृती प्रकल्प वर्षभर विद्यार्थ्यांसोबत कसा राबविला जाणार आहे याची माहिती दिली. त्यानंतर ऊर्जा संवर्धनासाठी शाळेतील विजेच्या वापराचे ऑडिट करण्याचा उपक्रम विद्यार्थ्यांना देण्यात आला. त्यासाठी आधी कार्यक्रम घेतलेल्या हॉलचे वीजेचे ऑडिट श्रीम. श्रेया भानप यांनी विद्यार्थ्यांना सृष्टीज्ञान संस्थेने तयार केलेल्या मार्गदर्शक तक्त्यानुसार तयार करून दाखविले. उर्वरीत शाळेचे वीजेचे ऑडिट करण्यासाठी या मार्गदर्शक तक्त्याच्या प्रती शिक्षकांना देण्यात आल्या. या कार्यक्रमाच्या आयोजनात शाळेतील शिक्षिका श्रीम.आसावरी पेडणेकर व श्रीम. सुरेखा वाघमारे यांचे सहकार्य मिळाले.

• दिनांक : १८ जून २०११. वेळ : सकाळी १०-३० ते १२ स्थळ : नवभारत विद्यालय, परळ विद्यार्थ्यांची संख्या : ८ वी चे ८० विद्यार्थी

नवभारत विद्यालयाच्या शिक्षिका श्रीम. वेदा गोसावी यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख वक्त्या श्रीम. संगीता खरात यांनी हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढ या विषयावर स्लाईड शो घेतला आणि हा कृती प्रकल्प वर्षभर विद्यार्थ्यांसोबत कसा राबविला जाणार आहे याची माहीती दिली. त्यानंतर ऊर्जा संवर्धनासाठी शाळेतील विजेच्या वापराचे ऑडिट करण्याचा उपक्रम विद्यार्थ्यांना देण्यात आला. त्यासाठी आधी कार्यक्रम घेतलेल्या हॉलचे वीजेचे ऑडीट श्रीम. संगीता खरात यांनी विद्यार्थ्यांना सृष्टीज्ञान संस्थेने तयार केलेल्या मार्गदर्शक तक्त्यानुसार तयार करून दाखविले. उर्वरीत शाळेचे विजेचे ऑडिट करण्यासाठी या मार्गदर्शक तक्त्याच्या प्रती शिक्षकांना देण्यात आल्या. या कार्यक्रमाच्या आयोजनात सृष्टीज्ञान संस्थेच्या श्रीम. ज्योती खोपकर यांचे सहकार्य मिळाले.

• दिनांक : २५ जून २०११. वेळ : दुपारी २-३० ते ४ स्थळ : साधना विद्यालय, सायन विद्यार्थ्यांची संख्या : ९ वी चे २०० विद्यार्थी

साधना विद्यालयाच्या शिक्षिका श्रीम. ज्योत्स्ना दळवी यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख वक्ते श्री. प्रशांत शिंदे यांनी हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढ या विषयावर स्लाईड शो घेतला आणि हा कृती प्रकल्प वर्षभर विद्यार्थ्यांसोबत कसा राबविला जाणार आहे याची माहिती दिली. त्यानंतर ऊर्जा संवर्धनासाठी शाळेतील विजेच्या वापराचे ऑडिट करण्याचा प्रयोग विद्यार्थ्यांनी केला. त्यासाठी मुलांनी हॉलमधील ३२ ट्युबलाईट आणि १५ पंख्यांचे पॉईंट मोजले व त्यासाठी होणारा विजेचा वापर व विजबिलाचा खर्च काढला.

उदा. एक ट्युबलाईट दररोज साडेतीन तास वापरली तर दरवर्षी त्यामधून १०७ किलो कार्बन डायऑक्साईड वायूचे उत्सर्जन होते आणि दरवर्षी रुपये ५११/- विजबिल येते. याचा अर्थ, १०७ किलो कार्बन डायऑक्साईड गुणिले ३२ ट्युबलाईट बरोबर ३४२४ किलो कार्बन डायऑक्साईड वायूचे उत्सर्जन होते. तर वीज बिल ५११ गुणिले ३२ ट्युबलाईट बरोबर रुपये १६३५२/- इतके होते.

याची तुलना सीएफएल या कमी ऊर्जाधारक बल्बशी केल्यास दरवर्षी एका बल्बमधून अंदाजे २१ किलो कार्बन डायऑक्साईड वायूचे उत्सर्जन होते आणि दरवर्षी रुपये १०२/- विजबिल येते. याचा अर्थ, २१ किलो कार्बन डायऑक्साईड गुणिले ३२ सीएफएल बल्ब बरोबर ६७२ किलो कार्बन डायऑक्साईड वायूचे उत्सर्जन होते. तर वीज बिल १०२ गुणिले ३२ सीएफएल बल्ब बरोबर रुपये ३२६४/- इतके होते.

निष्कर्ष असा निघतो की ट्युबलाईटच्या जागी सीएफएल बल्ब लावल्यास शाळेच्या हॉलमधून दरवर्षी १३०८८/- रुपयांची बचत होऊ शकते आणि दरवर्षी अंदाजे २७५२ किलो कार्बन डायऑक्साईड वायूचे उत्सर्जन कमी होते.

अशा चर्चेनंतर अनेक विद्यार्थ्यांनी आपण सीएफएल बल्ब वापरण्यासाठी पालकांशी संवाद साधणार असल्याचे जाहीर केले, तसेच हा वीजबचतीचा हा हिशोब शाळेच्या मुख्याध्यापकांच्या निदर्शनास आणून देण्याचे ठरविले.

**पर्यावरणस्नेही शाळा-हवामान बदलविषयक शिक्षण व कृती प्रकल्प:** आपल्या पर्यावरणाला ग्रासून टाकणारी एक समस्या म्हणून हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढीकडे आपण पाहत आहोत. हा विषय केवळ चर्चेपुरता उरला नसून आता प्रत्यक्ष कृती करावयाची वेळ आली आहे. म्हणूनच जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदल या संकल्पना, तसेच त्याच्या पर्यावरण आणि मानवी जीवनावर होणाऱ्या परिणामांबद्दल जाणीव-जागृती निर्माण करण्यासाठी शाळांसाठी शिक्षण व कृती प्रकल्प जून २०११ पासून मुंबईतील १० शाळांमध्ये राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पांतर्गत जलसंवर्धन, वृक्षसंवर्धन आणि कचरा नको या संकल्पनांवर आधारीत ३० कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये दहा शाळांचे मिळून साधारण १००० विद्यार्थी सहभागी होते.

जलसंवर्धनाबाबत घेण्यात आलेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पाण्याचा होणारा अपव्यय समजून घेतला, त्यासाठी पाणी कशा पद्धतीने वाया घालविले जाते याचे दर्शन घडविणारा खेळ घेण्यात आला. प्रत्यक्ष अनुभवातून विद्यार्थ्यांच्या लक्षात आल्यामुळे त्यांनी शाळेत आणि वैयक्तिक जीवनात पाणी वाया जाणार नाही याबाबत दक्ष राहण्याचा संकल्प जाहिर केला. वृक्षराजीचे कार्बनडाय ऑक्साईड शोषून घेण्याचे महत्त्व लक्षात आणून देणारा स्लाईड शो विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. वृक्षांचे घटणारे प्रमाण लक्षात आल्यावर विद्यार्थ्यांनी त्यांच्या पातळीवर वृक्षसंवर्धन करण्याचा मनोदय व्यक्त केला. त्याप्रमाणे, प्रत्येक शाळेत विद्यार्थ्यांनी मैदान किंवा गच्चीवरील जागेत विविध प्रकारच्या रोपांची लागवड केली. या रोपांमध्ये प्रामुख्याने कडुनींब, अडुळसा, तुळस, शतावरी, पानफुटी, ओवा, जास्वंद अशा स्थानिक प्रजातींचा समावेश आहे. गोरेगावमधील प्रज्ञाबोधिनी शाळेतील विद्यार्थ्यांनी केलेले कार्य अत्यंत उल्लेखनीय आहे. त्यांनी शाळेच्या संपूर्ण गच्चीवर फळझाडे, औषधी वनस्पती, फुलपाखरांना आकर्षित करणारी रोपे तसेच दैनंदिन वापरातील भाज्यांची लागवड करून वातावरण हिरवेगार करून टाकले आहे. या सर्व उपक्रमांमध्ये वसुंधरा अभियानतर्फे प्रशांत शिंदे आणि सृष्टीज्ञान संस्थेतर्फे संगीता खरात, ज्योती खोपकर आणि श्रेया भानप यांचा सक्रीय सहभाग राहिला आहे.

**श्री गजानन महाराज संस्थानला भेट :** माननीय सुप्रियाताईंच्या पुढाकाराने दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी शेगाव येथील श्री गजानन महाराज संस्थानला, प्रतिष्ठानच्या अभ्यासगटाने भेट दिली. या अभ्यासगटात वसुंधरा अभियानाच्या प्रशांत शिंदे आणि अमेय जगताप यांचा समावेश होता. श्री गजानन महाराजांवरील श्रद्धेपोटी संपूर्ण महाराष्ट्रातून आणि जगभरातून मिळालेल्या कोट्यावधी रुपयांचा संचय न करता त्याचा वापर आध्यात्मिक आणि सामाजिक कामाकरिता करण्याचे व्रत या संस्थानातर्फे अत्यंत निरपेक्षपणे आणि सक्षमपणे पूर्ण केले जात असल्याचा अनुभव आला. शेगाव परिसरातील जनतेच्या आरोग्य, शेती, रोजगार आणि शैक्षणिक विकासाला संस्थानाच्या विविध प्रकल्पांतून बहुमोल हातभार लागत आहे. पर्यावरणाच्या संवर्धनासाठी संस्थानाने बुजलेल्या तलावाचे ५५ एकर एवढ्या प्रचंड जलाशयात केलेले रुपांतर, परिसरात सर्वत्र केलेली वृक्षलागवड आणि सौर ऊर्जेच्या संशोधन व प्रचार-प्रसारासाठी केलेले कार्य अत्यंत उल्लेखनीय वाटले.

**अहमदाबाद बीआरटीएस प्रकल्पाला भेट :** आदरणीय सुप्रियाताईंच्या पुढाकाराने प्रतिष्ठानच्या अभ्यासगटाने दि.३० सप्टेंबर २०११ रोजी अहमदाबाद बीआरटीएस प्रकल्पाला भेट दिली. बस रॅपिड ट्रांझिट सिस्टम (बीआरटीएस) अर्थात राखीव मार्गावरील सार्वजनिक बस वाहतूक व्यवस्था हा एका वाक्यात बीआरटीएसचा अर्थ आहे. गुजरात राज्यातील अहमदाबाद शहरामध्ये दोन वर्षांपूर्वी हा प्रकल्प सुरु झाला आणि दिल्ली व पुणे शहरातील बीआरटीएस प्रकल्पांपेक्षा सरस अंमलबजावणी करीत या प्रकल्पाने आंतरराष्ट्रीय पातळीवरील पारितोषिके मिळविली. याच प्रकल्पाचा आदर्श घेऊन चेन्नई आणि बंगळूरु शहरातील बीआरटीएस प्रकल्पांचा विकास करण्यात येत आहे.

जनमार्ग या नावाने प्रसिद्ध असलेल्या या अहमदाबाद-बीआरटीएस प्रकल्पाची आखणी रिंग रुट पद्धतीने करण्यात आल्यामुळे हा प्रकल्प इतर शहरांपेक्षा वेगळा ठरतो. त्यामुळे वाहतूकव्यवस्थेचे भावी नियोजन करणे सोपे झाले आहे. बससाठी राखीव मार्ग ठेवल्यामुळे प्रवासाचा वेळ वाचत आहे. सर्व बस वातानुकूलित असल्यामुळे प्रवास सुसह्य होत आहे. बसमध्ये चढण्या-उतरण्यासाठी सुरक्षित प्लॅटफॉर्म असून पिण्याच्या पाण्याचीही स्थानकात सोय आहे. मुख्य म्हणजे पाण्याच्या माठात स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध आहे. पर्यावरणातील एक मुख्य समस्या म्हणजे शहरातील वाहतूक कोंडी आणि त्यामुळे होणारा इंधनाचा अपव्यव. त्यावर अत्यंत शिस्तबद्ध नियोजन आणि त्याची काटेकोर अंमलबजावणी करुन उभारलेला हा वाहतूक प्रकल्प महाराष्ट्रातील पुणे, नाशिक, कोल्हापूर आणि कालांतराने विस्तारत जाणाऱ्या सर्वच लहान-मोठ्या शहरांसाठी आदर्शवत वाटला. सुप्रियाताईंबरोबर या अभ्यासदौऱ्यामध्ये वंदना चव्हाण, दत्ता बाळसराफ, विश्वास ठाकूर, प्रशांत शिंदे, अमेय जगताप, श्रीधर पाटील आणि आशीष दामले सहभागी झाले.

**इको-कॉलेज प्रकल्पांतर्गत भंडारदरा परिसर जैवविविधता अभ्यास:** अकोले व राजूर तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सहभागाने व निसर्गप्रेमी श्रीम. निलिमा जोरवर यांच्या पुढाकाराने भंडारदरा परिसरातील जैवविविधतेचा अभ्यास करण्यास सुरुवात झाली आहे. इको कॉलेज प्रकल्पांतर्गत वसुंधरा अभियानतर्फे अमेय जगताप आणि प्रशांत शिंदे यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांबरोबर गेले तीन महिने सातत्याने बैठका घेऊन पूर्वतयारी केली आहे. भंडारदरा येथील औषधी वनस्पती, रानभाज्या, सपुष्प वनस्पती, प्राणी-पक्षी आणि स्थानिक पीकप्रजातींमधील विविधतेचा अभ्यास विद्यार्थी करणार आहेत. यासाठी एक प्रारंभिक अभ्यास भेट दिनांक ७ व ८ ऑक्टोबर २०११ रोजी भंडारदऱ्यातील कळसूबाई-हरिश्चंद्रगड अभयारण्यात आयोजित करण्यात आली. या अभ्यास भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी दिवसभर फिरुन परिसरातील वनस्पती व प्राणी जगताची थोडक्यात तोंडओळख करुन घेतली. या अभ्यासासाठी अगस्ती व रुपवते महाविद्यालयाचे वनस्पतीतज्ज्ञ, प्राध्यापक देशमुख सर, सृष्टीज्ञान संस्थेच्या वनस्पतीतज्ज्ञ श्रेया भानप आणि वसुंधरा अभियानतर्फे प्रशांत शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

❑❑❑



# वाहतूक सुरक्षा अभियान
## कार्यवृत्त

महाराष्ट्रात दरवर्षी होणारे रस्त्यावरील अपघात व त्यात होणारे हजारो मृत्यू, हजारोंना येणारे अपंगत्त्व आपल्या सर्वांच्याच चिंतेचा विषय झाला आहे. शासनाचे सार्वजनिक बांधकाम, वाहतूक पोलीस, रस्ते वाहतूक विभाग हे रस्त्यावरील अपघातांना प्रतिबंध घालण्यासाठी आपापल्यापरीने प्रयत्न करीत आहे. या विषयावर काम करण्यासाठी प्रतिष्ठानच्यावतीने वाहतूक सुरक्षा अभियान हा विभाग कार्यरत आहे. या विभागाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे या आहेत. तर संयोजक म्हणून दत्ता बाळसराफ आणि समन्वयक म्हणून हर्षद स्वार, अमित सामंत, उमेश पाटील आणि सहसमन्वयक म्हणून उमाकांत जगदाळे, सुरेश पाटील हे काम पाहतात.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, वाहतूक सुरक्षा अभियान आणि महाराष्ट्र महामार्ग पोलीस यांनी (११ मे २०११ रोजी आंतराष्ट्रीय रस्ता सुरक्षा दिन, मुंबई वाहतूक पोलिस यांच्या मदतीने) साजरा केला.

वाहतूक सुरक्षा अभियान यांनी ही मोहीम सकाळी दादर येथील पोर्तुगीज चर्चच्या बाहेर महाराष्ट्र राज्य महामार्ग पोलीस अधिक्षक पोलीस श्री. बी. जी. शेखर, डि. एस्. पी. श्री. घाटकर आणि चर्चचे फादर मारिओ या सर्वांनी रस्ता सुरक्षेचे महत्त्व पटवून दिले. तसेच गुलाब व ग्रिटींग कार्ड वाहन चालकांना देण्यात आले. तसेच वरळी ट्राफिक पोलिस हेडक्वॉटरला गुलाब व ग्रिटींग कार्ड देऊन रस्ता सुरक्षे संबंधीचा संदेश देण्यात आला.

११ मे रोजी दुपारी माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील यांच्या हस्ते मंत्रालयाच्या सर्व वाहन चालकांना ग्रिटींग कार्ड व गुलाब वाटप केले. यावेळी अतिरीक्त संचालक श्री. अशोक शर्मा, अधिक्षक पोलीस श्री. बी. जी. शेखर आणि अनेक मान्यवर उपस्थित होते. माननीय गृहमंत्री आर. आर. पाटील यांच्या हस्ते मंत्रालयाच्या बाहेर वाहनचालकांना ग्रिटींग कार्ड व गुलाब देऊन त्यांनी रस्ता सुरक्षा संबंधीचा संदेश दिला.

१४ जून रोजी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, राज्याचे गृहमंत्री आणि राज्य परिवहन मंत्री यांना वाहतुक सुरक्षा अभियानाचे निमंत्रिक सुप्रियाताई सुळे यांनी निवेदन दिले आणि कच्चा मसुदा दिला.

३० जून रोजी वाहतूक सुरक्षा अभियानाखाली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि महामार्ग पोलीस, महाराष्ट्र राज्य यांनी मोफत नेत्र तपासणी व आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. हे शिबीर लाइफलाइन हॉस्पिटल, मेडिकल आणि रिसर्च सेंटर या रुग्णालयांच्या मदतीने करण्यात आले. त्यांनी आरोग्य संबंधीचे महत्त्व पटवून दिले.

❑❑❑



# कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम
# कार्यवृत्त

१९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमाप्रमाणे अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना राबविण्याचे काम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत केले जाते. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रतिष्ठानने 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम' या विभागाची निर्मिती केली आहे. या विभागामध्ये अंदाजे ३५ वकील व समाजसेवक काम करीत असून, ते आपली सेवा या योजनेसाठी देत आहेत.

**फोरममार्फत सर्वसाधारणपणे खालील प्रकारचे काम केले जाते:-**

१. समाजातील गोर-गरीब व तळागाळातील लोकांना कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता मोफत तोंडी सल्ला देणे.

२. प्रसंगी गुंतागुंतीच्या प्रश्नांसंबंधी सखोल अभ्यास करुन गरजू लोकांना कायदेविषयक सल्ला देणे.

३. काही वेळा पत्रव्यवहाराद्वारे गरजू लोकांना कायदेविषयक सल्ला देणे.

४. पक्षकारांच्या तंट्यामध्ये सामोपचाराने तडजोड घडवून आणणे.

५. विधी विषयामध्ये संशोधन करुन प्रचलित कायद्यांमध्ये सुधारणा सुचविणे किंवा नवीन कायद्याचे प्रारुप तयार करुन वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.

६. विधी विषयामध्ये संशोधन करुन प्रचलित कायद्यानुसार बनविण्यात आलेल्या नियमांमध्ये सुधारणा सुचविणे किंवा नवीन नियमांचे प्रारुप तयार करुन वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.

७. कायद्यांची विशेष माहिती करुन देण्यासाठी तज्ज्ञांची विशेष व्याख्याने आयोजित करणे.

८. सामान्य लोकांना कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी विधी साक्षरता कार्यशाळांचे आयोजन करणे.

९. विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मूट कोर्ट स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करणे. तसेच अशा विद्यार्थ्यांसाठी 'वकिलांची व्यावसायिक नीतिमत्ता' या विषयावर परिसंवादांचे आयोजन करणे.

त्यानुसार गेल्या सात महिन्यांत म्हणजेच १ एप्रिल २०११ ते ३१ नोव्हेंबर २०११ या अवधीमध्ये फोरमकडून करण्यात आलेल्या कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**फोरमच्या बैठका:** कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजनेच्या अंमलबजावणीबाबत विचार करुन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दरमहा दुसऱ्या शुक्रवारी फोरमच्या मासिक बैठका घेतला जातात. गेल्या सात महिन्यांमध्ये एकूण सात बैठका झाल्या. सरासरी १२ ते १५ सदस्य प्रत्येक बैठकीला उपस्थित होते.

**उपसमितीच्या बैठका:** एखाद्या विषयांसंबंधी सखोल अभ्यास करुन प्रस्ताव तयार करण्यासाठी वेळोवेळी फोरमच्या वेगवेगळ्या उपसमित्या नेमल्या जातात. त्यानुसार खालीलप्रमाणे उपसमित्यांच्या बैठका झाल्या.

**अ) पुस्तक पुनर्मुद्रण समिती:**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईने 'हॅन्डबुक फॉर सिनिअर सिटीझन्स्' या नावाचे पुस्तक प्रकाशित केले आहे. त्या पुस्तकाच्या प्रती संपल्या असल्यामुळे त्या पुस्तकाचे पुनर्विलोकन करुन ते पुन्हा प्रकाशित करण्याचे ठरले आहे. हे काम करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे निवृत्त मुख्य सचिव श्री. शरद उपासनी यांच्या अध्यक्षतेखाली एका उपसमितीची निर्मिती करण्यात आली आहे. त्या समितीची पहिली बैठक २९ जुलै २०१० रोजी चव्हाण केंद्राच्या पाचव्या मजल्यावरील बोर्ड रुममध्ये संपन्न झाली. बैठकीला ६ सदस्य उपस्थित होते. या बैठकीमध्ये सुधारित पुस्तकाचा आराखडा ठरविण्यात आला.

**ब) सुकाणू समितीची बैठक:**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईमार्फत दरवर्षी ऑक्टोबर महिन्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा चव्हाण केंद्रामध्ये

आयोजित केला जातो. ऑक्टोबर २०११ मध्ये भरविण्यात येणाऱ्या मेळाव्यासंबंधी विचार करण्यासाठी प्रतिष्ठानच्या सर्व विभागांच्या प्रतिनिधींची बैठक दिनांक १४ जुलै २०११ रोजी सायंकाळी ४.०० वाजता पाचव्या मजल्यावरील मा. सरचिटणीस यांना कार्यालयामध्ये व त्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीला १४ प्रतिनिधी उपस्थित होते. त्या बैठकीमध्ये मेळाव्याचे स्वरुप, कार्यक्रम व इतर बाबीसंबंधी चर्चा होऊन प्रस्ताव तयार करण्यात आले.

**क) अहवाल उप-समिती:**

फोरममार्फत १९९२ पासून विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. १९९२ ते २०११ पर्यंत झालेल्या अशा कार्यक्रमांचा एक संक्षिप्त अहवाल तयार करण्याचे ठरले. त्यानुसार त्याबाबत नियम करण्यासाठी श्री. निलेश पावसकर यांच्या अध्यक्षतेखाली एका उप-समितीची निर्मिती करण्यात आली आहे. त्या समितीची बैठक दिनांक ९ जुलै २०११ रोजी सायंकाळी ५.०० वाजता ग्रंथलयामध्ये झाली. चार सदस्य बैठकीला उपस्थित होते. त्या बैठकीमध्ये सदर अहवाल कसा असावा याचा आराखडा ठरविण्यात आला.

**कायदेविषयक सल्ला केंद्र:**

गोरगरीब व सामान्य लोकांना कायदेविषयक तोंडी सल्ला देण्यासाठी दर शुक्रवारी सायंकाळी ५.०० च्या नंतर प्रतिष्ठानच्या ग्रंथालयामध्ये कायदेविषयक मोफत सल्ला केंद्र चालविले जाते. गेल्या सात महिन्यांमध्ये या केंद्राच्या ३० बैठका झाल्या. अंदाजे ८० लोकांनी या केंद्रामध्ये येऊन मोफत सल्ल्याचा लाभ घेतला आहे. या केंद्राचे काम सर्वश्री म. बा. पवार, भूपेश सामंत, दिलीप तळेकर, प्रकाश देशमुख व नीलेश पावसकर या वकिलांनी पाहिले.

**आपल्या कायद्याची माहिती करुन घ्या (Know your Law Lecture Series):**

या व्याख्यानमालेअंतर्गत दरमहा किंवा तीन महिन्यांतून एकदा कायदे पंडितांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. सध्या 'इमारतींचे पुनर्विकास व माहितीचा अधिकार' या कायद्यावर व्याख्याने आयोजित करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

**विधी साक्षरता कार्यशाळा:**

लोकांना सामाजिक किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असलेल्या कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी विविध प्रकारच्या विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यासाठी समाजाच्या वेगवेगळ्या घटकांसाठी वेगवेगळे प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. उदारहरणार्थ - पौगंडावस्थेतील मुले व मुली, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सदस्य, सार्वजनिक न्यासाचे विश्वस्त, सार्वजनिक संस्थांचे सदस्य आणि सर्वसामान्य जनता इत्यादी घटकांसाठी विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

**शपथ कार्यक्रम:** सर्व विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये संविधानाच्या प्रास्ताविकेचे सांघिक वाचन करण्यात येते. तसेच संविधानातील मूलभूत कर्तव्यपालनासंबंधी शपथा घेण्यात येतात. त्याचप्रमाणे अविवाहित मुले व मुली यांच्याकडून हुंडाबंदीसंबंधी शपथा घेण्यात येतात.

**कार्यशाळेमध्ये शिकविलेले कायदे:** विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये अंदाजे ५० ते ६० कायद्यासंबंधी माहिती करुन देण्यात येते. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील कायद्यांचा समावेश असतो. (१) भारतीय संविधान, (२) विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७, (३) हुंडाबंदी अधिनियम १९६१, (४) भारतीय दंड संहिता १८६०, (५) ग्राहक संरक्षण कायदा १९८६, (६) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३, (७) हिंदू वारसा हक्क कायदा १९५६ व इच्छा पत्र कायदा, (८) गुंतवणूकीसंबंधीचे नियम, (९) कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५, (१०) माहितीचा अधिकार कायदा २००५, (११) हिंदू विवाह कायदा १९५५, (१२) मुस्लीम कायदा, (१३) पोटगी संबंधीचे कायदे, (१४) महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३, (१५) हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६, (१६) हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम १९५६, (१७) संपत्ती हस्तांतरण अधिनियम १८८२, (१८) विशेष विवाह अधिनियम १९५४, (१९) बाल विवाह बंदी अधिनियम २००५, (२०) महाराष्ट्र विवाह मंडळ नियमन व विवाह नोंदणी अधिनियम १९८८, (२१) न्यायालयांची बहुस्तरीय व्यवस्था (तालुका न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंतची माहिती), (२२) स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण (प्रतिबंध) अधिनियम १९८६, (२३) विकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम १९९५, The Persons with Disabilities (Equal opportunities, Protection of Rights and Full Participation) Act, 1995

(२४) स्वमग्न असलेल्या, मस्तिष्क घात झालेल्या, मतिमंद व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९, (The National Trust for Welfare of Persons with Autism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities Act, 1999) (२५) अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ The Immoral Traffic (Prevention) Act, 1956 (२६) राष्ट्रप्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१, (२७) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, (२८) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॉपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७, (२९) महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९, (३०) महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९८२, (३१) मुंबई विद्यापीठाचे अध्यादेश क्रमांक २२० (अनुचित प्रथा प्रतिबंध), (३२) मुस्लिम स्त्रिया (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम १९८६, (३३) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१, (३४) भारतीय वारसा हक्क कायदा १९२५, (३५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, (३६) मुंबई मुद्रांक कायदा १९५८, (३७) गृहनिर्माण संस्थांचे विनियम, (३८) अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९, (३९) मुस्लिम व्यक्ती विषयक विधी (शरियत) प्रयुक्ती अधिनियम १९३७, (४०) नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५, (४१) भारतीय मुद्रांक कायदा १८९९, (४२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, (४३) प्रसूती विषयक लाभ अधिनियम १९६१, (४४) सोसायटी नोंदणी अधिनियम १९६०, (४५) अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५, (४६) मोटर वाहन अधिनियम १९८८, (४७) जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९, (४८) मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, (४९) महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९, (५०) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, (५१) माता पिता व ज्येष्ठ नागरिक यांची पोटगी व कल्याण अधिनियम २००७, (५२) मुंबई पोलीस अधिनियम, १९५०..

**कार्यशाळेमध्ये व्याख्यान देणारे व्याख्याते:** विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये व्याख्यान देण्यासाठी फोरमने वकिलांचा संच (Faculty) बनविला आहे. वरील कार्यशाळेमध्ये या फॅकल्टीमधील खालील वक्त्यांनी विविध विषयांवर व्याख्याने दिली.

(१) श्री. प्रमोद ढोकळे, (२) ॲड. नीलेश पावसकर, (३) ॲड. हेमंत केंजाळकर, (४) श्री. दिलीप तळेकर, (५) ॲड. अजय केतकर, (६) ॲड. भूपेश सामंत, (७) प्रि. नारायण राजाध्यक्ष, (८) प्रा. डॉ. जे. बी. पाटील, (९) ॲड. डॉ. प्रकाश देशमुख.

**संशोधनाचे काम:** वर सांगितल्याप्रमाणे फोरमतर्फे विधी संशोधनाचे कामसुध्दा केले जाते. महाराष्ट्र हुंडाबंदी नियम २००३ यामध्ये सुधारणा सुचविण्यासाठी संशोधन पूर्ण झाले असून, त्याबाबतचा अहवाल महाराष्ट्र शासनाला पाठविण्यात आला आहे.

**आगामी कार्यक्रम:** राज्यातील पोलीस अधिकाऱ्यांसाठी खास विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यासंबंधी प्रस्ताव विचाराधीन आहे.

❑❑❑

# महाराष्ट्र महिला व्यासपीठ
# कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या वतीने महिलांची शारिरीक, मानसिक, आर्थिक, सामाजिक विविध दृष्टीने सक्षमता वाढावी यासाठी विविध उपक्रम, विविध कार्यशाळा, इतर कार्यक्रम योजनांच्या माध्यमातुन कृतिशील प्रयत्न केले जातात. संयोजिका रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका ममता रमेशचंद्र कानडे महिला व्यासपिठाचा कारभार संभाळत असतात. त्यांना महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या कार्यकर्त्या शोभा लोंढे यांचे सहकार्य असते.

दिनांक ४-५-२०११ रोजी सकाळी १०:०० ते ४:३० या वेळेत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथील वेगवेगळ्या कार्यालयामध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी व त्यांच्या कुटुंबियांसाठी 'आरोग्य शिबिर' घेण्यात आले. या शिबिरात खालील प्रकारची तपासणी इंडियन कॅन्सर सोसायटीच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या मदतीने घेण्यात आली. स्त्री-पुरुषांना शिबिराचा कमीत कमी १०० लोकांनी लाभ घेतला.

या शिबिरात खालील प्रकारे सर्व तपासणी झाली.

- Chest X-ray
- Routine Blood test of Heamoglobin and white blood cells.
- Complete ENT Examination including Indirect Laryngoscopy by the ENT surgeon.
- Complete Physical Check-up along with Prostate Examination by a surgeon for males.
- Gynecological Examination including Breast Check-up and Pap smear by Gynecologist for females.
- Mammography.

दि. गुरुवार, २१ एप्रिल २०११, वेळ सायंकाळी ४:०० वाजता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, येथे चौथ्यामजल्यावरील रंगस्वर सभागृहामध्ये यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, महाराष्ट्र महिला व्यासपीठ आणि नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने 'महाराष्ट्र आणि मराठे' मा. रा.ना. चव्हाण यांच्या ग्रंथावर चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्रताप आसबे होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक मा. शरद काळे यांनी केले. मा. रमेश चव्हाण यांनी कार्यक्रमात मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात चर्चेकरीता डॉ. सुधीर भोंगळे, प्रा. डॉ. प्रकाश पवार, प्रा. दीपक पवार इत्यादी उपस्थित होते.

मंगळवार, दिनांक १४ जून २०११, यशवंतरावचव्हाणप्रतिष्ठान मुंबईच्या महाराष्ट्र महिला व्यासपीठ, नवमहाराष्ट्र युवा अभियान व महाराष्ट्र सोसायटी वेलफेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण' वर्गातील तिसऱ्या बॅचचे प्रमाणपत्र वितरण व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या महाराष्ट्र महिला व्यासपीठ-मुंबई व कॉलेज ऑफ होम सायन्स, निर्मला निकेतन यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु झालेल्या चौथ्या बॅचचे उद्घाटन कार्यक्रम घेण्यात आला. ममता कानडे यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करुन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व महाराष्ट्र सोसायटी वेलफेअर असोसिएशनचे अध्यक्ष रमेश प्रभू यांनी आपली भूमिका मांडली. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे सरचिटणीस मा. शरद काळे यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. या प्रमाणपत्राचे वितरण मा. द. ग. सुकथनकर (निवृत्त सनदी अधिकारी) निवृत्त मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या विश्वस्त ह्यांच्या शुभ हस्ते झाले. कार्यक्रमांच्या शेवटी शोभा लोंढे यांनी सर्वांचे आभार मानून, राष्ट्रगीत म्हणून कार्यक्रमांची सांगता केली.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, महाराष्ट्र महिला व्यासपीठ आणि कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतन यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी ''गृहव्यवस्थापन'' या विषयावरील अतिशय आगळेवेगळे प्रशिक्षण १४ जून २०११ ते २० ऑगस्ट २०११ मध्ये घेण्यात आले.

महिलांच्या या चौथ्या बॅचमध्ये सतत ९ आठवडे मंगळवार, गुरुवार, शनिवार असे २७ दिवस दुपारी २-३० ते ५-३० या वेळेत प्रशिक्षण देण्यात आले. त्यामध्ये महिलांच्या रोजच्या जीवनांतील उपयोगी असे २७ विषय शिकविण्यात आले.

स्वत:चे आरोग्य, घराची स्वच्छता, घरातील सर्व वस्तूंची निगा, प्रथमोपचार या विषयांबरोबरच वेगवेगळ्या प्रकारचे जेवण बनविण्याच्या पद्धतीमध्ये जवळ जवळ १५० पदार्थ शिकविण्यात आले. वरील सर्व विषय त्या त्या विषयांतील अनुभवी मार्गदर्शक व निर्मला निकेतन कॉलेजच्या प्राध्यापिकांकडून शिकविण्यात आले.

या प्रशिक्षणांमुळे स्वत:चे घर चांगल्याप्रकारे सांभाळणे तसेच छोट्या प्रमाणात डबा सर्व्हीस सुरु करणे, छोट्या प्रमाणात कॅटरिंग बिजनेस सुरु करणे तसेच दुसऱ्यांच्या घरी जाऊन त्यांचे घर सांभाळणे याची माहिती महिलांना मिळाली व आर्थिक बाबतीत सक्षम होण्याचे मार्गदर्शन मिळाले.

दिनांक १३ जुलै २०११ रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठ व नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण सेंटरच्या चौथ्या मजल्यावरील हॉल मध्ये 'चित्रपट चावडी' उपक्रमात ''मोर देखने जंगल में'' हा माहितीपट दाखविण्यात आला.

दिनांक १०-८-२०११ ते ३०-८-२०११ पर्यंत एकूण २० दिवसांसाठी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या बेसमेंट मिटींग हॉल येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, येथील सर्व कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीकरिता ''आधार कार्ड'' काढण्यात आले. एकूण ४०० व्यक्तींनी ''आधार कार्ड'' बनविण्याचा लाभ घेतला.

दिनांक १८ ऑगस्ट २०११ रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठ व नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण सेंटरच्या चौथ्या मजल्यावरील हॉल मध्ये ''चित्रपट चावडी'' मध्ये दुसरा चित्रपट ''वेल डन अब्बा'' हा दाखवून चित्रपटानंतर श्री. सुरेश जोशी (निवृत्त मुख्य माहिती आयुक्त) व श्री नवीन कुमार (निवृत्त माहिती आयुक्त) ह्यांनी प्रेक्षकांशी संवाद केला व त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. यास एकूण २०० मान्यवर उपस्थित होते.

दिनांक १७-९-२०११ रोजी ''युवा परिवर्तन'' (व्यवसाय मार्गदर्शन केंद्र), वांद्रे येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे मा. ममता कानडे व शोभा लोंढे यांनी भेट दिली. खेरवाडी सोशल वेल्फेअर असोशिएशन या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून अनेक कोर्स सुरु केलेले आहेत. कोर्स पूर्ण झाल्यानंतर नोकरी करिता मार्गदर्शन केले जाते. अशा प्रकारचा रिटेलिंग प्रशिक्षण वर्ग यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, बेसमेंट मिटींग हॉल येथे घेण्याबाबत ठरले.

दिनांक २८ सप्टेंबर २०११ रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठ व नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण सेंटरच्या चौथ्या मजल्यावरील हॉल मध्ये चित्रपट चावडी मध्ये तिसरा चित्रपट ''देरजू उजाला'' दाखविण्यात आला. श्री. जयप्रद देसाई, या तरूण चित्रपट निर्माता दिगदर्शक यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

दिनांक २९ सप्टेंबर २०११ रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठ व नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण सेंटरच्या चौथ्या मजल्यावरी हॉल मध्ये "Understanding Gandhi" ह्या पुस्तकांसंदर्भात चर्चा आयोजित करण्यात आली. त्यामध्ये श्रीमती उषा ठक्कर, श्री. रामदास भटकळ, श्री. नवीन कुमार व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे ह्यांनी भाग घेतला, कार्यक्रम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, समन्वयक सुरेश पाटील, भक्ती भावे तसेच मिनल सावंत, शोभा लोढे यावेळी उपस्थित होते.

❑❑❑

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय कार्यवृत्त

माहिती युगाला तंत्रज्ञानाच्या प्रगतीची जोड मिळाल्यामुळे माहिती तंत्रज्ञानालां विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. तंत्रज्ञानामुळे नवनवीन माहिती मिळविणे, संघटन करणे व जास्तीत जास्त अचूक माहिती एखादा निर्णय घेताना उपलब्ध करून घेणे शक्य झाले आहे. माहिती तज्ञ यांना माहितीचे विविध स्तोत्र शोधून काढून पुस्तके अथवा इतर छापील स्वरुपातील माहिती लोकहितार्थ सुनियोजितपणे संकलित करावी लागते. अशी उपयुक्त माहिती वाचनीय पुस्तके अथवा साहित्य पारंपारिक दस्तऐवज उदा. हस्तलिखिते, पुस्तके, पेपर्स, विविध नियतकालिके, नकाशे त्याचप्रमाणे टेप्स रेकॉर्डस् ध्वनिमुद्रण सी.डी.इ. मध्ये उपलब्ध होते.

कोणत्याही संस्थेच्या विकासासाठी व्यवस्थापन ही एक अत्यावश्यक बाब आहे. ग्रंथालयाचे कार्य मार्गदर्शक स्वरुपाचे असून ते सेवाभावी वृत्तीवर आधारित आहे. ग्रंथालयाच्या व्यवस्थापनाचे स्वरुप पाहता व्यवस्थापन दोन विभागात विभागले आहे.

**१) सैध्दातिंक व्यवस्थापन**

**२) क्रियात्मक व्यवस्थापन**

सैद्धातिंक व्यवस्थापनाने व्यवस्थापनाचे प्राथमिक कार्य पार पाडणे अभिप्रेत आहे. यामध्ये संस्थेची उद्दिष्टे तयार करणे या उद्दिष्टे पूर्ततेसाठी निश्चित अशा धोरणांची आखणी करणे व धोरणांच्या अंमलबजावणीची कार्यपद्धती ठरविणे हा सैद्धातिंक व्यवस्थापनाचा भाग आहे.

क्रियात्मक व्यवस्थापन हे उद्दिष्ट पूर्ततेसाठी आवश्यक व अनिवार्य अशा कृती घटकांशी संबंधित असते. या अंतर्गत भांडवल साधनसामग्री मनुष्यबळ वेळ व प्रत्यक्ष कृतीप्रणाली या मूलभूत घटकांचा समावेश होतो. या घटकांच्या आधारे उद्दिष्ट पूर्तता करण्यासाठी प्रत्यक्ष मूलभूत घटकांवर नियोजन नियंत्रण संघटन समन्वय या व्यवस्थापनाच्या कार्यावर आधारित प्रक्रिया करणे आवश्यक ठरते. या कृतीद्वारे सिद्ध झालेले उत्पादन म्हणजे सर्वोत्तम ग्रंथालय सेवा होय. या सर्व घटकांचा समन्वय साधून प्रत्यक्ष उत्पादित सेवा लाभदायी व सर्वोत्तम बनविणे ही सर्वच प्रक्रिया कृतीजन्य असल्याने याला **क्रियात्मक व्यवस्थापन** असे संबोधले जाते

**संकरित आणि इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयांचे व्यवस्थापन:** पारंपारिक ग्रंथालये आणि डिजिटल निर्माण झालेल्या ग्रंथालयांना **संकरित ग्रंथालये** म्हणून संबोधले जाते. अशा ग्रंथालयातील वाचनसाहित्य हे इलेक्ट्रॉनिक स्तोत्र स्वरुपात व पारंपारिक स्तोत्र हे कागदावर मुद्रित वा लिखित स्वरुपात उपलब्ध असतात. अशा ग्रंथालयातील सेवांचे स्वरुपदेखील संमिश्र स्वरुपाचे असते. तंत्रज्ञानावर आधारीत सेवांबरोबरच पारंपारिक ग्रंथालयातील सेवा अशा ग्रंथालयातून उपलब्ध करून दिली जाते. पारंपारिक वाचन साहित्याबरोबर आधारीत ज्ञान क्षेत्रांबरोबर विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्यामुळे ज्ञानक्षेत्रात आमूलाग्र विकास होत आहे. ज्ञानविकासाची ही गती केवळ पारंपारिक वाचनसाहित्याच्या माध्यमातून सर्वदूर व अल्पकालावधीत वा तात्काळ उपलब्ध होणे शक्य होत नाही. वैज्ञानिक व्यापार क्षेत्रातील उलाढाली याकरीता गतिमान ज्ञानवितरण गरजेचे ठरते आहे. याचा अंतिम परिणाम हा अशा ज्ञानविकासाचा अद्ययावत तपशील त्याअंतर्गत माहिती ग्रंथालयाद्वारे जलद गतीने उपलब्ध करून देण्यासाठी इलेक्ट्रॉनिक स्तोत्रांची आवश्यकता ही आजची गरज आहे. यामुळे पारंपारिक स्तोत्र व इलेक्ट्रॉनिक स्तोत्र व त्याआधारे ग्रंथालय सेवा या अपरिहार्य ठरत आहेत आणि याची परिणीती म्हणजेच संकरित ग्रंथालयांचा उदय होय. संकरित ग्रंथालयातील उपार्जन उपस्कार ही संमिश्र स्वरुपात करणे गरजेचे भासत आहे आणि यामुळेच विद्यमान स्थितीत संकरित ग्रंथालये ही गरजेची ठरत आहेत. ग्रंथालयातील माहिती व ज्ञानांग्रहण स्त्रोत अथवा वाचन साहित्य हे इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल स्वरुपात असल्यास अशा ग्रंथालयांना इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल ग्रंथालये म्हणून ओळखले जाते. प्रत्यक्ष चार भिंतीच्या आत न राहता या ग्रंथालयाचे परीक्षेत्र भिंतीच्या बाहेर पोहोचलेले असल्याने त्यांना भिंतीविरहीत ग्रंथालये असे संबोधिले जाते. ग्रंथालयात ज्ञान

व माहितीमध्ये संग्रहित केली जातात. ग्रंथालयाचा मूळ उद्देश ज्ञान व माहिती संग्रहण हा असला तरी संग्रहीत ज्ञान व माहिती ग्रंथालयाच्या वाचकापर्यन्त पोहोचविणे ही ग्रंथालय, ग्रंथपाल आणि ग्रंथालय सेवक यांची जबाबदारी आहे. ज्ञान व माहिती संग्रहण साधने प्राचीन काळापासून ते विद्यमान इलेक्ट्रॉनिक डिजिटल साधनापर्यन्त कालसापेक्ष बदलत आलेली आहेत. परिणामी माहिती प्रसारणाची साधने माध्यमे व पद्धतींमध्ये काळानुरूप बदल झाला आणि हा बदल ग्रंथालयांनी स्वीकारला आहे. मात्र हा बदल अनेक स्थित्यंतरातून झाला असल्याने तो स्वीकारणे त्यांचा वापर करणे याबाबत मात्र ग्रंथालयांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले आहे. समस्या प्रधान वातावरणात सामाजिक विकास साधत असताना ग्रंथालयात संग्रहित केलेली माहिती उपयुक्त ठरलेली आहे. कमीतकमी वेळेत योग्य ते वाचनसाहित्य उपलब्ध करून देण्यासाठी आणि ज्ञानसाधनांचा वाढलेला आवाका, प्रकाशनांची प्रचंड उपलब्धता, माहितीतील वाढ ग्रंथालयाच्या आर्थिक समस्या इत्यादी सारख्या अनेक घटकांचा विचार करता विविध प्रकारच्या सेवांचे आयोजन ग्रंथालयांना करावे लागत आहे. यासाठी साक्षरता, ग्रंथालय साक्षरता यासारखे उपक्रम राबविणे गरजेचे आहे. विद्यमान जग हे विज्ञानाचे आणि तंत्रज्ञानाचे जग म्हणून ओळखले जाते. या पार्श्वभूमीवर ज्ञान व ज्ञानावर आधारीत निर्मिती साधने याला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. ज्ञाननिर्मितीला प्रोत्साहन प्राप्त होण्याच्या दृष्टीने जागतिक पातळीवर विविध संमेलने परिषदांमधून चर्चा होऊन बौद्धीक संपदा हक्क ही संकल्पना अस्तित्वात आली.

जागतिक स्तरावर ज्ञान आणि माहिती हे एक खणखणीत वाजणारे चलन बनले आहे. त्यामुळेच ज्ञान व्यवस्थापन शास्त्रात डिजीटल ग्रंथालयाला महत्त्व आले आहे. आधुनिक डिजीटल ग्रंथालयात इंटरनेट पासून ते ग्रंथालय नेटवर्क पर्यन्त संगणकीय युगातील डिजीटल, लायब्ररी, नॉलेज मॅनेजमेंट, मशिन लर्निंग या शास्त्राचे काळानुरुप वाढते महत्त्व लक्षात घेता ज्ञानव्यवस्थापन क्षेत्रात डिजीटल ग्रंथालयास डेलनेट, इन्फलीबवेट, अरनेट इ. च्या माध्यमातून वाचकांना ऑनलाईन ग्रंथालयीन सेवा देता येतात.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काही वर्षात औद्योगीकरण सुरु झाले तेव्हा विशेष ग्रंथालये अस्तित्वात येऊ लागली. त्या वेळच्या औद्योगिक व व्यावसायिक संस्थांची ग्रंथालये ही आजच्या विशेष ग्रंथालयाची सुरुवात होती. संसद, सरकारी विभाग, संशोधन विभाग, व्यावसायिक व औद्योगिक संघ संग्रहालये अशा संस्थांची ग्रंथालये ही ग्रंथालये असतात.

मागील काही वर्षात शास्त्रीय व इतर संशोधनाचा वेगाने विकास होऊ लागला आणि माहितीच्या संप्रेशनाच्या साधनामध्ये बदल झाले. दररोज होत असलेले नवीन संशोधन व नवे शोध यामुळे लिखित ज्ञानात व माहितीत भर पडली. अशी प्रचंड प्रमाणातील माहिती जमवून ठेवणे व तिचा उपयोग घडवून आणणे यासाठी स्वतंत्र योजनाची आवश्यकता भासू लागली. प्रत्येक विषय व त्यांचे उपविषय यावरील माहितीची व्यवस्था करण्यासाठी विशेष केंद्राची गरज निर्माण झाली. माहिती संग्रहित करून प्रतिप्राप्ती करून देण्यासाठी त्या केंद्राना इतर मोठ्या ग्रंथालयावर अवलंबून राहावे लागले. म्हणून विशेष ग्रंथालये अस्तित्वात आली आहेत.

विशिष्ट संस्थेसाठी वा संशोधनासाठी माहिती मिळविणे, तिचे निर्देशन आणि प्रसारण करणे यासाठी जबाबदार असणारा विभाग म्हणून विशेष ग्रंथालयांना महत्त्व आहे.

**माहिती वितरणाचे प्रकार**

**१. विषय संदर्भ संबंधी ग्रंथसूची –** विषय संदर्भ ग्रंथसूची म्हणजे एखाद्या विषयावर उपलब्ध असलेल्या ग्रंथाची सूची व विषयाचे निरीक्षण करून तयार केलेली सूची होय. यामुळे वाचकाचा वेळ वाचतो. वाचकाला आवश्यकतेनुसार विषय संबंधित ग्रंथ निवडण्यास मदत होते. सूची ही एका विशिष्ट पद्धतीने संकलित केलेली असते. त्यामुळे अफाट ग्रंथसंपदेतून हवे ते उद्दिष्ट सफल होण्यास मदत होते.

**२. साधनपत्रांची सूची –** उपलब्ध असलेल्या साधन पत्रातून एखाद्या विषयाची किंवा एखाद्या छोट्या संदर्भावर वा संशोधक, शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ यांकडून आलेल्या माहिती संदर्भातील एखाद्या सूचनेवर नवीन किंवा जुन्या साधन पत्रातून बनविलेली सूची असते. यामध्ये विषयावर वर्गीकरण असून लेखकाच्या नावांची वर्णानुक्रमानुसार सूची बनवतात. संशोधनाच्या क्षेत्रातील नवीन नवीन घडामोडी कळण्यासाठी या सूचीचा उपयोग होतो

**तत्कालीन संदर्भ सेवा –** या सेवेमुळे वाचकांना सातत्याने नवीन माहितीचा पुरवठा केला जातो. आजकाल माहिती अनेक पद्धतीने मिळते. तिचा वापर करणारेही अनेक असतात. त्यामुळे कमी वेळात, कमी खर्चात, अचूक माहिती मिळविणे अशक्य बनले आहे. पण तत्कालीन संदर्भ सेवेमुळे हे शक्य झाले आहे.

**१. निवडक माहितीचा प्रसार –** हे तत्कालीन संदर्भ सेवेचे पुढचे पाऊल आहे. यामध्ये वाचकांची आवड लक्षात घेऊन निवडक वाचकांना वैयक्तिक पातळीवर सेवा दिली जाते.

**२. समीक्षा आणि ग्रंथसूची सेवा –** समीक्षा आणि ग्रंथसूची काढणाऱ्या नियतकालिकामुळे वाचकांना, उपभोक्त्यांना याचा संशोधनाच्या दृष्टीने फार उपयोग होतो. समीक्षा ग्रंथसूचीमध्ये मूळ लेखाचा संक्षिप्त अहवाल, लेखकाचे नाव, छापलेल्या नियतकालिकाचे नाव असते. ग्रंथसूचीत केवळ लेखकाचे नाव व ग्रंथासंबंधी माहिती असते. हे दोन्ही प्रकार साधनसूचीचे प्रकार असून माहिती वितरणांत महत्वाचे योगदान देतात.

ऑटोमेशन आणि ग्रंथालयातील जाळे (नेटवर्क) यांनी ग्रंथालयातील साधन संपत्तीच्या देवघेवीला नवी दिशा दिली आहे. या अनुषंगाने वाचकांना माहिती सेवेकरीता आपल्या ग्रंथालयांनी विविध ग्रंथालयीन नेटवर्कच्या सुविधा पैकी **डेलनेट** ची (डेव्हलपिंग लायब्ररी नेटवर्क) सुविधा देण्याचा उपक्रम सुरु केला आहे.

**ग्रंथालयाविषयी माहिती :-**

यशवंतराव चव्हाण ग्रंथालयामध्ये समाजशास्त्र, राज्यशास्त्र, शेती, सहकार, इतिहास, कायदा, संस्कृती इत्यादी विषयांवरील पुस्तके, चरित्रे व आत्मचरित्रे, धर्मकोष, विश्वकोष, मराठी विश्वकोष, गॅझेटियर ॲटलॉस इअर बुक, डिक्शनरीज इत्यादी संदर्भ ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध आहेत. तसेच वेळोवेळी संबंधित विषयाला अनुसरुन नवीन पुस्तके ग्रंथालयासाठी घेण्यात येतात. ग्रंथालयामध्ये एकंदरीत २०,१९० इतका ग्रंथसंग्रह उपलब्ध करण्यात आलेला आहे. ग्रंथालयामध्ये असलेली पुस्तके आणि नव्याने खरेदी करण्यात येणारी पुस्तके वाचनाता सहज उपलब्ध व्हावी याकरिता **ओपॅक**, कॅटलॉग सुरु केला आहे. यामध्ये लेखक, ग्रंथनाम, प्रकाशन, विषय, वर्गांक यासंज्ञेच्या सहाय्याने वाचताना माहिती मिळविता येते आणि पाहिजे त्या ग्रंथाचा शोध घेता येतो.

**२. ग्रंथालयाचे नियम :-**

यशवंतराव चव्हाण ग्रंथालयाचे सभासद होण्याकरीता नमुना अर्ज तयार केला आहे. या अर्जामध्ये स्वतःच्या हस्ताक्षरात परिपूर्ण माहिती भरून त्यासोबत पुढीलप्रमाणे वर्गणी भरणे आवश्यक आहे.

**अ) सर्वसाधारण सभासद :-**

सर्वसाधारण सभासदाकरिता रु.२५०/– वार्षिक वर्गणी तसेच रु.२५०/– अनामत रक्कम (१९९६ पासून)

**ब) विद्यार्थी सभासद :-**

महाविद्यालयीन/उच्चशिक्षण/संशोधक विद्यार्थ्याकरिता वार्षिक रु.५०/– नाममात्र वर्गणी व अनामत रक्कम रु.१००/– दि.(१.८.०८ पासून)

**क)** यशवंतराव चव्हाण ग्रंथालयामध्ये संदर्भाकरिता काही विद्यार्थी एक दिवस ते एक आठवडा या कालावधीकरिता ग्रंथालयाचा लाभ घेतात. या विद्यार्थ्याकडून रु.१५/– एका आठवड्याला फी आकारण्यात येते. त्यांच्याकडून फक्त एका कार्डवर त्यांची वैयक्तिक माहिती भरून घेण्यात येते.

**ड)** माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी शिक्षण घेणारे विद्यार्थी संगणकविषयक पुस्तकांचा लाभ घेतात. त्याकरीता ग्रंथालय वेगळी फी आकारत नाही.

**इ–१) संयुक्त संस्था सभासदत्व (Corporate Membership)** कॉर्पोरेट या शब्दाच्या व्याख्येत बसणारी संस्था या सभासदत्वासाठी पात्र असेल. एकावेळची वर्गणी रु.५०,०००/–, ५ वर्षासाठी.

**अनामत रक्कम :-** सर्वसाधारणपणे अनामत रक्कम घेण्यात येणार नाही. परंतु एखाद्या दुर्मिळ व किंमती पुस्तकासाठी प्रतिष्ठान निश्चित करेल तेवढी रक्कम घेण्यात येईल.

**एका वेळी देण्यात येणारी पुस्तके :-** एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देता येतील.

**इ–२) संस्था सभासदत्व (Institutional Membership)** यासाठी शिक्षण व संशोधन संस्था व सांस्कृतिक संस्था पात्र राहतील. परंतु शिक्षण व संशोधन संस्था ही युजीसी आय.सी.एस.एस.आर., आय.सी.सी.आर. किंवा आय.सी.एच.आर. यांच्याकडून मान्यता प्राप्त झालेली असावी, तर सांस्कृतिक संस्था ही महाराष्ट्र शासन केंद्र शासन किंवा मान्यता प्राप्त अधिघोषित विद्यापीठ यांनी मान्यता दिलेली असावी.

**संस्था सभासदत्वासाठी :-** प्रवेश फी रु.१,०००/– ना परतावा

**वार्षिक वर्गणी :-** रु.५,०००/–

**दीर्घ कालावधीसाठी संस्था सभासद :-** एकावेळी ५ वर्षासाठी वर्गणी रु.२०,०००/–

**एका वेळी देण्यात येणारी पुस्तके :-** एकावेळी जास्तीत

# विविध विभाग व विभागीय केंद्रांच्या उपक्रमांची क्षणचित्रे



**विभागीय केंद्र, कराड** - मा. कार्यालयात मा. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सदिच्छा भेट दिली. सोबत मा. माणिकराव ठाकरे.



**विभागीय केंद्र, कराड** - कामकाजाची चर्चा करताना अध्यक्ष मा. ना. जयंतराव पाटील व मा. श्रीनिवास पाटील



**विभागीय केंद्र, नागपूर** - ''पूर्व विदर्भातील संत परंपरा'' ग्रंथाचा लोकार्पण सोहळ्यात संवाद साधताना मा. गिरीश गांधी




'तो प्रवास सुंदर होता...' या कार्यक्रमात श्री. गिरीश गांधी, अनुराधा मराठे, डॉ. अरूणा ढेरे, अमीत दिवाडकर, डॉ. अविनाश रोडे





**विभागीय केंद्र, पुणे** - सहकार समीक्षा चर्चासत्रात सहभागी डॉ. दुभाषी, श्री. शि. गि. पाटील श्री. नितीन गद्रे, श्री. अंकुश काकडे, श्रीमती लीला देवी प्रसाद



**विभागीय केंद्र, लातूर** - जेष्ठ नागरिक आनंद उत्सव प्रसंगी
खा. डॉ. जनार्दन वाघमारे, जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती साधना ताई जगताप
श्री. हरिभाऊ जवळगे, ॲड मनोहरराव गोमारे, प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार इ.



**विभागीय केंद्र, लातूर** - मा. यशवंतराव चव्हाण यांच्या ९८ व्या जयंती कार्यक्रमात
प्राचार्य डॉ. बामनराव पाटील व मान्यवर





**विभागीय केंद्र, नाशिक** - येथील रंगवर्षा कला उत्सवात मार्गदर्शन करताना जेष्ठ चित्रकार मा. बाल नगरकर, मा. विश्वास ठाकूर तसेच सहभागी.



**अपंग हक्क विकास मंच** - अपंग व्यक्तीसाठी मोफत
तपासणी व कृत्रिम अवयव वाटप कार्यक्रमात
मा. भारतीबाई पवार, मा. सुप्रिया सुळे, मा. विजय कान्हेकर.



**अपंग हक्क विकास मंच** - कृत्रिम अवयव वाटप शिबिरातील लाभार्थी
उपस्थित मान्यवर मा. राजेश टोपे,
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री व मा. सुहास काळे इ.



मुंबई महापालिकेतील शाळेमध्ये **वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियाना** अंतर्गत आयोजित कार्यशाळेत सहभागी विद्यार्थी



देवगिरी कला महाविद्यालय, औरंगाबाद येथे दि. २९ सप्टेंबर रोजी आयोजित **जागर हा जाणिवांचा** महाविद्यालयीन संवाद कार्यक्रमात स्त्रीभ्रूणहत्येविरोधात जनजागृती करणारे पोस्टर्स



यशवंतराव चव्हाण केंद्रातील **'सृजन'** या उपक्रमात सहभागी शाळकरी मुले. (मुंबई)



**'सृजन'** बाल आनंद मेळाव्यातील विद्यार्थ्यांची कलाकृती




**विभागीय केंद्र, औरंगाबाद** - 'जागर हा जाणिवांचा' खुली पथनाट्य स्पर्धेमध्ये श्रेयनगर महिला मंडळातील कलाकार पथनाट्य सादर करताना.



**विभागीय केंद्र, कोकण रत्नागिरीच्या** वतीने बचतगटातील महिलांनी बनविलेल्या मालाचे प्रदर्शन व विक्री दिप प्रज्वलन करताना मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर व इतर



**विभागीय केंद्र, कोकण रत्नागिरी** - येथे 'कृषि दिनी' शेतकऱ्यांना नारळ रोपे वाटप करताना सदस्य श्री. बापू काळे, प्रमुख अतिथी डॉ. अशोक पोवार माजी शिक्षण संचालक कोकण कृषी विद्यापिठ व इतर



सरकारने **वाहतुक सुरक्षा धोरण** जाहिर करावे यासाठी मा. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना निवेदन. त्या प्रसंगी अमित सामंत, हर्षद स्वार, निलेश राऊत, मा. सुप्रिया सुळे व इतर



**महाराष्ट्र महिला व्यासपीठ** - गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण वर्गाला प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रमात मा. शरद काळे, मा. ममता कानडे, रमेश प्रभू इ.




नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वतीने स्वातंत्र्यदिनाच्या पूर्व संध्येस काढलेल्या रॅलीत सहभागी विजय कसबे, उमाकांत जगदाळे, सुरज भोईर व इतर



मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त सिद्धार्थ उद्यान औरंगाबाद, येथे मुक्तिसंग्राम स्मारकास भेट देऊन मुक्तिसंग्रामातील हुतात्म्यांना अभिवादन करताना मा. सुप्रिया सुळे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना. राजेश टोपे, स. मनमोहनसिंग ओबेरॉय व इतर



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई आणि सलाम मुंबई फाऊंडेशन यांच्या वतीने बारामती इथे आयोजित तंबाखू विरोधी बालमहोत्सव मेळाव्यात दिपप्रज्वलन करताना मा. सुप्रिया सुळे, मा. पद्मीणी सोमाणी इत्यादी

जास्त १० पुस्तके देण्यात येतील. इ-१ व इ-२ येथील सभासदत्व हे संबंधित संस्थेच्या प्रमुखास देण्यात येईल. त्यांना ग्रंथालयाचे ओळखपत्र देण्यात येईल. संस्थेच्या प्रमुखास आवश्यक वाटल्यास ते त्यांच्या एक किंवा दोन कर्मचाऱ्यांना त्यांच्या वतीने पुस्तके घेण्यास/परत करण्यास नामनिर्देशित करू शकतील. नामनिर्देशन अधिकृत पत्राने करावे लागेल. मात्र पुस्तके अबाधितपणे वेळेवर परत करणे व ग्रंथालयाच्या नियमांचे पालन करणे यांची जबाबदारी संस्था प्रमुखांची असेल.

वरील सभासदत्व देण्याचा किंवा कारण न देता नाकारण्याचा पूर्ण अधिकार प्रतिष्ठानला राहील.

**३. सर्वसाधारण सभासद** – सभासदांना एकावेळी एक पुस्तक/ग्रंथ देण्यात येईल ते आठ दिवसात परत करणे आवश्यक आहे. तसेच संदर्भग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातच करता येईल. संदर्भ ग्रंथ घरी नेता येणार नाही. पुस्तकाची किंमत भरलेल्या अनामत रक्कमेपेक्षा जास्त असेल तेव्हा अधिक अनामत रक्कम किंवा त्या पुस्तकांच्या किंमतीएवढी अनामत रक्कम भरुन पुस्तक घरी नेता येईल.

४. महाविद्यालयीन व उच्चशिक्षण घेणारे विद्यार्थी/संशोधक यांना ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी/संदर्भासाठी देण्यात येतात. घरी/ग्रंथालयाबाहेर नेण्याकरीता देण्यात येणार नाही.

❑❑❑

## ग्रंथप्रसार

केवळ उत्कृष्ट साहित्य निर्माण करुन भागणार नाही, तर त्याचे सुबक प्रकाशन व स्वस्त पुस्तक योजनांद्वारे त्याचा प्रसार करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात आता औद्योगिक विस्तार झाल्यामुळे काहीसा सुस्थितीत असलेला नवा मध्यमवर्ग निर्माण झाला आहे. तो वर्ग टेलिव्हिजन जितकी प्रतिष्ठेची वस्तू मानतो, तितकेच त्या वर्गाने स्वत:चे ग्रंथालय असणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले पाहिजे. मला असे वाटते, की एक प्रकारची ग्रंथशून्यता आता येत आहे. त्यामुळे पुस्तके खपत नाहीत. हे घातक आहे. ग्रंथालयांना पुस्तकांची आवड निर्माण करता येईल. 'चिंतनशील साहित्य म्हणजे केवळ धार्मिक साहित्य' असे समीकरण झाले आहे. हे अपुरे आहे. नवे पदवीधर, नवी विद्यालये नव्या चिंतनशील साहित्याची गिऱ्हाइके आहेत. पण महाराष्ट्रात नवी विद्यापीठे निघूनही ग्रंथांचा प्रसार कां होत नाही, याचा विचार करावयास पाहिजे.

– यशवंतराव चव्हाण

# विभागीय केंद्र, रत्नागिरी
# कार्यवृत्त

**• दि. २५ फेब्रुवारी, २०११ - ठाणे जिल्हा समिती कार्यालयाचे उद्घाटन :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय केंद्र, जिल्हा समिती ठाणेची स्थापना व उद्घाटन दि. २५ फेब्रुवारी २०११ रोजी बदलापूर येथे विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये यांच्या हस्ते व मा. श्री. किसन कथोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

यशवंतराव चव्हाणांची विचारधारा समाजात खोलवर रूजणे गरजेचे आहे. त्यातूनच आजची पिढी उद्याचा महाराष्ट्र घडवेल. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या स्थापनेवेळी पाहिलेले स्वप्न पूर्ण होईल, असे उद्गार यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कोकण विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. श्री राजाभाऊ लिमये यांनी काढले. यावेळी मुरबाड विधानसभा मतदार संघाचे आमदार मा. श्री किसन कथोरे यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सामाजिक चळवळीत आपण १९९२ सालापासून कार्यरत असून वेळोवेळी प्रतिष्ठानचे विविध कार्यक्रम राबविले आहेत असे मनोगत व्यक्त केले.

यावेळी मा. श्री. राजाभाऊ लिमये यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत ठाणे जिल्हा समितीचे अध्यक्ष म्हणून श्री. श्रीधर पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली. या सभेसाठी श्री.किसन चौधरी, रत्नागिरी जिल्हाध्यक्षा सौ. युगंधरा राजेशिर्के सचिव श्री.अनिल नेवाळकर, श्रीम. प्राची शिंदे व ठाणे जिल्हा समितीचे सदस्य उपस्थित होते.

**• दि. २७ फेब्रुवारी, २०११ - पाणी विचार परिषद :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, जिल्हा समिती सिंधुदुर्ग व टाळंबा पाटबंधारे लाभक्षेत्र विकास परिषद यांचे संयुक्त विद्यमाने दि. २७ फेब्रुवारी २०११ रोजी गोपिका मंगल कार्यालय, ता. कुडाळ येथे 'पाणी विचार परिषद' चे आयोजन करण्यात आले होते. सिंधुदुर्ग जिल्हा समितीचे अध्यक्ष मा.ॲड.किशोर शिरोडकर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. या सभेला १७५ शेतकरी, बागायतदार, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, सरपंच, लोक प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रसाद देवधर, डॉ. नितीन सावंत, श्री. अरविंद रानडे, श्री. पुष्पसेन सावंत, श्री. वसंत केसरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमामध्ये टाळंबा प्रकल्पातील अडचणींवरील तोडगा, लहान मोठ्या धरणांवर आधारित मत्स्यशेती तसेच प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न याबाबत चर्चा करण्यात आली.

**• दि. ५ मार्च ते ८ मार्च २०११ - जागतिक महिला दिन:** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, कोकण विभागीय केंद्राचे वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रत्नागिरीतील जे.के.फाईल येथील 'साई मंगल कार्यालय' येथे बचत गटातील तसेच उद्योगिनी महिलांनी बनविलेल्या मालाचे भव्य प्रदर्शन व विक्री स्टॉल्स महिलांसाठी विविध फनी गेम्स स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम व आरोग्य तपासणी असा भरगच्च कार्यक्रम दि. ५ मार्च २०११ ते दि. ८ मार्च २०११ या कालावधीत संपन्न झाला. दि. ५ मार्च २०११ रोजी सकाळी ११ वाजता महिला बचत गटांच्या वस्तूंच्या प्रदर्शनाचे उद्घाटन सिंधुदुर्गातील सह्याद्री वाहिनी पुरस्कार, सावित्रीबाई फुले पुरस्कार प्राप्त, तसेच सिंधुदुर्ग महिला काथ्या कामगार औद्योगिक संस्थेच्या संचालिका व जिल्हा समिती सिंधुदुर्गच्या सदस्या मा. सौ. प्रज्ञा परब यांचे शुभहस्ते करण्यात आले. यावेळी विभागीय समितीचे उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर, विभागीय समितीचे कोषाध्यक्ष श्री. एम. के. गावडे, रत्नागिरी जिल्हाध्यक्षा मा.सौ.युगंधरा राजेशिर्के, तालुका समिती अध्यक्ष श्री.नितीन कानविंदे व जिल्हा समिती सदस्य उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा देवून आपले मनोगत व्यक्त केले. उद्घाटक मा. सौ. प्रज्ञा परब यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, जागतिक महिला दिन हा महिलांचा सण असून तो घरोघरी साजरा केला पाहिजे. बचत गटांनी जिल्ह्यासह राज्याची बाजारपेठ काबीज करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी आपल्या व्यवसायात हिरीरीने कार्य केले पाहिजे. सिंधुदुर्गामध्ये काथ्या उद्योगात १५ संस्था कार्यरत असून त्यात महिला बचत गट आहेत. रत्नागिरीतही असे उद्योग उभे राहिले पाहिजेत असे मत

त्यांनी व्यक्त केले. प्रतिष्ठानचे कोकण विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष मा.श्री.एम.के.गावडे यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.

दि. ८ मार्च २०११ रोजी सदर प्रदर्शनाची सांगता विभागीय अध्यक्ष मा.श्री.राजाभाऊ लिमये यांचे प्रमुख उपस्थित झाली. या कार्यक्रमाचे अतिशय नेटके आयोजन करण्यासाठी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल मा. अध्यक्षांनी सचिव श्रीम.प्राची शिंदे व कर्मचारी सौ. सरिता बोरकर, सौ. श्रद्धा वाडेकर यांचे कौतूक केले. जिल्हाध्यक्षा मा. सौ. युगंधरा राजेशिर्के यांचे उपस्थितीत चार दिवस चाललेल्या महिला कार्यक्रमाची सांगता अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात व उत्साहात करण्यात आली.

**८ मार्च-महिला दिन ठाणे :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय केंद्र, जिल्हा समिती ठाणे व 'पुण्यनगरी सई' यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ मार्च २०११ रोजी 'जागतिक महिला दिन' कार्यक्रम ठाणे येथे साजरा करण्यात आला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान जिल्हा समिती ठाणेचे अध्यक्ष मा. श्री. श्रीधर पाटील, सचिव रविंद्र घोडविंदे व मुरबाडचे श्री. किसन चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची ओळख, वेशभूषा स्पर्धा, कतृत्ववान महिलांचा सत्कार, स्पर्धांचा बक्षिस समारंभ, झी मराठीवरील 'वारस' या मालिकेची नायिका सीया पाटील यांची जाहीर मुलाखत तसेच कर्तुत्ववान महिलांचा सत्कार असा भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला ७०० ते ७५० महिला उपस्थित होत्या.

• **दि. १२ मार्च, २०११ - यशवंतराव चव्हाण जयंती :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय केंद्र, जिल्हा समिती सिंधुदूर्गच्यावतीने मा. आमदार श्री. दीपकभाई केसरकर यांच्या संपर्क कार्यालयात सावंतवाडीच्या नगराध्यक्षा मा. सौ. पल्लवी केसरकर यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली.

यशवंतराव चव्हाण साहेबांचे नेतृत्व हे संवेदनशील, आदर्श व्यासंगी, कला, क्रीडा, शिक्षण, कृषी, जलसंधारण, सहकार अशा वेगवेगळ्या क्षेत्रात मोलाची कामगीरी व अभ्यासूवृत्तीचे होते. पन्नास वर्षापूर्वी हे नेतृत्व लाभले ते आजही लाभले असते तर देशाला व महाराष्ट्राला प्रगतीच्या शिखरावर अजूनही नेले असते. असे विचार मा.सौ.पल्लवी केसरकर यांनी व्यक्त केले.

• **दि. १४ जून, २०११ :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय केंद्र रत्नागिरी व कृषी तंत्र विद्यालय सुकीवली, ता. खेड यांचे संयुक्त विद्यमाने दि. १४ जून २०११ रोजी दुपारी २ वाजता केंद्रीय नारळ बोर्डाच्या योजना व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठनचे उद्देश व कार्य या विषयी माहिती तसेच शेतकऱ्यांना नारळ रोप वाटप असा भरगच्च कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाणांचे स्नेही श्री. कोठारे साहेब होते.

यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्यक्रमाचा आढावा व उद्देश जिल्हाध्यक्षा सौ. युगंधरा राजेशिर्के यांनी विषद केले. विभागीय केंद्र कोकणचे उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर यांनी शेतकऱ्यांनी सुधारीत बियाणाचा वापर शेतीसाठी करावा तसेच युवकांनी नोकरीच्या मागे न लागता आपल्या गावातील शेती बागायतीकडे लक्ष द्यावे असे आवाहन केले. ॲड. बाळासाहेब बेलोसे यांनी आपल्या भाषणात मा.श्री.राजाभाऊ लिमये यांची नारळ बोर्डावर निवड झाल्यामुळे आपल्याला केंद्रीय नारळ बोर्डाची ओळख झाली व विविध योजनांवरील अनुदान कोकणात आले, असे मत व्यक्त केले.

• **१ जुलै, २०११ - कृषी दिन कार्यक्रम :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय केंद्र, जिल्हा समिती रत्नागिरीचे वतीने दि.१ जुलै २०११ रोजी कृषी दिन कार्यक्रम गोळप रत्नागिरी येथे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे माजी शिक्षण संचालक मा. डॉ. अशोक पोवार यांचे प्रमुख उपस्थितीत झाले.

जिल्हाध्यक्षा मा. सौ. युगंधरा राजेशिर्के यांनी प्रास्ताविक करताना यशवंतराव चव्हाणांचे विचार, त्यांची कार्यपद्धती, प्रतिष्ठानची उद्दीष्टे याबाबत थोडक्यात माहिती सांगितली. प्रतिष्ठानच्या कार्याचा आढावा घेताना त्या म्हणाल्या की, कोकणात वनौषधी भरपूर आहेत. त्यांच्या संवर्धनासाठी कोकण कृषी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने प्रशिक्षण शिबरे घेण्याची गरज आहे.

भाट्ये नारळ संशोधन केंद्राचे कृषी विद्यावेत्ता मा. डॉ. दिलीप नागवेकर यांनी नारळ लागवड, त्यांची निगा व त्यावर पडणारे रोग यांची माहिती दिली.

दापोलीच्या बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे

माजी शिक्षण संचालक मा. डॉ. अशोक पोवार यांनी मार्गदर्शन करताना, आज शेतीमध्ये हरीतक्रांती घडून आली आहे. आज कॉंक्रीटीकरण होत असल्यामुळे वृक्षतोड मोठ्या प्रमाणात होत आहे. कॉंक्रीटीकरणामुळे पाण्याचा निचरा होत नाही. त्यामुळे पाणी टंचाई जाणवते. शेतीसाठी पाणी व जमीन हे घटक महत्वाचे आहेत. त्यासाठी वृक्षलागवड केली पाहिजे. समृद्ध कोकणासाठी सामान्य शेतकऱ्यांनी आंबा, काजू सोबत भुईमूग, बांबू, कोकमची शेती करावी त्यातून प्रचंड पैसा मिळू शकतो. अलीकडे शेती करण्यासाठी माणसे मिळत नसल्याने जमिनी विकल्या जातात, असे न करता शेतीसाठी शेतकऱ्यांनी यांत्रिकीकरणावर भर द्यावा तंत्रज्ञानाची माहिती घेऊन शेतीत लक्ष घातले पाहिजे. लावणी कापणीसाठी यंत्र उपलब्ध आहेत. त्यांचा वापर करावा असे आवाहन केले.

यानंतर शेतकऱ्यांना नारळाची व आवळ्याची रोपे वाटप करण्यात आली. वाटप करण्यात आलेली नारळाची २०० रोपे रत्नागिरी तालुकाध्यक्ष श्री. नितीन कानविंदे यांने व आवळ्याची २५ रोपे जिल्हाध्यक्षा मा.सौ.युगंधरा राजेशिर्के यांनी देणगी म्हणून दिली. शेवटी सचिव श्रीम. प्राची शिंदे यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.

तसेच सिंधुदुर्ग जिल्हा समितीचे वतीने १ जुलै कृषी दिन कार्यक्रम गोगटे वाळके कॉलेज बांदा येथे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला कोकण विभागीय समिती अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये उपस्थित होते. शेतीतील नवनवीन प्रयोग करून महाराष्ट्राच्या कृषी विकासाला शेतकऱ्यांनी हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी जिल्हा बँक संचालक श्री. डी. बी. वारंग यांनीही शेतकऱ्यांना आधुनिक शेती पद्धतीचा वापर शेतकऱ्यांनी करून अधिकाधिक उत्पन्न घ्यावे असे आवाहन केले. या कार्यक्रमाला विभागीय समिती कोषाध्यक्ष श्री.एम.के. गावडे, सदस्या सौ. प्रज्ञा परब बांदा परिसरातील उद्योजक व शेतकरी उपस्थित होते. सर्व शेतकऱ्यांना यावेळी कल्पवृक्षाचे वाटप करण्यात आले.

**• १५ ऑगस्ट, २०११ - देशभक्तीपर समुहगीत गायन स्पर्धा :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, जिल्हा समिती सिंधुदुर्ग वतीने जिल्हास्तरीय देशभक्तीपर समुहगीत गायन स्पर्धा दि.१५ ऑगस्ट २०११ रोजी कृषी महाविद्यालय ओरोस येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. स्पर्धेसाठी बहुसंख्य स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेत प्रथम क्रमांक पंचम ग्रुप आरोस, द्वितीय क्रमांक कृषी महाविद्यालय ओरोस, तृतीय क्रमांक न्यु इंग्लिश स्कूल ओरोस तर जे.बी.सावंत अध्यापक विद्यालय हुमरमळा ओरोस येथील प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष यांना उत्तेजनार्थ क्रमांक देण्यात आला.

या कार्यक्रमाला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कुडाळ तालुका अध्यक्ष श्री. रामचंद्र घोगळे, कार्यक्रम अध्यक्ष कृषी महाविद्यालयच्या प्रा.डॉ.प्रगती परब, सिंधुदुर्ग युथ संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास गावडे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय समितीचे कोषाध्यक्ष श्री. एम. के. गावडे, सदस्या सौ. प्रज्ञा परब, श्री. प्रमोद धुरी, जिल्हाध्यक्ष होते. यावेळी श्री. एम के. गावडे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात स्वातंत्र्यदिनाचे महत्व स्पष्ट करून आजच्या युवकांनी प्रगती कशी करावी व राष्ट्राविषयी असणारी जागरूकता याचे महत्व मुलांना सांगितले. सदर कार्यक्रमाला राज्य पुरस्कार विजेते श्री. आईर गुरुजी तसेच ॲड.प्रसाद सावंत, माजी उपसभापती शिवाजी घोगळे, ग्रंथपाल कु. दिपीका सावंत, श्री. निब्रे, गौरव घेगळे आदिंनी परिश्रम घेतले.

**• १० सप्टेंबर २०११ - आदर्श शिक्षक सन्मान सोहळा :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई कोकण विभागीय समिति रत्नागीरी व लोकशिक्षण मंडळ आबलोली ता.गुहागर यांचे संयुक्त विद्यमाने लोकशिक्षण मंडल आबलोली यांचे सभागृहात दि.१० सप्टेंबर २०११ रोजी 'आदर्श शिक्षक सन्मान सोहळा' संपन्न झाला.

जिल्हा समिती सदस्य व लोकशिक्षण मंडळ आबलोलीचे कार्याध्यक्ष श्री. चंद्रकांत बाईत यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. जिल्हा समिती सदस्य श्री. महंमदेठ रखांगी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रतिष्ठान मार्फत गेली सहा वर्षे राबविल्या गेलेल्या उपक्रमांची माहिती त्यांनी यावेळी दिली. ते म्हणाले की, शासनाच्या योजना प्रत्यक्षात राबविण्यासाठी सर्व क्षेत्रातील लोकांना प्रतिष्ठानमार्फत प्रोत्साहन दिले जाते. शिक्षकांबद्दल बोलताना त्यांनी सांगितले की, शिक्षक हा समाजातील महत्वाचा दुवा आहे. ग्रामीण भागातील लोकांची निष्ठा शिक्षकांवर अधिक असते. आपल्या मुलांमध्ये कोणते गुण आहेत हे आई-वडिलांना माहीत नसतात तर ते शिक्षकांना अधिक माहीत असतात. त्यामुळे मुलांना योग्य वळण लावण्याची जबाबदारी शिक्षकांचीच आहे. असे त्यांनी सांगितले.

यानंतर शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात विशेष कामगिरी केलेल्या प्राथमिक ४, माध्यमिक ४, कनिष्ठ महाविद्यालयीन १

व वरिष्ठ महाविद्यालयीन १ अशा दहा शिक्षकांना प्रतिष्ठानतर्फे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र देवून 'आदर्श शिक्षक' पुरस्कार मान्यवरांचे हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी पुरस्कारप्राप्त शिक्षकांनी आपली मनोगते व्यक्त करताना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने दिलेल्या पुरस्कारामुळे आम्हाला अधिक काम करण्याची ऊर्जा मिळते अशा भावना व्यक्त केल्या.

शिक्षकांना उद्देशून विभागीय समिती उपाध्यक्ष मा. डॉ. कद्रेकर यांनी सांगितले की, शिक्षक हे समाजाच्या बांधिलकीसाठी काम करतात, हे लक्षात घेवून त्यांच्या योगदानाची जाणीव ठेवूनच प्रतिष्ठानतर्फे शिक्षकांना 'आदर्श शिक्षक' पुरस्कार दिले जातात. ज्यांना पुरस्कार मिळाले आहेत त्यांच्याकडून आणखी चांगल्या कामाची अपेक्षा ठेवली जाते.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डाएटचे प्राचार्य डॉ. गजाननराव पाटील यांनी सांगितले की, शिक्षकांनी आपल्या अंगी संवेदनशीलता, समतोलपणा व समर्पणता हे तीन गुण अंगिकारणे आवश्यक आहे. उद्याचा भारत हा शिक्षकच घडवणार आहे. भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी निस्वार्थीपणाने शिक्षकांने आदर्श विद्यार्थी घडविण्याचे भान जागृत ठेवणे गरजेचे आहे. शिक्षकांनी युवा शक्ती घडविण्याचे मनात आणले तर ते देशासाठी महाशक्ती बनवू शकतात. यशवंतराव चव्हाण व डॉ. राधाकृष्णन यांचे विचार विद्यार्थ्यांसमोर मांडण्याचे काम शिक्षकांनी करावे असे विचार विभागीय समिती अध्यक्ष मा.श्री.राजाभाऊ लिमये यांनी अध्यक्षीय भाषणात मांडले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी लोकशिक्षण मंडळ आबलोलीचे शिक्षकवृंद व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

• **१ ऑक्टोबर २०११ – ज्येष्ठ नागरिक दिन :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र कोकण रत्नागिरीचे वतीने दि.१ ऑक्टोबर २०११ रोजी 'जागतिक ज्येष्ठ नागरिक दिना'निमित्त चिपळूणच्या ब्राह्मण सहाय्य संघाचे बेडेकर सभागृह येथे 'ज्येष्ठ नागरिक सन्मान सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाची सुरुवात सुप्रसिद्ध लेखक मा.श्री.विश्वास मेहेंदळे आणि विभागीय समिती अध्यक्ष मा.श्री.राजाभाऊ लिमये यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली.

जिल्हाध्यक्षा मा. सौ. युगंधरा राजेशिर्के यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना यशवंतराव चव्हाणांचे नाव, त्यांचे विचार हे प्रतिष्ठानच्या कार्यामुळे जिल्ह्यातील तरुण पिढीला समजले. प्रतिष्ठानमार्फत सर्व स्तरातील लोकांसाठी विविध स्पर्धा घेतल्या. जातात. यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, वनौषधी, नाचणी लागवड स्पर्धा घेतल्या जातात. प्रतिष्ठानतर्फे वक्तृत्व स्पर्धा घेतल्या त्यावेळी स्पर्धकांकडे चव्हाण साहेबांची पुस्तके उपलब्ध नव्हती. प्रतिष्ठानकडून स्पर्धकांना पुस्तके दिल्यानंतर त्यांनीही चव्हाणसाहेबांच्या कर्तृत्वाचा अभ्यास केला, असे सांगितले.

यावेळी ज्येष्ठ नागरिक श्रीम. शकुंतलाताई भिडे यांनी ज्येष्ठांवर लिहिलेल्या कवितेचे वाचन केले. यानंतर रत्नागिरी जिल्ह्यातील १४ ज्येष्ठ नागरिकांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देवून प्रमुख अतिथी मा. श्री. विश्वास मेहेंदळे व विभागीय समिती अध्यक्ष मा. श्री.राजाभाऊ लिमये यांचे हस्ते सन्मान करण्यात आले.

सन्मान करण्यात आलेल्या ज्येष्ठ नागरिकांची नावे :-

१. श्री. इब्राहीम फकीर वलेले – मंडणगड
२. श्री. भगतसिंह भार्गव फाटक – दापोली
३. श्री. अब्दुल गणी नाकवा हवा – दापोली
४. श्री. श्रीपतराव बाळाजी आंब्रे – खेड
५. श्री. सदाशिव गंगाराम वारणकर – खेड
६. श्री. गजानन सदाशिव बेंडळ – गुहागर
७. श्रीम. विद्या घाणेकर – चिपळूण
८. श्री. बाळासाहेब साबाजी उदेग – चिपळूण
९. श्रीम. गीता महाजन – रत्नागिरी
१०. श्री. इस्माईल युसुफ सोलकर – रत्नागिरी
११. श्री. श्रीराम सदाशिव वंजारे – लांजा
१२. श्री. शामराव पानवलकर – लांजा
१३. श्रीम. वत्सला राजाराम कुलकर्णी – राजापूर
१४. श्री. यशवंत नाखरे – राजापूर

सत्कारमूर्तीपैकी स्वातंत्र्यसैनिक श्रीम. विद्याताई घाणेकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, परमेश्वराने आपल्याला अपेक्षेपेक्षा जास्त वय दिले आहे. मी लहान असल्यापासून स्वातंत्र्याचा लढा पहात आले आहे. स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या छातीत गोळ्या झेलणाऱ्या वीरांना पाहिल्यामुळे स्वातंत्र्याविषयी खूप प्रेम वाटत आहे. आत्ताचे जीवन हे धावपळीचे असल्यामुळे मुलांच्या मनात असूनही त्यांना आपल्यासाठी वेळ देता येत नाही. त्यामुळे आजचे तरुण आपल्याला बघत नाहीत असा समज कृपया ज्येष्ठांनी करून घेवू नये. ज्येष्ठांनी आपले आयुष्य

आनंदात घालवावे. प्रतिष्ठानने केलेला सत्कार हा चव्हाण साहेबांचा प्रसाद म्हणून स्विकारत आहोत, असे भावपूर्ण उद्‌गार काढले.

'माझे अनेक सत्कार झालेत परंतु यशवंतराव चव्हाणांसारख्या द्रष्ट्या नेत्याचे नावे असलेल्या संस्थेने माझा सत्कार करावा हे मला पुण्य लाभल्यासारखे आहे. त्याबद्दल मी प्रतिष्ठानला सर्वांच्या वतीने धन्यवाद देतो. व संस्थेच्या कोणत्याही कामात सहभागी होण्याचे आश्वासन देतो.' असे उद्‌गार श्री. शामराव पानवलकर यांनी काढले.

प्रमुख अतिथी मा. श्री. विश्वास मेहेंदळे यांनी ओघवत्या शैलीत एक तास आपले व्याख्यान दिले. ते म्हणाले, मधमाशी ज्याप्रमाणे मध गोळा करते त्याप्रमाणे माणसाने फक्त चांगल्याच गोष्टी टिपून घ्याव्यात. जे आपल्याकडे आहे त्याचा विचार करावा व आपले आयुष्य सुखी करावे. परमेश्वराने हसणे हे वरदान फक्त माणसालाच दिलेले आहे त्यामुळे नेहमी हसत रहावे. छान सुंदर हसत जगा. असा संदेश त्यांनी दिला यानंतर श्री. मेहेंदळे यांनी आपल्या खास भाषा शैलीत अनेक किस्से सांगितले. दारिद्र्य हा शाप नाही त्याच्यावर मात करता येते. यशवंतराव चव्हाणांनी हे दाखवून दिले आहे. त्यांनी बजावलेली देशसेवा आजच्या तरूणांसाठी आदर्शवत असल्याचे ज्येष्ठ लेखक विश्वास मेहेंदळे यांनी सांगितले.

विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये यांनी सांगितले की, यशवंतराव चव्हाण साहेबांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम प्रतिष्ठान मार्फत केले जाते. ज्येष्ठ नागरिक दिनी सर्व ज्येष्ठ नागरिक एकत्र येतात. ज्येष्ठांच्या सन्मान सोहळ्यासाठी वेगवेगळ्या सन्माननीय व्यक्तींना बोलावले जाते. त्यामुळे ज्येष्ठांना एक प्रकारचा दिलासा, आधार मिळतो.

शेवटी जिल्हा समिती सदस्य श्री. बापू काणे यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. प्रशांत पटवर्धन यांनी केले. या कार्यक्रमाला सर्व सदस्य व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विभागामार्फत पुढील कालावधीत घेण्यात येणारे कार्यक्रम**

१. सध्या बाजारात नाचणी या धान्याला मागणी असूनही शेतकरी नाचणीचे पीक घेत नाहीत. ज्या प्रमाणात शेतकऱ्यांचा भात पिकाकडे कल आहे त्याचप्रमाणात त्यांनी नाचणी पिकाकडे वळावे यासाठी नाचणी पीक स्पर्धा घेण्यात आली आहे.

२. २५ नोव्हेंबर २०११ रोजी यशवंतराव चव्हाण पुण्यतिथी निमित्त 'माझ्या कल्पनेतील महाराष्ट्र' या विषयावर वरिष्ठ महाविद्यालयातील गटातून तालुका व जिल्हा स्तरावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत.

❑❑❑

# विभागीय केंद्र, नागपूर कार्यवृत्त

## कुसुमाग्रज जन्मशताब्दी

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ स्नातकोत्तर मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ फेब्रुवारी, २०११ रोजी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रज यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाचा उद्‌घाटन सोहळा प्रतिष्ठानचे विभागीय अध्यक्ष गिरीश गांधी यांच्या हस्ते करण्यात आले. ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत, समीक्षक डॉ. वि. स. जोग यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या समारंभाला प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष विजय जिचकार, प्रतिष्ठानचे सरचिटणीस डॉ. अक्षयकुमार काळे आणि कवयित्री सुचित्रा कातरकर उपस्थित होते.

या प्रसंगी कवयित्री सुचित्रा कातरकर यांच्या 'माझे हायकू'. 'फुल, पक्षी आणि ......' या दोन काव्यसंग्रहांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते पार पडले.

उद्‌घाटनपर भाषणात गिरीश गांधी म्हणाले की महाराष्ट्रात जशी संत परंपरा उज्ज्वल आहे त्याचप्रमाणे आधुनिक काव्याच्या इतिहासात अनेक नामवंत कवी या महाराष्ट्राने दिले आहेत.

एखाद्या दुकानात आपण जातो. तेव्हा हिंदी भाषेत बोलत असतो पण प्रत्येकाने आपल्या राष्ट्रभाषेबरोबरच मातृभाषेतही संवाद साधला पाहिजे तरच मातृभाषेविषयी गोडी निर्माण होईल. असे प्रतिपादन डॉ. वि. स. जोग यांनी यावेळी केले. प्रास्ताविक डॉ. अक्षयकुमार काळे यांनी केले कार्यक्रमाचे संचालन डॉ. कोमल ठाकरे यांनी केले. याप्रसंगी 'समिधाच सख्या या.....' या सत्रात कुसुमाग्रजांच्या कवितांचे अभिवाचन प्रा. तीर्थराज कापगते, प्रा. विनोद राऊत, प्रफुल्ल शिलेदार, सुचित्रा कातरकर, गौरी शास्त्री यांनी केले. संकल्पना संचालन श्याम धोंड यांनी केले.

श्री. चंद्रकांत जोशी यांनी विदर्भातील नवोदित कवींशी चर्चा केली. आपले काव्यानुभव आणि काव्यविश्वाशी त्यांनी नवोदित कवींना एकरूप केले. संचालन मनीषा साधू यांनी केले.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी यशवंतराव चव्हाण स्मृती काव्य स्पर्धा पुरस्काराचे वितरण खासदार मा. श्री. दत्ताभाऊ मेघे यांच्या अध्यक्षतेखाली व मा. श्री. सुरेश द्वादशीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. प्रथम पुरस्कार प्रसाद उगले, द्वितीय पुरस्कार प्रथमेश देशपांडे, तृतीय पुरस्कार रोशन बनकर आणि स्नेहा खोब्रागडे, निलेश महात्मे यांना उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आले. समारोपसत्राचे संचालन प्रा. अजय चिकाटे यांनी केले.

## सी. डी. लोकार्पण सोहळा

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने सूरमणी डॉ. साधना शिलेदार यांच्या संध्याकाळच्या रागांच्या सीडीचा रसिकार्पण सोहळा दि. २८ फेब्रुवारी, २०११ रोजी आयोजित करण्यात आला.

विभागीय अध्यक्ष गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली व ज्येष्ठ नाटककार श्री. महेश एलकुंचवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा रसिकार्पण सोहळा संपन्न झाला. यावेळी डॉ. कल्याणी देशमुख, विजय जिचकर व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी गिरीश गांधी म्हणाले, विदर्भात प्रतिभावंत कलावंत आहेत पण त्यांना प्रोत्साहन मिळत नसल्यामुळे ते समोर येत नाहीत. आज कलेच्या क्षेत्रात उदासीनता आहे. खैरागडला संगीत विद्यापीठ स्थापन होऊ शकते तर नागपूरला का नाही? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

यावेळी साधना शिलेदार यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी केले. संचालन रजनी हुद्दा यांनी केले तर आभार धनंजय मांडवकर यांनी मानले.

## स्व. यशवंतराव चव्हाण यांची जयंती

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांची जयंती यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान तर्फे सामाजिक कार्यातून आदर्श निर्माण करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचा सत्कार करून साजरी करण्यात आली. सामाजिक बांधिलकीचा शाब्दीक उद्‌घोष करण्यापेक्षा वास्तवात सामाजिक काम करणाऱ्यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांना धान्य आणि इतर स्वरूपात मदत करण्याच्या हेतूने आकांक्षाच्या अरूणा सबाने, नगरसेविका प्रगती पाटील आणि विभा गांधी त्यांच्या सोबत संस्थेचे डॉ. प्रमोद मुनघाटे, डॉ. कोमल ठाकरे, धनंजय मांडवकर, शैल

जैमिनी होते. या सर्वांच्या उपस्थितीत राधा बोरडे, प्रज्ञा राऊत आणि ज्योती घरडे या तीन सामाजिक कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला.

प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी १२ मार्चला जयभीम नगरातील राजगिरी वृद्धाश्रमात ज्योती घरडे यांच्या निवासस्थानी भेट दिली. अनाथांची नाथ असलेल्या ज्योती घरडे यांनी अक्षरशः निराधारांना घरात आसरा दिला. आजारी अपंग अशा वृद्धांना त्यांच्या आप्तांनीच घराबाहेर काढले आहे. हे ऐकताना मन सुन्न झाले. या सर्वांच्या जेवणाखाण्याच्या सोयीपासून त्यांच्या औषधांपर्यंत व्यवस्था करायला घरडे यांना रोज कुठून तरी मदत मिळवावी लागते. या कार्यामागील प्रेरणा इतकी स्वयंभू आहे की, कष्टाचा वैताग नाही की उल्लेख त्यांच्या चेहऱ्यावर झळकत नाही. विभा गांधी यांच्या हस्ते ज्योती घरडे यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

त्यानंतर राधा बोरडे यांच्या न्यू ज्ञानेश्वर नगरातील लुईराम वाचनालयाला भेट देण्यात आली राधा बोरडे आणि त्यांचे पती पुंडलिक बोरडे दोघेही दृष्टिबाधित असून दृष्टिबाधितांसाठी सतत काही ना काही करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. या प्रयत्नांनाच एक भाग म्हणून त्यांनी अव्यंग आणि अपंगांसाठी एकत्रित वाचनालयाची स्थापना केली. अरूणा सबाने यांच्या हस्ते राधा बोरडे यांचा सत्कार करण्यात आला. अंधांसाठी संगणक, टाईपरायटर यांच्याविषयी माहिती देवून ते घेण्यासाठी येणाऱ्या अडचणीही त्यांनी उपस्थितांना सांगितल्या.

बेलतरोडी या नागपूरच्या एका टोकावर असलेल्या प्रज्ञा राऊत यांच्या घरी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची मंडळी पोहचली. त्यांच्या श्रीकृष्ण शांतीनिकेतन येथे दुर्बल मनस्क महिला व राऊत कुटुंबीय वाट पाहत होते. यावेळी एकूण वातावरण नवीन माणसाला आश्चर्य वाटावे असे होते. या तिन्ही संस्थांना भेट दिल्यानंतर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे गेलेल्यांना भरून आले.

**नाट्यवाचन व रंगचर्चा**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नाट्यवाचन व रंगचर्चा या उपक्रमा अंतर्गत दि. १३ मार्च, २०११ रोजी प्रा. संयुक्ता थोरात लिखित 'कब तक' या नाटकाचे वाचन प्रा. संयुक्ता थोरात, प्रिती पटेल, पुनम ऊईके, सारिका हेडाऊ यांनी केले.

या चर्चेला रमेश लखमापूरे, ब्रिजेशपंत, पराग घोंगे, संजय काशीकर, गजानन सगदेव यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाची सूत्रे कुणाल मुळे यांनी सांभाळली.

**जागतिक कविता दिन**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने दि. २१ मार्च, २०११ रोजी जागतिक कवितादिनी अनुवादित कविताचे अभिवाचन करण्यात आले.

कवितादिना निमित्त कविवर्य डॉ. यशवंत मनोहर यांचा ज्येष्ठ नाटककार महेश एलकुंचवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी जागतिक कवितादिनाचे औचित्य साधून गिरीश गांधी, लोकनाथ यशवंत, मनीषा साधू, श्याम माधव धोंड आदींसह अनेक कविंनी अनुवादन कवितांचे वाचन केले. तत्पूर्वी गिरीश गांधी यांनी कार्यक्रमामागील भूमिका विशद केली.

या कार्यक्रमाचे संचालन दै. सकाळचे संपादक श्रीपाद अपराजित यांनी केले.

**नाट्यवाचन व रंगचर्चा**

दि. २७ मार्च, २०११

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नाट्यवाचन व रंगचर्चा या उपक्रमा अंतर्गत दि. २७ मार्च, २०११ रोजी विजय मोकाशी यांच्या 'बंटी और बबली' या विडंबनात्मक नाटकाचे वाचन करण्यात आले. नाट्यरसिकांनी या चर्चेत सहभाग घेतला. कार्यक्रमाची सूत्रे धनंजय मांडवकर यांनी सांभाळली.

**नाट्यवाचन व रंगचर्चा**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नाट्यवाचन व रंगचर्चा या उपक्रमा अंतर्गत दि. ७ एप्रिल, २०११ रोजी मोहन राकेश यांच्या 'शायद' या बीज नाटकाचे वाचन प्रा. संयुक्ता थोरात, ताहा मुनीब, प्रिती पटेल यांनी केले. कार्यक्रमाची सूत्रे धनंजय मांडवकर यांनी सांभाळली.

**ग्रंथ लोकार्पण सोहळा**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने दि. १५ एप्रिल, २०११ रोजी डॉ. गणेश चव्हाण यांच्या ''पूर्व विदर्भातील संत परंपरा'' या ग्रंथांच्या लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. विभागीय अध्यक्ष गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली, पालकमंत्री शिवाजीराव मोघे यांच्या हस्ते या ग्रंथाचे लोकार्पण करण्यात आले. डॉ. अलका इंदापवार, मोहन राठोड यांनी ग्रंथावर भाष्य केले. यावेळी गिरीश गांधी म्हणाले की, भौगोलिक दृष्ट्या संतांचे वर्गीकरण करता येत नाही. सततच्या भटकंतीमुळे त्यांचे कार्य नेहमीच गतीमान राहिले आहे. परंपरेच्या

रूपाने त्यांची शिकवण अद्यापही जीवंत आहे. डॉ. गणेश चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक विनोद लोकरे यांनी केले. राजू लिपटे यांनी संचालन केले. विजय जिचकार यांनी आभार मानले.

**नाट्यवाचन व रंगचर्चा**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नाट्यवाचन व रंगचर्चा या उपक्रमा अंतर्गत दि. १ मे, कामगार दिनानिमित्त गिरणी कामगारांचे विश्व उलगडून दाखविणारे पद्माकर पाटील लिखित 'बिंब प्रतिबिंब' या नाटकाचे वाचन करण्यात आले. आजच्या चर्चेला नागपूरातील कार्यक्रमाची सूत्रे धनंजय मांडवकर यांनी सांभाळली.

**गौरव ग्रंथ प्रकाशन**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने दि. ५ मे, २०११ रोजी सांप्रदायिक 'सद्‌भाव आणि सामाजिक शांतता' या डॉ. अक्षयकुमार काळे संपादित कुलगुरु डॉ. श. नू. पठाण गौरव ग्रंथ या ग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. विलास सपकाळ कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या शुभहस्ते डॉ. श. नू. पठाण यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अक्षयकुमार काळे यांनी केले. संचालन डॉ. सुनील रामटेके यांनी केले. आभार डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी मानले.

**मातृदिनानिमित्त 'आई म्हणोनी कोणी....'**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने मातृदिनानिमित्त दि. ७ मे, २०११ रोजी या 'आई म्हणोनी कोणी......' कथा व कवितांचा नजराणा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरसेविका प्रगती पाटील होत्या. गिरीश गांधी आणि डॉ. सुलभा हेर्लेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत 'आई म्हणोनी कोणी' या कार्यक्रमात प्रा. शुभांगी रथकंठीवार, मनीषा साधू, विजया ब्राह्मणकर आणि विजया मारोतकर यांनी कथा कवितांचा नजराणा सादर केला. गिरीश गांधी यांनी ''आई'' या शब्दाचा अर्थ सांगून त्याची महती पटवून दिली. या जमिनीवरील प्रत्येक वस्तूमधील आई आणि लेकराचं नातं त्यांनी सांगितले. आई नसती तर लेकराची काय अवस्था होते ते देखील त्यांनी सांगितले. मंचावरील मान्यवरांनी आईची महती आपल्या मनोगतातून व्यक्त केली. धनंजय मांडवकर यांनी आभार मानले.

**नाट्यवाचन व रंगचर्चा**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नाट्यवाचन व रंगचर्चा' या उपक्रमा अंतर्गत दि. ८ मे, २०११ रोजी युवालेखक अभय नवाथे यांच्या पहिल्याच 'चूक की बरोबर' या नाटकाचे वाचन करण्यात आले. कार्यक्रमाची सूत्रे कुणाल मुळे, संजय काशीकर यांनी सांभाळली.

**विश्वशांती म्हणजे काय? चिंतनसत्र**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने तथागत भगवान गौतमबुध्दांच्या जयंतीनिमित्त 'विश्वशांती म्हणजे काय?' या चिंतनसत्राचे आयोजन दि. १७ मे २०११ रोजी करण्यात आले. अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष गिरीश गांधी होते. व्यासपीठावर प्रा. ज्ञानेश वाकुडकर, विजय जिचकर, डॉ. प्रमोद मुनघाटे आणि चिंतनसत्राचे वक्ते डॉ. म. ग. उपाख्य भाऊसाहेब झिटे उपस्थित होते.

जगात भीतीचे वातावरण तयार झाले आहे. भीतीयुक्त वातावरणामुळे जीवनाची शाश्वती उरली नसून अशा भयमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी जागतिक स्तरावर चिंतन करण्याची गरज आहे. असे प्रतिपादन डॉ. भाऊसाहेब झिटे यांनी याप्रसंगी केले.

गिरीश गांधी यांनी विश्वशांतीसाठी राजमहल सोडणाऱ्या गौतम बुध्दांच्या तत्वज्ञानाचा समाजाला विसर पडला असून राजमहलासाठी स्पर्धा निर्माण झाल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी केले. संचालन धनंजय मांडवकर यांनी केले आभार प्रा. ज्ञानेश वाकुडकर यांनी मानले.

• **नाट्यवाचन व रंगचर्चा** – यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नाट्यवाचन व रंगचर्चा' या उपक्रमा अंतर्गत दि. ३ जुलै २०११ रोजी नितीन ठाकरे लिखित 'स्टॉप' व धनंजय मांडवकर लिखित 'तीन त्रिक साडेसात' या दोन नाट्यकृतींचे वाचन करण्यात आले. या रंगचर्चेत डॉ. विनोद इंदूरकर प्रसिद्ध लेखक पराग घोंगे आणि नाट्यरसिक यांनी सहभाग घेतला. समीर तभाने व अभय नवाथे यांनी या कार्यक्रमाची सूत्रे सांभाळली.

• **नाट्यवाचन व रंगचर्चा** – यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

'नाट्यवाचन व रंगचर्चा' या उपक्रमा अंतर्गत दि. १० जुलै, २०११ रोजी रमेश पवार लिखित 'ब्रीज' व नितीन ठाकरे लिखित डोअर बेल' या नाट्यकृतींचे वाचन करण्यात आले. सारंग मास्टे, जवाहर बढीये, विनय निजसूरे, श्रीपाद क्षीरे या नाट्यरसिक, समीक्षकांनी या रंगचर्चेत सहभाग घेतला. या चर्चेत लेखक महोदयांशी रंगावृत्ती या संदर्भात विशेषत्त्वाने चर्चा करण्यात आली. धनंजय मांडवकर यांनी या कार्यक्रमाची सूत्रे सांभाळली.

• **कालिदास दिन** – यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दि.१५ जुलै २०११ रोजी कालिदास दिनाचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त संस्कृत नाट्यस्पर्धेत महाराष्ट्रातून सर्वप्रथम आलेले 'बंडू अभिनय करोती' या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. तसेच संगीतसंध्येमधे क्लासिकल आणि सेमीक्लासिकल गितांचा नजराणा डॉ. चित्रा मोडक, मंजिरी वैद्य यांच्या चमुने सादर केला.

याप्रसंगी व्यासपीठावर संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पंकज चांदे, श्री. गिरीश गांधी, डॉ. रुपा कुळकर्णी, डॉ. नंदा पुरी आदी मान्यवर उपस्थित होते.

• **नाट्यवाचन व रंगचर्चा** – यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नाट्यवाचन व रंगचर्चा' या उपक्रमा अंतर्गत दि.१७ जुलै, २०११ रोजी नवोदीत लेखक प्रणव साकुळकर यांच्या 'अ डेन्जरस प्रँक' या हिंदी एकांकिकेचे वाचन करण्यात आले. या रंगचर्चेत गजानन सगदेव, अतुल शेबे, विनय निजसुरे, जवाहर बढीये, अभिषेक काणे यांनी सहभाग घेतला. आशिष सोनटक्के यांनी या चर्चेची सूत्रे यशस्वीरित्या सांभाळली.

• **नाट्यवाचन व रंगचर्चा** – यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नाट्यवाचन व रंगचर्चा' या उपक्रमाअंतर्गत दि.२४ जुलै, २०११ रोजी रत्नाकर भेलकर यांच्या कथेवर आधारीत समीर तभाने लिखित 'कासरे' या नाट्यकृतीचे वाचन करण्यात आले. याप्रसंगी मूळ कथा लेखक महोदयांनी आपल्या कथेचा आशय या नाटकातून योग्यरित्या मांडला गेला असे प्रतिपादन केले. यावेळी नाट्यरुपांतरकार; कथालेखक आणि रासिक समीक्षक यांच्यात चर्चा घडून आली. अभय नवाथे यांनी या चर्चेची सूत्रे सांभाळली.

• **नाट्यवाचन व रंगचर्चा** – यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नाट्यवाचन व रंगचर्चा' या उपक्रमा अंतर्गत दि.३१ जुलै, २०११ रोजी कोराडी येथील नवोदित लेखिका आसावरी इंगळे यांच्या 'सायंकाळचा पाऊस' या नाट्यकृतीचे वाचन करण्यात आले. वृद्धाश्रमातील वृद्धांचे जीवनदर्शन यावर आधारलेल्या या नाट्यकृतीवर जवाहर बढीये, सुधाकर धाकतोड, विशाल कुकडे यांनी चर्चा केली. कुणाल मुळे यांनी या चर्चेची सूत्रे सांभाळली.

• **मैत्री दिन** – यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर आणि आधार, नागपूर या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानपीठ विजेते वि.वा. शिरवाडकर जन्मशताब्दी वर्षानिमित्त मैत्री दिनाच्या पूर्व संध्येला दि. ६ ऑगस्ट, २०११ रोजी 'तो प्रवास सुंदर होता' कविता ललित आणि नाटकांवर आधारित अभिवाचन गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

संकल्पना, बांधणी, निवेदन डॉ. अरुणा ढेरे, नाट्यकृतीचे वाचन अजित दिवाडकर यांचे तर गायन अनुराधा मराठे यांचे होते.

व्यासपीठावर मा. गिरीश गांधी व आधार संस्थेचे अध्यक्ष डॉ. अविनाश रोडे उपस्थित होते. मैत्री आकसणे सुरु असण्याच्या काळात आधार संस्थेने मैत्रीची वीण घट्ट करणारा हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल गिरीश गांधीनी विशेष कौतुक केले. संचालन शुभदा फडणवीस यांनी केले. हेमंत काळीकर यांचे सहकार्य लाभले.

• **मैत्री दिन** – यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने दि.७ ऑगस्ट, २०११ रोजी गझलकार क्रांती साडेकर यांच्या 'अग्निसखा' व 'असेही तसेही' या दोन गझल संग्रहाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला. कवयित्री डॉ. सुलभा हेर्लेकर यांच्या अध्यक्षतेखाली गझलकार भीमराव पांचाळे यांच्या शुभहस्ते मा. गिरीश गांधी, वसुधा छत्रपती, डॉ. प्रमोद मुनघाटे, विजय जिचकार यांच्या विशेष उपस्थितीत हा प्रकाशन सोहळा संपन्न झाला.

महाराष्ट्रात ३५० गजलकारांमधे आज केवळ डझनभर महिला गझलकारांचा समावेश आहे. ही संख्या चिंता करण्यासारखी असली तरी भविष्यात महिला गझलकार क्रांती करतील असा विश्वास गझल नवाज भीमराव पांचाळ यांनी व्यक्त केला.

गिरीश गांधी यांनी या गझलकारांचे कौतूक केले आणि कवयित्रीच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

• **पुस्तक प्रकाशन सभारंभ** – यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर आणि साधना प्रकाशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार देवेंद्र गावंडे लिखित 'नक्षलवाद्यांचे आव्हान : दंडकारण्यातील अस्वस्थ वर्तमान' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ दि. २४ ऑगस्ट, २०११ रोजी आयोजित करण्यात आला. मा.गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली, सरदार पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमी हैद्राबादचे अतिरिक्त संचालक शिरीष जैन यांच्या शुभहस्ते दै.लोकमतचे संपादक सुरेश द्वादशीवार, डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या विशेष उपस्थितीत संपन्न झाला. सूत्रसंचालन डॉ. कोमल ठाकरे यांनी केले आभार धनंजय मांडवकर यांनी मानले.

• **गौतम राजाध्यक्ष यांना भावपूर्ण श्रद्धांजली** – विदर्भ साहित्य संघ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर ऑरेंज सिटी फोटोग्राफर्स असोसिएशन व पॅनकॅन या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ सप्टेंबर, २०११ रोजी मा. श्री. मनोहर म्हैसाळकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रसिद्ध छायाचित्रकार गौतम राजाध्यक्ष यांना भावपूर्ण श्रद्धांजली देण्यात आली. गिरीश गांधी, मनोहर म्हैसाळकर, प्रकाश एदलाबादकर विवेक रानडे, सुनील इंदाने, राजाभाऊ वर्मा यांनी आपली मनोगते व्यक्त केली. बाळ कुळकर्णी यांनी संचालन केले. शेवटी सर्व उपस्थितांनी गौतम राजाध्यक्ष यांना मूक श्रद्धांजली अर्पण केली.

• **पुस्तक प्रकाशन समारंभ** – यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नागपूर व आकांक्षा प्रकाशन, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२२ सप्टेंबर, २०११ रोजी अरुणा सबाने लिखित 'जीवाभावाचे' या आकांक्षा प्रकाशनच्या शंभराव्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ आयोजित करण्यात आला. मा. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली, प्राचार्य भगवान ठाकूर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. कवयित्री डॉ. सुलभा हेर्लेकर, डॉ. प्रमोद मुनघाटे, दै.सकाळचे कार्यकारी संपादक श्रीपाद अपराजीत यांनी या ललित बंधावर भाष्य केले.

डॉ. अक्षयकुमार काळे, विजय जिचकार व्यासपीठावर उपस्थित होते. सौ. शुभदा फडणवीस यांनी संचालन केले. समीक्षा शर्मा यांनी आभार मानले.

• **नवीन कार्यकारिणी बैठक** – यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या नवीन कार्यकारिणीच्या नव्याने सदस्य झालेल्या सदस्यांचा अभिनंदन सोहळा दि.२४ सप्टेंबर, २०११ रोजी घेण्यात आला. तसेच प्रतिष्ठानच्या कामकाजाची माहिती नवीन सदस्यांना करून देण्यात आली. या पुढील नवीन उपक्रम आणि कार्यक्रमाबद्दल चर्चा करण्यात आली.

• **नाट्य संहितेचा प्रकाशन समारंभ** – यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व मराठी बोली साहित्य संघ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२५ सप्टेंबर, २०११ रोजी डॉ.ईश्वर नंदपूरे लिखित 'अशी पाखरे येती' आणि 'अेकटी' या दोन नाट्य संहितेचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला. मा. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांच्या शुभहस्ते, सुभाष चांदूरकर, डॉ. राजन जयस्वाल, डॉ. सुनंदा देशपांडे, विजय जिचकार, रमेश बोरकुटे यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. प्रा. विजया मारोतकर यांनी संचालन केले.

• **पत्र परिषद** – यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने दि. २९ सप्टेंबर, २०११ रोजी सकाळी ९.०० वाजता राष्ट्रभाषा संकुलातील प्रेस कॉन्फरन्स सभागृहात खा. सुप्रियाताई सुळे यांच्या पत्रपरिषदेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी स्त्री–भ्रूणहत्येच्या विरोधात विदर्भात घेण्यात येणाऱ्या 'जागर हा जाणिवांचा तुमच्या माझ्या लेकीचा' स्त्री–भ्रूणहत्येच्या विरोधातील पदयात्रा व युवती परिषदेबद्दल या पत्रपरिषदेत त्यांनी दिली. यावेळी विदर्भातील मान्यवर मंडळी प्रामुख्याने उपस्थित होती. यावेळी मा. गिरीश गांधी यांनी प्रास्ताविक केले.

• **कुसुमाग्रजांचे साहित्य** – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, स्नातकोत्तर मराठी विभाग, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर, माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने 'कुसुमाग्रजांचे साहित्य' या द्विदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन दि. २९ व ३० सप्टेंबर, २०११ रोजी आयोजित करण्यात आले.

डॉ. निशिकांत मिरजकर यांच्या अध्यक्षतेखाली, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास सपकाळ यांच्या शुभहस्ते या चर्चासत्राचे उद्घाटन दु.१.०० वाजता करण्यात आले. याप्रसंगी गिरीश गांधी, डॉ. अक्षयकुमार काळे, रमेश बोरकुटे, प्रास्ताविक डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी केले. तर संचालन डॉ. कोमल ठाकरे यांनी केले. आभार प्रमोद लेंडे यांनी मानले. या दोन दिवसीय चर्चासत्रात विद्यार्थी प्राध्यापक यांनी सहभाग नोंदविला.

❑❑❑

# विभागीय केंद्र, औरंगाबाद
## कार्यवृत्त

**• 'बशर नवाजः ख्वाब, जिंदगी और मैं' माहितीपटाचे प्रदर्शन**

विभागीय केंद्र, औरंगाबाद यांच्यातर्फे निर्मित 'बशर नवाजः ख्वाब, जिंदगी और मैं' हा माहितीपट रविवार, दि. ६ मार्च २०११ रोजी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअर्स येथे प्रदर्शित करण्यात आला. या कार्यक्रमाला सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री मा. ना. फौजिया खान, विभागीय केंद्राचे विश्वस्त मा. बापुसाहेब काळदाते, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे निमंत्रक मा. दत्ता बाळसराफ, समन्वयक मा. विजय कान्हेकर, विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. नंदकिशोर कागलीवाल, सचिव मा. सचिन मुळे, कार्यकारी निर्माता तथा नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संघटक नीलेश राऊत, एमजीएमच्या मा. अपर्णा कक्कड, प्रायोजक तेजस आयटी सोल्युशन्सचे मा. प्रशांत पेंडसे, दिग्दर्शक मा. जयप्रद देसाई, शिक्षणतज्ञ मा. वि. वि. चिपळूणकर यांची उपस्थिती होती.

पहिल्या सत्रानंतर 'बशर नवाजः ख्वाब, जिंदगी और मैं' हा माहितीपट स्क्रीनद्वारे प्रदर्शित करण्यात आला. २५ मिनिटे कालावधीचा या हिंदी माहितीपटाला सर्वांनीच दाद दिली. माहितीपटाच्या प्रदर्शनानंतर मा. बशर नवाज, मा. प्रशांत पेंडसे, मा. वैभव देशमुख यांनी मा. बशर नवाज यांच्या गझल गायनाचा कार्यक्रमामध्ये सहभाग नोंदविला. यावेळी मा. पेंडसे व मा. देशमुख यांनी मा. बशर नवाज, यांच्या त्यांना आवडणाऱ्या गझला पेश केल्या मा. बशर नवाज यांनीही यावेळी शेर पेश केले. या कार्यक्रमालाही रसिकांनी भरभरून दाद दिली. शहरातील रसिकांनी मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थिती लावली.

**• जागतिक महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रम**

विभागीय केंद्र, औरंगाबाद यांच्यातर्फे मंगळवार, दि. ८ मार्च २०११ रोजी मुलींच्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये जागतिक महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उद्घाटन समारंभाकरिता ज्येष्ठ लेखिका मा. इंदुमती जोंधळे, प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्या मा. पी. व्ही. राऊत उपस्थित होत्या.

यानंतर महिला व मुलांकरिता सहाय्य कक्षाच्या रेणूका कड यांनी कक्षाची माहिती दिली. तसेच अनैतिक मानवी व्यापार वाहतूक कायदा - १९५६ या कायद्यासह स्त्रियांना संरक्षण देणाऱ्या भारतीय दंड संहितेतील सर्वच कलमांची व कायद्यांची त्यांनी माहिती दिली. दुपारच्या सत्रामध्ये प्रा. अपर्णा अष्टपुत्रे यांचे युवतींसाठी विवाहपूर्व समुपदेशन या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. समारोप सत्रामध्ये श्रुती पोहनेरकर व माधुरी भारती यांची प्रकट मुलाखत मीलन नायगडे यांनी घेतली. यावेळी 'जोर से बोल आणि क्या आपको पता है' या महिला सक्षमीकरणासंदर्भातील माहितीपट दाखविण्यात आले. कार्यक्रमामध्ये सुमारे तीनशे युवती उपस्थित होत्या.

**• यशवतंराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-विभागीय केंद्र, औरंगाबाद यांच्यातर्फे यशवंतराव चव्हाण यांना त्यांच्या ९८ व्या जयंतीनिमित्त देवगिरी महाविद्यालयामध्ये अभिवादन करण्यात आले. देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रदीप जब्दे यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करण्यात आले. यावेळी बोलताना जब्दे म्हणाले की, आजच्या राजकीय परिस्थितीमध्ये यशवंतराव चव्हाण यांचे राजकारण वैशिष्ट्यपूर्ण ठरते. त्यांच्या विचारांचा वारसा आजच्या राजकारण्यांनी जोपासण्याची गरज आहे. यावेळी विभागीय केंद्राचे समन्वयक सुहास तेंडुलकर, संघटक सुबोध जाधव, सहसंघटक अभिजीत विटोरे, दिपक जाधव, उमेश राऊत, जयंत लचुरे यांची उपस्थिती होती.

**• व्हिजन करिअर फेअर**

नवमहाराष्ट्र युवा अभियान, विभागीय केंद्र औरंगाबाद, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट व अभ्युदय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने औरंगाबाद येथे दि. २० ते २२ मे २०११ दरम्यान व्हिजन करिअर फेअर शैक्षणिक प्रदर्शन व करिअर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. करिअर फेअरचे उद्घाटन प्रसिद्ध दिग्दर्शक मा. चंद्रकांत कुलकर्णी यांच्या

हस्ते झाले. मंचावर महापौर अनिता घोडेले, मधुकरअण्णा मुळे, बापुसाहेब काळदाते, सचिन मुळे, विजय कान्हेकर, नीलेश राऊत, घाटी रुग्णालयाचे अधिष्ठाता के. एस. भोपळे, मनमोहनसिंग ओबेरॉय, विजेंद्र जाधव, उल्हास उढाण यांची उपस्थिती होती.

प्रदर्शनामध्ये भारतीय भूदल, नौदल, हवाईदलांचे स्टॉल्स सहभागी झाले होते. ॲनिमेशन, फॅशन डिझायनिंग, कॉम्प्युटर सायन्स, बायोटेक्नोलॉजी, स्वयंरोजगारासंदर्भात प्रशिक्षण देणाऱ्या संस्था, नृत्य-नाट्य-संगीत, एम.बी.ए., जॉब कन्सल्टन्सी, व्यावसायिक शिक्षणाशी संबंधित संस्था, शासकीय विभाग, समुपदेशन केंद्र, परकीय भाषांचे शिक्षण देणाऱ्या संस्था, पर्यटन, कृषीविषयक संस्थांचा सहभाग होता. या प्रदर्शनामध्ये एकूण ५६ संस्था सहभागी झाल्या होत्या. प्रदर्शनाला भेट देणाऱ्या प्रत्येक विद्यार्थी, विद्यार्थिनीची मोफत बुद्धिमापन चाचणी करण्यात आली. प्रदर्शन व व्याख्यानमालेला विद्यार्थी-विद्यार्थिनी व पालकांनी प्रचंड प्रमाणात गर्दी केली होती. येथे आयोजित व्हिजन करिअर फेअरमध्ये सुमारे २० हजारांवर विद्यार्थी-पालकांनी भेट दिली.

**३) आगामी उपक्रमः**

- **मा. वि. वि. चिपळूणकर यांच्या जीवनकार्यावर आधारित माहितीपटाची निर्मिती** – ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ मा. वि. वि. चिपळूणकर यांच्या जीवनकार्यावर आधारित माहितीपटाची निर्मिती करण्यात येणार आहे. याकरिता जून २०११ पासून प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आलेली आहे. या संदर्भात आर्थिक अंदाजपत्रक व इतर तपशील तयार करणे बाकी आहे.
- **युवती सक्षमीकरण कार्यशाळा** – विभागीय केंद्र, औरंगाबादतर्फे युवती सक्षमीकरण कार्यशाळेचे आयोजन करण्यात येते. या कार्यशाळेमध्ये किशोरी व युवतींमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा, विविध विषयांसंदर्भात त्यांना माहिती व मार्गदर्शन मिळावे, यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात येते. या वर्षी जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आयोजित करण्यात येईल.
- **युवा स्वातंत्र्यज्योत रॅली** – दि. १४ ऑगस्ट २०११ रोजी सायंकाळी युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे आयोजन करण्यात येणार आहे. युवांमध्ये स्वातंत्र्यदिनाविषयी आदर, अभिमान भावना निर्माण व्हावी, हा या मागील हेतू आहे.
- **यशवंत फिल्म फेस्टिव्हल** – यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-विभागीय केंद्र, औरंगाबाद व महात्मा गांधी मिशन यांच्यातर्फे ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात यशवंत फिल्म फेस्टिव्हलचे आयोजन करण्याचे प्रस्तावित आहे.
- **बी. रघुनाथ काव्यसंध्या** – बी. रघुनाथ काव्यसंध्या या सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात करण्यात येईल.

**'जागो औरंगाबाद' निर्धार फेरीत**

वेगाने वाढणाऱ्या औरंगाबाद शहरात सर्व पायाभूत सुविधांची पद्धतशीर अंमलबजावणी व्हावी, याकरीता सर्वच विकासयंत्रणांवर दबाव निर्माण होण्याकरिता सकाळ माध्यम समूहातर्फे 'जागो औरंगाबाद' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाची औरंगाबादसारख्या झपाट्याने विकसित होणाऱ्या शहरामध्ये अत्यंत गरज आहे. या उपक्रमांतर्गत दि. २४ जुलै २०११ रोजी आयोजित निर्धार फेरी आयोजित करण्यात आली.

युवा विकास व कल्याणात्मक कार्याचा वसा घेतलेली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र, औरंगाबाद ही संस्था विकासात्मक प्रश्नांवर उपाय व पाठपुरावा करण्यास तत्पर राहते. 'जागो औरंगाबाद' निर्धार फेरीतही विभागीय केंद्रातर्फे सहभाग नोंदवून पाठिंबा दर्शविण्यात आला.

या निर्धार फेरीमध्ये विभागीय केंद्राचे संघटक सुबोध जाधव, सहसंघटक अभिजीत विटोरे, जिल्हा संघटक मंगेश निरंतर आदींसह इतर कार्यकर्ते सहभागी झाले होते.

**'जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा...'**
**आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा दि. ८ ऑगस्ट २०११**

विभागीय केंद्र-औरंगाबाद, नवमहाराष्ट्र युवा अभियान, अभ्युदय फाउंडेशन व विद्यार्थी कल्याण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने देवगिरी महाविद्यालय येथे आयोजित 'जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा....' आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाली.

विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक मा. डॉ. वाल्मीक सरोदे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. प्रदीप जब्दे, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संघटक मा. नीलेश राऊत यांची उपस्थिती होती.

मा. नीलेश राऊत यांनी स्पर्धेमागील भूमिका विशद केली. महाराष्ट्र राज्यात मुलींचा कमी होणारा जन्मदर ही गंभीर समस्या

लक्षात घेता मा. सुप्रिया सुळे यांनी 'जागर हा जाणिवांचा, तुमचा माझ्या लेकींचा' हा उपक्रम हाती घेतला आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून जागर हा जाणिवांचा आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे, असे मा. नीलेश राऊत यांनी स्पष्ट केले.

वक्तृत्व स्पर्धेसाठी 'करूया स्त्री-जन्माचे स्वागत', स्त्री-भ्रूण हत्या : एक अक्षम्य चूक' व 'हुंडाबळी व स्त्री अत्याचारः समाज व्यवस्थेला लागलेले ग्रहण' हे विषय ठेवण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये जयप्रकाश नारायण महाविद्यालयाचा निकेश मदारे याने प्रथम (रूपये ३,००० व प्रमाणपत्र), पी. ई. एस. इंजिनीअरींग कॉलेजच्या पूजा कात्नेश्वरकर हिने द्वितीय (रूपये २,००० व प्रमाणपत्र) व कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबादच्या वेदांत कुलकर्णी याने तृतीय क्रमांक (रूपये १,००० व प्रमाणपत्र) पटकावला. तर विवेकानंद महाविद्यालयाचा मनीष पाटील व एम. पी. लॉ कॉलेजची सायली सेवेकर यांना उत्तेजनार्थ पारितोषिक (रूपये ५०० व प्रमाणपत्र प्रत्येकी) प्राप्त झाले. स्पर्धेचे पारितोषिक वितरण दि. ७ सप्टेंबर रोजी आयोजित बी. रघुनाथ काव्यसंध्या या कार्यक्रमात करण्यात आला.

स्पर्धेकरिता सुशील रेणापूरकर, प्रा. महेश अचिंतलवार, वाय. एच. बेन्नूर, प्रा. शिवानंद भानुसे, रेणुका कड हे परीक्षक म्हणून उपस्थित होते. प्रास्ताविक मा. अभिजीत विटोरे यांनी केले. मा. सुबोध जाधव यांनी आभार मानले. स्पर्धेमध्ये ९० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सर्व सहभागी स्पर्धकांना सहभागी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वीतेकरिता मंगेश निरंतर, उमेश राऊत, दीपक जाधव, जयंत लचुरे, मंगेश महामुने, किशोर नरवडे यांनी परिश्रम घेतले.

**'जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा...'**
**खुली पथनाट्य स्पर्धा दि. १० ऑगस्ट २०११**

विभागीय केंद्र-औरंगाबाद, नवमहाराष्ट्र युवा अभियान, अभ्युदय फाउंडेशन, नाट्यरंग व इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने देवगिरी महाविद्यालय येथे आयोजित 'जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा.....' खुली पथनाट्य स्पर्धा संपन्न झाली. यावेळी प्रा. अनुया दळवी, प्राचार्य रेखा शेळके, प्रा. महेश अचिंतलवार, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संघटक मा. नीलेश राऊत, सुबोध जाधव यांची उपस्थिती होती.

मा. नीलेश राऊत यांनी स्पर्धेमागील भूमिका विशद केली. महाराष्ट्र राज्यात मुलींचा कमी होणारा जन्मदर ही गंभीर समस्या लक्षात घेता मा. सुप्रिया सुळे यांनी 'जागर हा जाणिवांचा, तुमचा माझ्या लेकींचा' हा उपक्रम हाती घेतला आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून जागर हा जाणिवांचा खुली पथनाट्य स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे, असे मा. नीलेश राऊत यांनी स्पष्ट केले. मा. रेणूका कड यांनी सूत्रसंचालन केले. मा. सुबोध जाधव यांनी आभार मानले.

स्पर्धेसाठी 'स्त्री-भ्रुण हत्या' हा विषय ठेवण्यात आला होता. या स्पर्धेमध्ये श्रेयनगर महिला मंडळाने प्रथम पारितोषिक (रूपये ५,००० व प्रमाणपत्र), ओम अभिनय थिएटर्सला द्वितीय पारितोषिक (रूपये ३,००० व प्रमाणपत्र), मिलिंद कला महाविद्यालयास तृतीय पारितोषिक (रूपये २,००० व प्रमाणपत्र) मिळाले. निर्माती संघ व सावित्रीबाई फुले एकात्मिक समाज मंडळ यांना उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले. स्पर्धे चे पारितोषिक प्राप्त झाले. स्पर्धेचे पारितोषिक वितरण दि. ७ सप्टेंबर रोजी आयोजित बी. रघुनाथ काव्यसंध्या या कार्यक्रमात करण्यात आला.

स्पर्धेकरिता प्रा. अनुया दळवी, प्राचार्य रेखा शेळके, प्रा. महेश अचिंतलवार हे परीक्षक म्हणून उपस्थित होते. स्पर्धेमध्ये २० संघांनी सहभाग नोंदविला. सर्व संघातील स्पर्धकांना सहभागी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वीतेकरिता अभिजीत विटोरे, मंगेश निरंतर, दीपक जाधव, उमेश राऊत, जयंत लचुरे, मंगेश महामुने, किशोर नरवडे यांनी परिश्रम घेतले.

**युवा स्वातंत्र्यज्योत रॅली दि. १४ ऑगस्ट २०११**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियान, विभागीय केंद्र-औरंगाबाद यांच्यातर्फे रविवार, दि. १४ ऑगस्ट २०११ रोजी औरंगाबाद येथे युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. क्रांती चौक ते पैठण गेट या दरम्यान ही रॅली आयोजित करण्यात आली होती. पोलीस उपायुक्त सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते क्रांती चौक येथे रात्री ११ वाजता मशाल पेटवून या रॅलीची सुरूवात झाली. यावेळी विभागीय केंद्राचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, नीलेश राऊत, अण्णा वैद्य, सुबोध जाधव, उमर फारूखी यांची प्रमुख उपस्थिती होती.

रॅलीचे उद्घाटन केल्यानंतर घार्गे म्हणाले की, भारत देश युवांचा देश म्हणून ओळखला जातो. युवा शक्तीच भारताला महासत्ता बनवू. नंदकिशोर कागलीवाल म्हणाले की, युवांमध्ये

राष्ट्राभिमानाची भावना तेवत ठेवण्यासाठी अशा उपक्रमांमधून निश्चितच मदत होणार आहे.

युवांमध्ये स्वातंत्र्याविषयी जाणीव अधिक दृढ व्हावी, हे उद्दिष्ट समोर ठेवून शहरात मागील चार वर्षांपासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र-औरंगाबादतर्फे स्वातंत्र्यदिनापूर्वीच्या मध्यरात्री युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. क्रांती चौक ते पैठण गेट या दरम्यान रॅलीमध्ये सहभागी झालेल्या युवांनी भारत माता की जय, वंदे मातरम अशा घोषणा दिल्या. पैठण गेट येथे मध्यरात्री १२ वाजता भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे वाचन करण्यात आले आणि राष्ट्रगीताने रॅलीचा समारोप करण्यात आला. रॅलीमध्ये विविध संस्था-संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक, युवा व विद्याथी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रॅलीच्या यशस्वीतेसाठी अभिजीत विटोरे, मंगेश निरंतर, दिपक जाधव, उमेश राऊत, जयंत लचुरे, किशोर नरवडे, कृष्णा जाधव, प्रफुल्ल घोरपडे, अविनाश कोकणे, आदींनी परिश्रम केले.

**बी. रघुनाथ काव्यसंध्या दि. ७ सप्टेंबर २०११**

मुंबई-विभागीय केंद्र, औरंगाबाद व नाथ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. ७ सप्टेंबर २०११ रोजी रात्री आठ वाजता संत एकनाथ रंगमंदिर येथे बी. रघुनाथ काव्यसंध्येचे आयोजन करण्यात आले. यावेळी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांचे भाषण झाले. त्यानंतर सौ. आशालता करलगीकर निर्मित क्षितिजावरी थांबेन मी... हा उर्दू-मराठी गझल गायनाचा कार्यक्रम झाला. मा. कविता वतनी व प्रा. दिलीप दोडके यांनी या गझल गायनाचा कार्यक्रम सादर केला.

या कार्यक्रमामध्ये जागर हा जाणिवांचा महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा व खुली पथनाट्य स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. यावेळी विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. नंदकिशोर कागलीवाल, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संघटक मा. नीलेश राऊत, मा. सुहास तेंडुलकर, मा. सुबोध जाधव आदींची उपस्थिती होती.

❑❑❑

# कृषी सहकार व्यासपीठ व विभागीय केंद्र, पुणे
# कार्यवृत्त

**कृषी व सहकार व्यासपीठः**

कृषी व सहकार व्यासपीठाचे कामकाज श्री. अंकुशराव काकडे यांचे मार्गदर्शनाखाली चालते. जरूरीप्रमाणे मा. मोहन धारिया आणि डॉ. भागवतराव पवार यांचेही मार्गदर्शन या कामी घेतले जाते. व्यासपीठाचे दैनंदिन कामकाज श्री शं. त्रिं. भिडे पहातात. त्यांना श्री सुनील कदम आणि श्री रवी सरनाईक यांचे सहाय्य त्या कामासाठी मिळते.

**उपग्रह प्रतिमावर आधारित पीक विमा योजना :**

वरील विषयावर श्री भिडे यांनी तयार केलेल्या टिपणांवर दि. १८ फेब्रुवारी २०११ रोजी व्यासपीठातर्फे एक चर्चासत्र आयोजित केले होते. या संबंधाने उत्तरेतील काही राज्यामध्ये प्रायोगिक तत्वावर काही प्रयोग झाल्याचे दिसते; त्याची व्याप्ती भारतभर होणे अगत्याचे आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतावर झालेल्या नुकसानीची चोख,योग्य व पुरेपूर भरपाई मिळाल्यास शेतकऱ्यांचे दृष्टीने नैसर्गिक आपत्तीत तो मोठा आधार ठरून पीक विमा योजनेच्या सुयोग्य कार्यवाहीला मोठा आधार होऊ शकेल. त्याचप्रमाणे पूर, अतिवृष्टी, इत्यादी अनैसर्गिक आपत्तीत उपग्रह प्रतिमांवर आधारित नुकसान भरपाई शेतकऱ्यांना मिळाल्यास, सध्याच्या यंत्रणेतील गलथान कारभार, दिरंगाई सारख्या अनिष्ट प्रवृत्तींना आळा बसू शकेल या उद्देशाने चर्चेतील मुद्यावर टिपण तयार करुन ते मा. शरद पवार यांना मा. मोहन धारिया यांचे सहीने पाठविण्यात आले. तशाच प्रकारचे पत्र व टीपण मा. अंकुश काकडे यांचे सहीने योग्य त्या कारवाईसाठी महाराष्ट्र शासनाचे मंत्री महोदय कृषी व कृषी आयुक्त पुणे यांना सादर करण्यात आले.

त्याचप्रमाणे श्री. भिडे यांचे दोन लेख ॲग्रोवन या दैनिकात उपग्रह प्रतिमावर पीक विमा या विषयासंबंधात खालील शिर्षकाखाली प्रसिद्ध झाले आहेत (१) पीक विमा योजनेत अपयश का? (२) उपग्रह ठरतोय पीक पाण्याचा आरसा.

**सहकार समीक्षाः**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, कृषी व सहकार व्यासपीठ, राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण संस्थान नवी दिल्ली, तसेच वैकूंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान पुणे यांचे संयुक्त विद्यमाने सहकार समीक्षा या विषयवार एका राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यांत आले. त्यासाठी १) सहकार कायदे विषयक सुधारणा २) सहकारी संस्थात्मक सुधारणा ३) सहकारी धोरण विषयक सुधारणा असे विषय सुचविण्यात आले होते. त्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील सर्व सहकारी संस्था तसेच निवडक यशस्वी सहकारी संस्थांना वैकूंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान यांनी निमंत्रणे पाठविली तर महाराष्ट्रातील सर्व शिखर सहकारी संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका निमंत्रित करण्यात आले. सदर चर्चासत्र दि. १८ मार्च रोजी आयोजित केले होते. पण दिल्ली स्थित सहकारी संस्थांना सदर तारीख योग्य नसल्याने चर्चासत्र दि. ८ एप्रिल २०११ रोजी घेण्यात आले. चर्चासत्राला केंद्र शासनाच्या सहकार उच्चधिकार समितीचे अध्यक्ष मा. शिवाजीराव पाटील अध्यक्ष म्हणून लाभले. बीज भाषण केंद्र शासनाचे माजी सचिव डॉ. पद्माकर दुभाषी (भा.प्र.से) यांनी दिले. प्रमूख वक्ते म्हणून प्रो. निलकंठ रथ, अध्यक्ष स्कूल ऑफ पोलीटिकल इकानॉमी पुणे, सौ. लीलादेवी प्रसाद माजी मंत्री कर्नाटक राज्य बेंगळूरु आणि प्रो. व्ही. बी. जुगळे माजी प्रमुख अर्थशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर लाभले. समारोपाचे भाषण प्रा. राम ताकवले यांनी केले. स्वागताध्यक्ष म्हणून प्रतिष्ठानतर्फे श्री अंकुश काकडे तर वैकूंठ मेहता इन्स्टीट्यूट तर्फे संचालक श्री नीतीन गद्रे (भा.प्र.से.)यांनी काम पाहिले. राष्ट्रीय चर्चासत्राचे संयोजन प्रतिष्ठानतर्फे श्री भिडे तर वैकूंठ मेहता इन्स्टीटयुट तर्फे डॉ. मेधा दुभाषी यांनी केले. प्रा. पंडित यांनी आभार प्रदर्शन केले. या चर्चासत्रास इंडीयन सोसायटी फॉर स्टडीज इन कोऑपरेशनचे सचिव डॉ. कन्सल, खजिनदार श्री व्ही. जी. वर्तक तसेच डॉ. राव इत्यादींचा सहयोग लाभला.

चर्चासत्र अपेक्षेपेक्षा फारच उत्तम प्रकारे पार पडल्याचे संचालक वैकूंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान यांचे बोलण्यातून दिसले. सदर संस्थेचे रजिस्ट्रार डॉ. जोशी आणि प्रो. कुट्टी यांनी चर्चासत्र यशस्वी होण्यास आपले महत्वाचे योगदान दिले. सदर चर्चासत्राचे अनुषंगाने दि. २ मे रोजी केंद्र शासनाचे कृषी सचिव यांना भारतीय संविधानामध्ये सहकारी संस्था संबंधी जे दुरुस्ती विधेयक लोकसभेसमोर सादर करण्यात आले आहे त्यामध्ये प्रामुख्याने अनुछेद १९. (१) (सी) मध्ये सहकारी संस्थांचा उल्लेख करावा व त्यांनी सहकारी तत्वांचे पालन करावे अशी दुरुस्ती करावी. त्याचप्रमाणे संबंधीत सहकारी तत्वे घटनेच्या स्वतंत्र शेड्युल्ड मध्ये अंतर्भूत करण्यात यावीत अशी विनंती मा. अंकुशराव काकडे यांचे वतीने करण्यात आली आहे.

**सुरत संमेलन**

इंडियन सोसायटी फॉर स्टडीज इन कोऑपेरशनचे यंदाचे वार्षिक संमेलन दि. २५ व २६ मार्च २०११ रोजी सुरत येथे भरले होते. सदर संमेलनासाठी, सहकार कायद्यातील सुधारणा आणि बिगर शेती सहकारी पतसंस्थांचे प्रश्न व पुढील वाटचाल या दोन विषयावार शोध निबंध मागविणेत आले होते. त्यासाठी प्रतिष्ठानचे श्री भिडे आणि पंडित यांनी आपले प्रबंध सादर केले.

**आदर्श सहकारी गृह निर्माण संस्था मुंबई**

वरील संस्थेतील गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी मा. न्यायमूर्ती पाटील यांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्र शासनाने एका कमीशनची नेमणूक केली आहे. सदर कमिशनने सार्वजनिक आवाहन करुन लोकांकडून माहिती मागविली होती. त्या आवाहनावर प्रतिष्ठानचे कृषी व सहकारी व्यासपीठामध्ये दि. ५ फेब्रुवारी रोजी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. कमिशनने मागितल्याप्रमाणे सर्वश्री भिडे; कोकरे आणि उमर्जी यांनी आपली मते कमिशनकडे सादर केली. त्यामध्ये सार्वजनिक (शासकीय) राखीव जागेचा विनियोग, खासगी संस्थेसाठी (थोड्या व्यक्तिचे हितार्थ) करणे हे थिअरी ऑफ बेसिक स्ट्रक्चर्स या कायद्याचे तत्वप्रणालिशी विसंगत आहे. शासकीय जमिनीचे वाटप करताना ते पारदर्शकपणे व न्यायोचित होणेचे दृष्टीने त्यासाठी योजनाही सुचविण्यात आल्या.

**कटती आणि कायदा :**

नाशिक जिल्ह्यात कांद्याची आवक मार्केट यार्डामध्ये मोठ्याप्रमाणात होऊ लागल्यामुळे आणि व्यापाऱ्यांनी अपूर्ण वाळलेल्या कांद्यासाठी कटतीपोटी क्विंटलमागे दोन किलो वजन कापून कमी करण्याचे आरंभल्याने बरीच आरडाओरड सुरु झाली. त्यावर श्री भिडे यांचे खालील दोन लेख ॲग्रोवन दैनिकाने प्रसिद्ध केले.

१) शेतीमाल राखण्याची जबाबदारी कोणाची ? (२) म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण

त्याचप्रमाणे पाणीवाटप आणि लोकसहभाग या विषयावर ॲग्रोवन मध्ये श्री भिडे यांचे खालील दोन लेख प्रसिद्ध झाले.

१) जर्मन प्रकल्पाच्या वाढेने जाऊया (२) आमची माती प्रकल्प

**सहकार कायदा दुरूस्ती**

महाराष्ट्र शासनाने सहकारी संस्था कायद्यात दुरुस्तीसाठी तज्ञ समितीची नेमणूक केली होती. त्यामध्ये प्रतिष्ठानचे श्री शं. त्रिं. भिडे यांचा समावेश होता. सदर समितीच्या शिफारशीनुसार बिगर शेती सहकारी पत संस्थांसाठी सहकार कायद्यात स्वतंत्र प्रकरण समाविष्ट करणेसाठी सुचविलेली दुरुस्ती विधीमंडळाच्या उपसमिती समोर विचारार्थ पाठविणेत आली आहे. त्या उपसमितीचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील मंत्री महोदय सहकार, महाराष्ट्र शासन हे आहेत. त्यांना दि. ८ मे २०११ रोजी मा. अंकुशराव काकडे यांचे सहीने डॉ. दुभाषी उच्चाधिकार समितीच्या सहकार कायदा दुरुस्ती संबंधीच्या शिफारशी पाठविण्यात येऊन कायदा दुरुस्तीचा विचार करतांना सदर शिफारशीही विचारात घेऊन महाराष्ट्रासाठी आदर्श सहकारी संस्था कायदा करण्यासाठी हातभार लावावा अशी विनंती केली आहे. श्री भिडे यांचे महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा दुरुस्ती विधेयक या विषयाव ॲग्रोवनमध्ये दि. १०, ११ व १२ मे २०११ रोजी तीन लेख प्रसिद्ध केले.

सहकार चळवळीची दिशा या विषयवार ॲग्रोवन दैनिकात

१) सहकार चळवळीतील बांडगुळे हटवा (२) सहकारी संस्था स्पर्धाक्षम होतील ? असे श्री भिडे यांचे दोन लेख प्रसिद्ध झाले आहेत.

**शासनाचे सेंद्रीय शेती व निविष्ठा धोरण :**

प्रतिष्ठानने बळीराजा मासिका सोबत वरील विषयावर एक चर्चासत्र आयोजित केले होते. त्यानंतर श्री भिडे यांचा वरील

विषयावरील लेखही बळीराजा मासिकाचे डिसेंबर २०१० चे अंकात प्रसिद्ध झाला होता. त्यानंतर अफार्म या संस्थेमध्ये याच विषयावरील एका चर्चासत्रात श्री भिडे यांनी भाग घेतला. डॉ. सुधीर कुमार गोयल यांनी कृषी व पणन खात्याचा कारभार प्रधान सचिव म्हणून घेतल्याचे समजल्यावरून दि. ७ मार्च रोजी त्यांना मा. अंकुश काकडे यांचे सहीने पीक विमा योजना आणि सेंद्रीय शेती संबंधी प्रतिष्ठानने सुचविलेल्या सूचनांचा सहानभूतीपूर्वक विचार करणेसंबंधी प्रस्ताव सादर केला.

**बापूसाहेब खैरे यांचे दुःखद निधनः**

कृषी व सहकार व्यासपीठाचे संस्थापक सदस्य व २०१० अखेर पर्यंत वेळोवेळी मार्गदर्शन करून व्यासपीठाचे कामामध्ये तळमळीने भाग घेणारे पुरंदरचे माजी आमदार श्री बापूसाहेब खैरे यांचे अल्पशा आजाराने व वृध्दापकाळाने दुःखद निधन झाले. निधनापूर्वी झालेल्या भेटींत त्यांनी दि. ८ एप्रिल रोजी प्रतिष्ठान, वैकूंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान पुणे आणि राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण कॉउन्सील नवी दिल्ली यानी संयुक्तपणे आयोजिलेल्या राष्ट्रीय चर्चासत्राबद्दल आस्थेवाईकपणे चर्चा केली होती.

**नागरी सहकारी बँका आदर्श उपविधी :**

सहकार आयुक्त यांनी नागरी सहकारी बँकासाठी आदर्श उपविधी शासनाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध केले. त्यावर दि. २८.५.२०११ रोजी कृषी व सहकार व्यासपीठामध्ये एक चर्चासत्र आयोजित केले. त्यानंतर श्री शं. त्रिं. भिडे, श्री पी. बी कोकरे, श्री. व्ही. जी. वर्तक, श्री शरद भिडे, श्री जी. एच. उमर्जी यांची उपसमिती स्थापन करण्यात आली. सदर उपसमितीने प्रत्येक उपविधी त्याला समांतर असा पूर्वीचा उपविधी, केलेल्या दुरूस्त्या, त्याची कारणें नवे उपविधी इत्यादींचा सखोल अभ्यास केला. २९.६.२०११ चे पत्राने एक अहवाल सहकार आयुक्त मा. मधुकरराव चौधरी (भा.प्र.से.) यांना सादर करण्यात आला आहे. त्यामध्ये नवीन उपविधीमध्ये, क्रियाशील सभासद, सहकारी तत्वे, वादविवाद निवारण समिती इत्यादी ज्या नवीन तरतुदी आहे त्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्थानां लागू असणाऱ्या नव्या तरतूदी असल्याने पहिल्याने मूळ सहकारी कायद्यातच याबाबत तरतूद करण्यास सुचविले आहे. तसेच जुने उपविधी तसेच ठेवावे आणि त्यांत जरूरी पुरतेच बँकींग रेग्यूलेशन कायद्यातील नवे बदल लक्षात घेऊन मोजक्याच सुधारणा कराव्यात असे सुचविले आहे.

**हौसिंग सोसायट्यासाठी मॅन्यूअलः**

मा. सहकार आयुक्त कार्यालयाकडून सहकारी गृहनिर्माण संस्थासाठी सभासदांच्या तक्रारीचे निराकरण, सहकारी संस्थास्तरावरच होण्याचे दृष्टीने कायदे, कानून, उपविधी यांचे आधारे करण्यासाठी एक मॅन्यूअल तयार करणेत येत आहे. त्यासंबंधाने प्रामुख्याने संस्थाचे हिशोब वेळेचे वेळी लिहील्याशिवाय तक्रारी कमी होणे शक्य नाही आणि ही अडचण सोडविणेचे दृष्टीने महाराष्ट्र नॉलेज कार्पोशनचे सभासद व प्रतिष्ठानच्या विभागीय कार्यालयाचे अध्यक्ष श्री राम ताकवले यांचेशी चर्चा करण्यात येऊन त्यांनी सुचविलेप्रमाणे एम. के. सी. एल. ची अंदाजे ४००० एम. एस. सि. आय. टी. प्रशिक्षण कार्यालयाचे साहाय्याने वा सर्टीफाईड ऑडीटर्समार्फत सदर हिशोब लिहीण्याचे कामकाज वेळेत पूर्ण करुन ऑन लाईन माहिती शासनास करण्यासंबंधीचा प्रस्ताव मा. अंकुशराव काकडे यांचे सहीने मा. सहकार आयुक्तांना दि. ३.६.११ चे पत्राने समक्ष सादर केला आहे. त्याच्या प्रती डॉ. बधान, श्री. चौगुले, श्री ओऊळकर या अतिरीक्त निबंधकांना तसेच श्री पवार विभागीय सहनिबंधक पुणे यांना देऊन पाठपुरावा करण्यात येत आहे.

**पुणे केंद्र :**

प्रतिष्ठानच्या पुणे विभागीय केंद्राचे कामकाज मा. राम ताकवले यांचे अध्यक्षतेखाली चालते. दैनंदिन कामकाज श्री अंकुश काकडे सचिव व खजिनदार श्री शांतीलाल सुरतवाला पहातात. त्यानां कदम व श्री रवी सरनाईक यांचे सहाय्य असते.

पुणे कार्यालयातर्फे दरवर्षीप्रमाणे, हजारो वारकऱ्यांना रविवारी दि. २६ जून रोजी पहाटे साडे पाच ते साडे नऊ पर्यंत अल्पोपहार व औषध वाटपाचा कार्यक्रम चालू होता. औषधे वाटपात डॉ. अस्मिता शेवाळे यांचे सहकार्य लाभले. प्रतिष्ठान व सूरतवाला ट्रस्ट (अमेरिका) यांचे संयुक्त विद्यमाने वारकऱ्यांना डोळे तपासणी व चष्मे वाटप संध्याकाळी ४.३० पर्यंत अव्याहत चालू होते.

- **महाराष्ट्रासाठी आदर्श सहकारी संस्था कायदा :**

मा. शिवाजीराव गिरीधर पाटील यांचे अध्यक्षतेखाली केंद्र शासनाने नेमलेल्या उच्चाधिकार समिती (सहकार) यांच्या केंद्र

शासनमान्य शिफारशी राज्य शासनानी अंमलात आणाव्या यासाठी केंद्र शासनाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर शिफारशीमध्ये पहिलीच महत्वाची शिफारस, राज्य शासनानी ब्रह्मप्रकाश समितीने सुचविलेल्या व तदनंतरच्या समित्यांनी शिफारस केल्याप्रमाणे; आदर्श सहकारी संस्था कायदयाप्रमाणे आपापल्या राज्यांत सहकारी कायदा करावा अशी आहे.

हा विषय राज्य शासनाने महाराष्ट्रासाठी सहकारी संस्था कायद्यात सुधारणा करण्यासाठी जी कायदा तज्ञ समिती (सहकार) दि. ७.४.१० चे शासकीय आदेशाने नेमली त्यांचेपुढे आला तेव्हां प्रतिष्ठानचे सदर समितीवरील सदस्य, यानी आदर्श सहकारी संस्था कायद्याच्या प्रती सदर समितीचे सदस्य सचिव यांचे विनंतीनुसार सर्व सभासदाना उपलब्ध करून दिल्या.

यापूर्वी महाराष्ट्र शासनास या संबंधाने २००१ मध्येच जो महाराष्ट्रासाठी आत्मनिर्भर सहकारी संस्था कायद्याचा मसूदा त्यावेळचे सहकार आयुक्त डॉ. गोयल यांनी सादर केला व त्याची शिफारस मंत्रालय पातळीवर तपासणी होऊन मंत्रीमंडळाला केली गेली, त्याचा या कामी विचार व्हावा असे प्रतिष्ठानचे सहकार व्यासपीठाचे संयोजक यांचेकडून सुचविणेत आले.

मात्र सदर प्रस्ताव मंत्रीमंडळाने त्यावेळी मंजूर न केला असल्याने पुन्हा या शिफरशीचा तज्ञ समितीने स्वतंत्रपणे विचार करुन आपला अहवाल द्यावा असे १२.७.११ चे सहकार कायदा तज्ञ समितीचे सभेत ठरले.

सदर निर्णयाचे अनुषंगाने कृषी सहकार व्यासपीठाच्या दिनांक ५ व ११ ऑगस्ट २०११ चे सभेत सविस्तर विचार विनिमय झाला. त्यास सहकार खात्याचे माजी अधिकारी, विशेष निबंधक व अतिरीक्त आयुक्त (सहकार) श्री शेळके, अतिरिक्त निबंधक श्री काशीकर, शूगर लिबूवर्गीय फळे उत्पादक संघाचे अध्यक्ष डॉ. आप्पासाहेब भूजबळ, विभागीय सहनिबंधक व सध्या संचालक कॉसमास बँक श्री कोकरे, जिल्हा उपनिबंधक श्री पंडित, सहाय्यक निबंधक श्री वर्तक, वैकूंठ मेहता नॅशनल इन्स्टीटयूट ऑफ कोऑपरेटीव्ह मॅनेजमेंटचे प्रो. नाडकर्णी राज्य सहकारी बँकेचे आजी व माजी अधिकारी श्री कुलकर्णी आणि श्री शरद भिडे, सहकार न्यायाधीश श्रीमती परूळेकर, पुणे जिल्हा गृहनिर्माण सहकारी संस्था सहकारी संघाचे पदाधिकारी हजर होते व त्यानी आपली मते मोकळेपणाने त्या सभांत मांडली, माजी अतिरिक्त निबंधक व संचालक (साखर) श्री साबळे तसेच श्री प्र. गो. कोरान्ने (भाप्रसे) जे सभेस हजर राहू शकले नाहीत त्यानी आपली मते स्वतंत्रपणे कळविली. या सर्वांच्या मतांचा परामर्ष घेण्यात आला. त्याप्रमाणे श्री भिडे यांनी अहवाल तयार केला. सदर अहवाल मा. सहकार आयुक्तानां सदर केला आहे. त्या अहवालाचे आधारे महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायद्याचा नवा तर्जूमा, तज्ञ समिती (सहकार कायदा) सदस्य अॅडव्होकेट श्री श्रीकांत कानेटकर हे तयार करतील व तज्ञ समितीपुढे सादर करतील, असे तज्ञ समिती सदस्य सविवांकडून समजते.

**• सहकारी संस्थांतील क्रियाशील सभासदत्वः**

सहकारी संस्था सभासदानी संस्था उपलब्ध करून देत असलेल्या सेवांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेणे व संस्थेचे कामकाजात सहभाग घेणे अपेक्षित आहे. अशाच सभासदांना सभासदत्वाचे हक्क असावेत अशी शिफारस केंद्र शासनाचे उच्चाधिकार समितीने केली आहे. दि. १२.७.११ चे सहकार कायदा तज्ञ समिती सभेपूर्वी याबाबत विद्या सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री विद्याधर अनास्कर आणि प्रतिष्ठानचे प्रतिनिधी श्री भिडे हे मा. सहकार आयुक्तांना भेटले. श्री. अनास्कर यांनी सहकार संस्थांतील क्रीयाशील सभासदत्वाचा मुद्दा चर्चेसाठी उपस्थित करून आपल्या बँकेचे उपविधीत तशी सुधारणा करण्याचे व त्यास खात्याची मंजुरी असावी अशी विनंती केली. उपविधीत कशाप्रकारे दुरूस्ती करावी याबाबत श्री भिडे यांनी अॅडव्होकेट कानेटकरांशी चर्चा करून दुरूस्तीचा तर्जूमा विद्या सहकारी बँकेच्या अध्यक्षांना दिला. त्यानंतर या विषयावर प्रतिष्ठानतर्फे दि. १५.७.११ रोजी एक सविस्तर टिपण मा. सहकार आयुक्तांना सादर करणेत आले.

**• गृहनिर्माण सहकारी संस्थासाठी कामकाज सहिता (मॅन्यूअल)**

दि. १२.७.११ रोजी वरील विषयावरील प्रतिष्ठानचे टिपण श्री भिडे यानी मा. सहकार आयुक्त यांना सादर केले असतां त्यानी त्याकामी विभागीय सहनिबंधक पुणे यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचे दि. १९.७.११ चे सभेत हजर राहून प्रत्यक्ष या प्रतिष्ठानचे टिपणावर चर्चा व्हावी अशी सूचना केली. त्याप्रमाणे श्री ओऊळकर विशेष निबंधक व अतिरिक्त आयुक्त सहकार यानी तशा सूचना मॅन्यूअल समितीचे अध्यक्षांना दिल्या सदर समितीचे

सभेत प्रतिष्ठानच्या टिपणातील त्या सूचना (एक सूचना वगळता) मान्य करण्यात आल्या. प्रतिष्ठानने गृहनिर्माण सहकारी संस्थासाठी हिशोब लेखन करण्यासाठी संस्थेस हवे तर आऊट सोर्सींगव्दारे ते करावे अशी प्रा. राम ताकवले यांनी केलेली सूचना आपल्या टिपणात मांडली होती. समितीतील सदस्यांना मात्र यासाठी गृहनिर्माण सहकारी संस्था **व्यवस्थापकांचे केडर** असावे असे वाटत होते. श्री भिडे यांनी खात्याचा प्राथमिक कृषी पत पूरवठा सहकारी संस्थांचे सचिवाचे केडर यंत्रणेचा चीफ एक्झीक्यूटीव्ह ऑफीसर म्हणून ९ वर्षाचा राज्यस्तरीय अनुभव लक्षात घेता, सदर केडरचे प्रस्तावास आपला विरोध सभेत स्पष्ट केला. या संबंधीचा तसा प्रस्तावही मा. आयुक्तानां सादर केला आहे.

**• बिगर कृषी सहकारी पतसंस्थासाठी नियमांत सुधारणा :**

दि. २०.८.११ रोजी शासनाच्या सहकार कायदा तज्ञ समितीची बैठक सहकार आयुक्तांचे कार्यालयात भरली होती. त्यामध्ये बिगर कृषी सहकारी पत पुरवठा संस्थासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यात जे खास प्रकरण समाविष्ट करण्याचे बील पास करण्यात आले त्यातील कलमाखाली नियम करण्याचा विचार झाला. त्यासाठी प्रतिष्ठानचे वतीने एक खास टिपण करून सर्वानां देण्यात आले. त्यावर चर्चा होऊन त्यामध्ये तज्ञ समितीसदस्य ॲडव्होकेट कानेटकर आणि तज्ञ समिती अध्यक्ष सहकार आयुक्त यांनी सुचविलेल्या दोन दुरूस्त्यासह प्रतिष्ठानचे टिपणातील सूचविलेल्या नियमाना सहमती दर्शविणेत आली.

**• नाममात्र सभासदत्व :**

क्रियाशील सभासदत्वाचे पार्श्वभूमीवर नाममात्र सभासदत्वाचे इतिहास व औचित्याविषयी काही प्रश्न उपस्थित झाले. महाराष्ट्र शासनाचे विधीमंडळाच्या स्टॅण्डिग कमिटी (सहकार) मध्ये बिगर शेती सहकारी पतसंस्थांचे साठी सहकार कायद्यातील दुरूस्त्याबाबतचे चर्चेचे वेळी त्याबाबत विचारणा झाली होती. श्री ओऊळकर विशेष निबंधक व अतिरिक्त आयुक्त (सहकार) यांनी प्रतिष्ठानचे संयोजक श्री भिडे यांचेशी यावर चर्चा केली. सदर चर्चेचे अनुषंगाने प्रो. नाडकर्णी यांचेशी संपर्क साधून या विषयावर एक सविस्तर टिपण दि. १६.८.११ रोझी अतिरिक्त आयुक्त यांना पाठविण्यात आले आहे.

**• डीम्ड कन्व्हेअन्स अर्थात एकतर्फी हस्तांतरण**

मालक/बिल्डर/डेव्हलपर यानी महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट ॲक्टनुसार गृहनिर्माण सहकारी संस्था नोंदवून अगर अपार्टमेंटचे डिक्लेरेशन करून, गाळे खरेदीदारांचे या संस्थाकडे जमिनीचे हस्तांतरण करणे कायदेशीररीत्या बंधनकारक होते. या कायदेशीर तरतुदीकडे दुर्लक्ष करून, जमिनीवरील वाढीव एफ.एस.आय. अगर गाळा हस्तांतरणाचे वेळी हस्तांतरण शूल्क यांचा फायदा बिल्डर/डेव्हलपर घेत. शासनाने या बाबतीत लक्ष घालून जमीन व अन्य मालमत्तेचे हस्तांतरणासाठी **एकतर्फी हस्तांतरणाचे अधिकार** गेल्या चार वर्षाचे पाठपुराव्यानंतर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यानां दिले आहेत.

संबंधित संस्थांचे वैधानिक ऑडीटचे वेळी ह्या बाबीवर फक्त शेरे मारण्या ऐवजी या संबंधीची दोष दुरूस्तीची पूर्तता वैधानिक ऑडीटर्सनी करून घेण्याचे अधिकार त्यांना देण्यात यावेत व त्यासाठी त्यांना जादा मेहनतानाही द्यावा, जेणेकरून या कारवाईस गती मिळेल असा प्रस्ताव प्रतिष्ठानने दि. १०.१०.११ चे पत्राने मा. सहकार आयुक्तांना सादर केला आहे.

त्याचप्रमाणे पुणे केंद्राचे अध्यक्ष यांचे हस्ते सहकार खात्याचे ऑडीटर्स पॅनलवरील ५ लेखा परिक्षकांना एकतर्फी हस्तांतरीत संबंधाचे शासनमान्य **तक्त्यांचे संच** सहकार खाते निवृत्त सेवकांचे १६ व्या वार्षिक अधिवेशनात दि. ११.१०.११ रोजी वाटप करण्यात आले. त्यानी अधिवेशनातील सदस्याना संबोधतांना प्रतिष्ठानचे कृषी व सहकार व्यासपीठाचे कार्यक्रमात सदस्यानी आपला सहभाग द्यावा. त्यांना काही सूचना करावयाच्या असल्यास व्यासपीठाकडे त्या जरूर कराव्यात. त्या सूचनांचा सहानभूतीपूर्वक विचार केला जाईल असे आपल्या भाषणात विशद केले.

**• उपग्रह प्रतिमेवर आधारित पीक विमा योजना :**

पीकविमायोजना जास्त विश्वासार्हपणे कार्यान्वीत करता यावी या दृष्टीकोनातून मा. संचालक सुदूर संवेदन उपग्रह (प्रतिमा) यंत्रणा नागपूर यांचेशी पत्रव्यवहाराचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

**• ऊस संशोधन :**

दि. १०.९.११ चे बळीराजा मासिकाचे सभेमध्ये वसंतदादा शूगर इन्स्टीटयूटचे सायंटिफीक अधिकारी श्री सुनील दळवी यांच्या व्याख्यानामध्ये ऊस शेती बाबत विवरण करण्यात आले.

त्यावेळी झालेल्या चर्चेचे अनुषंगाने ऊस संशोधनाबाबत एक सविस्तर टिपण प्रतिष्ठानचे संयोजक श्री भिडे यांनी तयार करून ते व्यासपीठाचे अध्यक्षांचे मान्यतेने मा. शिवाजीराव देशमुख, सरसंचालक, वसंतदादा शुगर इन्स्टीट्यूट मांजरी बुद्रूक यानां पाठविण्यात आले.

**• कृषी पर्यटन परिषद (पळशीवाडी) बारामती :**

दि. २७.९.११रोजीश्रीपांडुरंगतावरेकृषीपर्यटनविकाससंस्था बारामती यांचे तर्फे महाराष्ट्र शासनाकडे कृषी पर्यटनाला चालना देण्यासाठी करावयाच्या मागण्यासंबंधाने सविस्तर चर्चा करण्यात आली. परिषदेला अंदाजे २०० हून जास्त सदस्य हजर होते. त्यात काही सदस्य गोवा व कर्नाटक राज्यातूनही उपस्थित होते. परिषदेत समारोपाचे भाषण श्री तावरे यांचे विनंतीवरून प्रतिष्ठानचे श्री भिडे यांनी दिले. प्रतिष्ठानमार्फत सदर मागण्यां बाबतचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

**पुणे केंद्र :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे पुणे केंद्राचे कामकाज नूतन अध्यक्ष मा. अजित निंबाळकर यांचे अध्यक्षतेखाली चालते. केंद्राचे सचिव मा. अकुंश काकडे व खजिनदार श्री शांतीलाल सुरतवाला हे केंद्राचे कामकाज पहातात. त्यांना कार्यालयीन काम करण्यात सर्वश्री कदम, सरनाईक व खताळ यांचे सहाय्य असते.

**१) लोकपाल आणि जनलोकपाल बील:**

सोमवार दि. २९.८.२०११ रोजी वरील विषयावर एक चर्चासत्र आयोजण्यात आले होते. त्यासाठी केंद्र शासनाचे पर्सोनेल पब्लीक ग्रीव्हन्सीस व पेन्शन्स मंत्रालयाने ३१.५.११ रोजी प्रसिद्ध केलेले व इंटरनेटवर उपलब्ध असलेले निवेदन चर्चेसाठी उपलब्ध करण्यात आले होते. त्या शिवाय इंडिया अगेंस्ट करप्शन यांच्या वेबसाईटवरून लोकपाल आणि जनलोकपाल या कायद्यांचा मसूदा तपासून प्रतिष्ठानमध्ये या विषयावर झालेल्या चर्चेचे अनुषंगाने दि. ३०.८.११ रोजीएकअहवालतयारकरूनतोमा. डॉ. अभिषेकमनूसिंघवीअध्यक्ष पार्लमेंट्री स्टॅडींग कमीटी यांना सादर करण्यांत आला. सदर कमेटीचे वतीने आपल्या सूचनांचा योग्य तो विचार केला जाईल अशा आशयाचे पत्र राज्यसभा सेक्रेटरिएटचे असिस्टंट डायरेक्टर यांचेकडून त्यांचे पत्र क्र. Rs ६.२.२०११ पी. ॲण्ड एल दी. २९.९.११ ने कळविणेत आले आहे.

❑❑❑

# विभागीय केंद्र, कराड
# कार्यवृत्त

सौ. वेणूताई चव्हाण यांची जयंती २ फेब्रुवारी रोजी असते. सौ. वेणूताईंचा जन्म २ फेब्रुवारी १९२३ रोजी फलटण येथे झाला. सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या सौ. वेणूताई चव्हाण सांस्कृतिक भवनातील सौ. वेणूताई यांच्या पुतळ्यास पुष्पहार, हळदी कुंकू आणि सुमनांजली सौ. कल्पनाताई दीपक पाटील यांनी वाहिली. या कार्यक्रमासाठी सर्व सेवक वर्ग, ट्रस्टच्या वाचक वर्गातील सर्व युवक युवती हजर होत्या.

- **स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण जयंती १२ मार्च**

स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण साहेब यांच्या समाधीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार पृथ्वीराज चव्हाण, नामदार पतंगराव कदम, नामदार जयंत पाटील, नामदार वीरवे पाटील, मा. माणिकराव ठाकरे, मा. खा. श्रीनिवासजी पाटील मा. अशोकराव गणपतराव चव्हाण, मा. आमदार बाळासाहेब पाटील, कोल्हापूरचे ना. सतेज पाटील, मा. आ. विक्रमसिह पाटणकर मा. आनंदराव पाटील या सर्वांनी प्रीतिसंगम येथे पुष्पचक्र अर्पण केले. सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मधील स्व. यशवंतराव चव्हाण आणि स्व सौ. वेणूताई चव्हाण यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले. सन्मननीय जेष्ठ नेते कलाप्पाण्णा आवाडे, मा. सुनील श्यामराव पवार, ॲडव्होकेट मानसिंगराव पाटील, कराडचे सन्माननीय जेष्ठ नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

भूतपूर्व केंद्रिय मंत्री स्व. आनंदरावजी चव्हाण (ना. मुख्यमंत्र्याचे वडील) आणि स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण यांचा कॉलेज जीवनात कसा ऋणानुबंध होता हे प्रतिष्ठानचे सचिव मोहनराव डकरे यांनी 'कृष्णाकाठ' या स्व. यशवंतरावजी यांच्या आत्मचरित्रातील उताऱ्याच्या आधारे स्पष्ट केले.

**मा. ना. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचा अभिप्राय –**

'आज मुख्यमंत्री झाल्यानंतरच पहिल्यांदाच कराडला येऊन चव्हाण साहेबांच्या समाधीचे दर्शन घेतल्यावर ही किती मोठी जबाबदारी आहे याची खऱ्या अर्थाने जाणीव झाली. कराडकरांच्या शुभेच्छा व आशीर्वाद घेऊनच मी कामाला आरंभ केला आहे.'

**– पृथ्वीराज चव्हाण** दि. २५/११/२०१०

सौ. वेणूताई सांस्कृतिक भवनामध्ये संस्कृती फाऊंडेशन कराड (श्री. विश्वास ताम्हणकर) यांचा 'माझा महाराष्ट्र' हा यशवंतरावजींच्या जीवनावरील राष्ट्रीय गीतांचा कार्यक्रम झाला. आदरणीय पी.डी. पाटील गौरव प्रतिष्ठान, कराडच्या मार्फत सर्व शाळा (प्राथमिक व माध्यमिक) यांच्या वतीने यशवंतरावजी चव्हाण यांच्या समाधीस्थळावर १२,००० पेक्षा जास्त विद्यार्थी विद्यार्थीनी गीतसुमनांजली यशवंतरावजींना वाहतात. यावर्षी हा कार्यक्रम चांगला झाला. या शिवाय भक्तीसंगीताचा (भजनाचा) कार्यक्रमही समाधी परिसरातल्या पर्णकुटीत पार पडला.

नवमहाराष्ट्र युवा अभियान, कराडच्या वतीने सकाळी ८ वाजता भव्य रॅली सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्ट ते यशवंतराव चव्हाण समाधीस्थळ काढण्यात आली. श्री. सुहेल बारस्कर यांच्या नेतृत्वाखाली ही पदयात्रा काढण्यात आली.

स्व. यशवंतरावजी चव्हाण यांनी स्थापन केलेल्या शिवाजी शिक्षण संस्थेच्या सर्व माध्यमिक शाळा व महाविद्यालयातील शिक्षक, मुख्याध्यापक, प्राचार्य, प्राध्यापक, प्राध्यापिका गावातील प्रमुख जेष्ठ नागरिक यांचीही भव्य पदयात्रा सौ. वेणूताई ट्रस्ट ते स्थळ अशी आयोजित केली होती. स्व. यशवंतरावाच्या स्मृतीस कराड, कराड परिसरातील व सातारा जिल्ह्यातील मान्यवरांनी समाधीवर फुले अर्पण करुन आदरांजली वाहिली.

**नवमहाराष्ट्र युवा अभियान मेळावा**

शनिवार, दि. ३० एप्रिल २०११ रोजी नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या कराड शाखेचा भव्य मेळावा आयोजित केला. सन्माननीय आमदार मा. बाळासाहेब पाटील त्याचप्रमाणे मा. दत्ता बाळसराफ, संयोजक, नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि त्यांचे सहकारी यानी मेळाव्याला मार्गदर्शन केले. श्री. किरण पाटील, श्री. सोहेल बादस्कर यांनी मेळावा यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. मा. दत्ता बाळसराफ यांचे अनमोल मार्गदर्शन यावेळी झाले. आमदार मा. बाळासाहेब पाटील यांची प्रेरणा या मेळाव्याच्या यशासाठी मार्गदर्शक ठरली.

**डॉ. बाळासाहेब आंबेडकर जयंती**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार होते. योगायोगाने याच दिवशी १४ एप्रिल १९४६ रोजी स्वर्गीय मा. यशवंतरावजी चव्हाण महाराष्ट्र शासनात पार्लमेंटरी सेक्रेटरी झाले. आंबडेकरांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून प्रतिष्ठानमध्ये आणि नगरपालिकेच्या समोरील त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आले.

**ग्रंथालय व्यवस्थापन कोर्स शुभारंभ**

श्री शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या प्रौढ आणि निरंतर विभाग यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या ग्रंथालय व व्यवस्थापन कोर्सची सुरुवात २० एप्रिल २०११ पासून झाली. माननीय अशोकराव गणपतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते कोर्सचे उदघाटन झाले. या कार्यक्रमासाठी मा. ए.डी. पाटील, मा. ए.ए. पवार, श्री. श्रीधर कुलकर्णी, मा. अबोली उमराणी आदी प्राध्यापक हजर होते.

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र, कराड ची वार्षिक सभा.**

दि. १ मे २०११ रोजी दुपारी ४ वाजता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. नामदार जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. विविध विषयांवर मार्गदर्शन मा. नामदार साहेबांनी केले. सभेसाठी माननीय आमदार बाळासाहेब पाटील, मा. विलासरावजी पाटील (वाठारकर), डॉ. प्रतापराव बाजीराव पाटील हजर होते.

**सौ. वेणूताई चव्हाण पुण्यतिथी**

सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरीटेबल ट्रस्ट आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र, कराड यांच्या वतीने सौ. वेणुताई स्मारक भवनात डॉ. सौ. वासंती टेंभे यांचा शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम झाला. शास्त्रीय संगीताशिवाय भक्तीसंगीत, नाट्यगीते यांचाही यात समावेश होता. तब्बल ३ तास हा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमासाठी मा. खासदार श्रीनिवासजी पाटील, मा. आमदार बाळासाहेब पाटील, मा. सुनील शामराव पवार (विश्वस्त), मा. अशोकराव ग. चव्हाण, ॲडव्होकेट पाटील (कायदेशीर सल्लागार), मा. विलासराव पाटील (वाठारकर) विश्वस्त, श्री शिवाजी शिक्षण संस्थचे सचिव मा. प्रकाशबापू पाटील आदी मान्यवर हजर होते.

सन्मानीय नामदार शरद पवारसाहेब यांचा आदरणीय स्व. पी. डी. पाटीलसाहेब यांच्यावर दृढविश्वास होता. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र, कराड आणि सौ. वेणुताई चव्हाण पब्लिक चॅरीटेबल ट्रस्ट, व्यवस्थापन त्यांच्या अनुभवी कुशल मार्गदर्शनाखाली सुव्यवस्थित चालत असे. स्व. यशवंतरावजी चव्हाणसाहेब यांना आदरणीय पी.डी. पाटीलसाहेब यांनी समर्थ साथ दिली. खऱ्या अर्थाने त्यांनी कराडचा सर्वांगीण विकास केला. यासाठीच त्यांना कराड नगरीचे शिल्पकार म्हटले जाते. कृष्णा व कोयना या दोन नद्यांच्या संगमावर त्यांनी यशवंत उद्यान उभारले.

**१५ ऑगस्ट २०११**

विभागीय मुंबई केंद्र कराड येथे व सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्टमध्ये सामाजिक कार्यकर्ते श्री. जितेंद्र डुबल, सदस्य, जिल्हा सहकारी बोर्ड व प्रकाशराव पाटील, अध्यक्ष, भूमिपुत्र फाऊंडेशन, कराड यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. सर्व सेवकांनी राष्ट्रध्वजास मानवंदना दिली.

**१६ ऑगस्ट २०११**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्र कराडच्या वतीने शिवाजी विद्यापीठ यांच्या सहकार्याने ग्रंथालय व्यवस्थापन कोर्स गेली १५ वर्षे सतत सुरू आहे. त्याचा निकाल लागून २६ पैकी २२ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

**ति. विठामाता स्मृतिदिन**

ति. विठामातांनी यशवंतरावजींना सुसंस्काराचे पाठबळ दिले. परिस्थितीशी लढायला शिकवून त्यांना स्वाभिमानाची दिक्षा दिली. स्वतः निरक्षर असूनही त्यांना शिक्षणाची महती माहित होती. शिक्षण हा तिसरा डोळा आहे, अशी त्यांची श्रद्धा होती. 'नका बाळानु डगमगु, चंद्रसूर्यावरील जाईल ढगू' अशी त्यांची सार्थ शिकवण होती. सौ. वेणुताईना त्यांनी मुलीप्रमाणे वागविले. ति. विठामातांच्या ओव्या एक साहित्यिक चमत्कार आहे. सौ. ताईंनी तो जपला आहे. यशवंतरावजींचे आजोळ 'देवराष्ट्रे' या ठिकाणी त्यांच्याच नावाचे एक विद्यालय आहे. या विद्यालयाला ५० वर्षे पूर्ण झाली. दि. २१ नोव्हेंबर रोजी खासदार सौ. सुप्रियाताई सुळे, विश्वस्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांचे हस्ते सुवर्णमहोत्सव कार्यक्रम झाला. यावेळी 'लेक वाचवा हो' मोहिमेचाही शुभारंभ झाला. प्रत्येक वर्षी यशवंत एज्युकेशन सोसायटी व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, कराड केंद्राच्यावतीने कार्यक्रम आयोजित केला जातो. यावर्षी मा. अशोकराव चव्हाण विश्वस्त सौ. वेणुताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराड आणि त्यांच्या भगिनी श्रीमती लिलाताई काळे, मा. अशोकराव चव्हाण हे मा. यशवंतराव चव्हाण यांचे बंधू स्व. गणपतराव चव्हाण यांचे ज्येष्ठ चिरंजीव व श्रीमती लिलाताई काळे कन्या आहेत.

समारंभाच्या प्रमुख सौ. विजयाताई पाटील जागृती फाऊंडेशन, कराड यांचे अभ्यासपूर्ण भाषण झाले.

कार्यक्रम भावपूर्ण वातावरणात पार पडला. देवराष्ट्रमधील अनेक मान्यवर या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

**आदरणीय स्व. पी. डी. पाटीलसाहेब पुण्यतिथी**

१७ सप्टेंबर २०११

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र कराडचे पदाधिकारी,मार्गदर्शक व दैनंदिन कार्यावर आदरणीय.पी. डी. पाटील साहेबांचे बारकाईने लक्ष होते. यावर्षी श्री. शिवाजी शिक्षण संस्थेच्या मसूर येथील विद्यालयात यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्राचे सचिव श्री. मोहनराव डकरे यांचे व्याख्यान झाले. स्वातंत्र्यपूर्व काळातले मसूर हे एक स्वातंत्र्य चळवळीचे महत्त्वाचे केंद्र होते. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या सहकाऱ्यांपैकी स्व. राघुअण्णा लिमये व विष्णू (मास्तर) निगडीकर आदी महत्त्वाचे स्वातंत्र्यसैनिक हे मसूरचे रहिवासी होते.

**सदिच्छा भेट**

सन्मानीय नामदार जयंत पाटील अध्यक्ष यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र कराड यांनी कराड येथील कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. मा. खा. श्री. श्रीनिवास पाटील, मा. शामराव पाटील अध्यक्ष राजाराम बापू सहकारी बँक पेठ त्यांच्या समवेत होते. विभागीय केंद्राचे सचिव श्री. मोहनराव डकरे यांनी विभागीय केंद्राची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. मा. नामदार जयंत पाटील साहेब यांनी एकंदरीत कारभाराबद्दल समाधान व्यक्त केले.

**गांधी जयंती**

२ ऑक्टोबर २०११

स्वातंत्र्यचळवळीतील जेष्ठ नेते महात्मा गांधी (मोहनदास करमचंद गांधी) यांची जयंती भावपूर्ण वातावरणात करण्यात आली. त्यांच्या प्रतिमेस सर्व सेवकवर्ग व वाचकवर्ग यांनी विनम्र अभिवादन केले.

**सौ. वेणूताई चव्हाण संशोधन ग्रंथालयातील अभ्यासवर्ग**

सौ. वेणूताई चव्हाण ग्रंथालयातील ग्रंथालयाचा अभ्यासवर्ग सकाळी ७ ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत सुरू असतो. पन्नासपेक्षा जास्त विद्यार्थी-विद्यार्थीनी अभ्यासाचा लाभ घेत असतात. विशेषतः स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणारे विद्यार्थी-विद्यार्थीनी अभ्यास करतात. यावर्षी १२ विद्यार्थ्यांनी यश मिळवले. पी. एस. आय., तलाठी क्षेत्रात त्यांची निवड झाली. ट्रस्टमार्फत त्यांना आवश्यक ती पुस्तके पुरविली जातात. या विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क घेतले जात नाही.

❑❑❑

# विभागीय केंद्र, नाशिक
# कार्यवृत्त

### चंद्रकंस मैफिल

शुक्रवार, दि. १८ फेब्रुवारी २०११

आकाशात पौर्णिमेचा चंद्र उगवत असताना सतारीवर 'चंद्रकंस' रागाची सुरावट सुरु झाली. जोडीला होते पखवाज. हे रसिकाला नादरंगी रंगविणारे वाद्य. सतारीचे मृदुत्व आणि पखवाजचे नादत्व यांची जुगलबंदी उत्तरोत्तर रंगत गेली आणि रसिकांनी एका अविस्मरणीय मैफलीचा अनुभव घेतला. निमित्त होते यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या नाशिक शाखेच्यावतीने आयोजित 'नादरंग' या मैफलीचे.

बेल्जियमचे पाश्चात्य सतारवादक बर्ट कार्नेलिस आणि पद्मश्री शंकरराव आपेगांवकर यांचे पुत्र व शिष्य पंडीत उद्धव आपेगांवकर यांनी या दोन वाद्यांचा सुसंवाद साधला. चंद्रकंस रागातील आलापीने सतारीला बोलायला लावत कार्नेलिस यांनी मैफलीचा प्रारंभ केला. या वादनाचा रसिकांनी मन:पूर्वक आनंद घेतला. जलद गतीत सुरताल पेश केले. साडेतीन मात्रांमध्ये पखवाज वादनातून दमदार अनुभूती रसिकांना मिळाली. प्राचीन काळात लोकप्रिय असलेली सिंधू भैरवी ऐकण्याची संधी मिळाली. पारंपरिकता आणि आधुनिकतेचा समन्वय असणारी सतार–पखवाजची जुगलबंदी संस्मरणीय ठरली. पखवाज व सतार वादनाची जुगलबंदी म्हणजे दोन पारंपारिक वाद्यांमधला संवाद आहे. देश, भाषा यांच्या पलीकडे स्वरांची भाषा ही अभिजात असते असे पंडीत उद्धव आपेगांवकर यांनी नमूद केले. बर्ट कार्नेलिस यांनी भारतीय संगीतामधल्या वैशिष्ट्यपूर्ण सुरांविषयी आपले मत व्यक्त केले. भारतातील प्रत्येक मैफल हा मला शिकण्यासाठी नवा अनुभव असतो असे सांगितले. यावेळी त्यांनी मैफलींचे अनुभव कथन केले.

कार्यक्रमापूर्वी प्रास्ताविक विश्वास ठाकूर यांनी केले. पंडीत उद्धव आपेगांवकर यांचे स्वागत शिवाजी तुपे यांनी व बर्ट कार्नेलिस यांचे स्वागत दत्ता सराफ यांनी केले. विनायक रानडे व श्रृती जोशी यांनी कलाकारांचा परिचय करुन दिला. ही अनोखी जुगलबंदी अनुभवण्यासाठी रसिकश्रोत्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. मृदू मुलायम साज म्हणून कीर्ती असणारी सतार आणि कर्णकठोर वाटणारे वाद्य पखवाज यांची मैफल संस्मरणीय ठरली.

### 'सिनेमा आपला आणि त्यांचा' वक्ते सुप्रसिद्ध चित्रपट समीक्षक अशोक राणे

शुक्रवार, दि. ११ मार्च २०११

चित्रपट पहायचा आणि ऐकायचा याचे एक तंत्र असून भारतीय चित्रपटांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. त्यासाठी जागरुक प्रेक्षक वर्ग निर्माण होण्याची गरज आहे. चित्रपटाच्या माध्यमातून सामाजिक जाणिवा आणि सामाजिक गरजा अधोरेखित करण्याची गरज आहे. सिनेमांच्या भाऊगर्दीत चांगल्या विषयावर आधारीत जाणता प्रेक्षक, तंत्रातील आधुनिकता यांचा संगम निर्माण करणे चित्रपट क्षेत्राकडे एक आव्हान आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध चित्रपट समीक्षक श्री. अशोक राणे यांनी केले.

यशंवतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र, नाशिकतर्फे यशवंतराव चव्हाण यांच्या ९८ व्या जयंतीनिमित्त आयोजित 'सिनेमा आपला आणि त्यांचा' या विषयावर श्री. राणे बोलत होते. यावेळी श्री. राणे यांनी भारतीय आणि जागतिक सिनेमा याविषयी तुलनात्मक विवेचन केले. सत्यजीत रे, गोविंद निहलानी, श्याम बेनेगल, अमोल पालेकर, जब्बार पटेल, सुनील सुकथनकर, सई परांजपे, सुमित्रा भावे अशा अनेक दिग्दर्शकांच्या सिनेमातील वास्तव आणि सामाजिक जाणीव यातील सुसंगता विशद केली. जागतिक सिनेमा यशस्वी होण्यामागची तांत्रिक मीमांसाही त्यांनी उदाहरणे देऊन अधोरेखित केली. जागतिक चित्रपट महोत्सव आणि त्यातील दाखवण्यात येणारे चित्रपट, त्याविषयी समिक्षकांची प्रतिक्रिया, प्रसिद्धी माध्यमांची भूमिका याविषयीही त्यांनी आपले विचार व्यक्त केले.

मराठी सिनेमा आणि आजची परिस्थिती यांचा परस्पर संबंध दाखवताना त्यांनी विनोदी चित्रपटांची आलेली लाट आणि आशयपूर्ण चित्रपटांचा असलेला स्वतंत्र रसिक वर्ग याविषयी मत व्यक्त केले. देशातील चित्रपटांचे प्रदर्शन, विविध दैनिके यातील

चित्रपट विषयक लेखन, चित्रपट आस्वाद शिबिरांची गरज, अध्यापन, चर्चासत्रांची गरज अशा अनेक महत्वपूर्ण बाबींवर श्री. राणे यांनी प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक सुरेश वाघ यांनी केले. अशोक राणे यांचा परिचय डॉ. अमित नागरे यांनी करुन दिला. सूत्रसंचलन श्रुती जोशी यांनी केले. या कार्यक्रमासाठी दादासाहेब फाळके फिल्म सोसायटीचे अध्यक्ष विजय जानोरकर तसेच विजय अहलुवालिया, संतोष पाटील, रघुनाथ फडणीस आदी मान्यवर उपस्थित होते.

**बालवाचक मेळावा**

शनिवार, दि. २३ एप्रिल २०११

वाचन संस्कृतीच्या विकासासाठी बालवाचकांचा सहभाग ही अत्यंत मूलभूत गोष्ट असून पुस्तकांच्या माध्यमातून विधायक विचारांचे बीज बालकांमध्ये रुजवता येते. त्यासाठी त्यांचे मन जाणून घेण्याबरोबरच त्यांच्या मनाला आकार देण्याचे काम पुस्तके करीत असतात. मुलांचे मानसशास्त्र जाणून घेण्यासाठी पुस्तकेच मोलाची कामगिरी करीत असतात असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाच्या कला शाखेचे अधिष्ठाता डॉ. अविनाश आवलगावकर यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयुट तर्फे यशवंतराव चव्हाण ग्रंथालय व सार्वजनिक वाचनालय आयोजित 'जागतिक पुस्तक दिना' निमित्त आयोजित बालवाचक मेळाव्यात डॉ. आवलगावकर बोलत होते. जोपर्यंत भाषा आहे तोपर्यंत संस्कृती आहे. त्यासाठी वाचन संस्कृती ही प्रभावी गोष्ट आहे. भाषेविषयी नितांत श्रद्धा बाळगणे म्हणजेच भाषेची जोपासना करणे होय असेही ते म्हणाले. 'ग्रंथ तुमच्या दारी' या उपक्रमाअंतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आनंदवल्ली येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात हा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी ग्रंथपेटीचे देणगीदार डॉ. प्रितेश जुनागडे, डॉ. उमा बच्छाव, डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी विश्वास ठाकूर यांनी या उपक्रमाची भूमिका मांडली. ते म्हणाले की, बँकेच्या माध्यमातून विविध सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. तोच विचार घेऊन बालवाचकांमध्ये अभिजात साहित्याविषयी अभिरुची निर्माण व्हावी या उद्देशाने ही मोफत योजना सुरु करण्यात आली आहे. भावी पिढी संपन्न आणि समृद्ध घडवणे हा यामागचा विचार आहे. विश्वास को-ऑप. बँकेच्या आठही शाखांबरोबरच नाशिक शहरात पंधराहून अधिक परिसरात ही योजना सुरु करण्यात आली असून त्याला बालवाचकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. यावेळी सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी यांनीही आपले विचार मांडले. ते म्हणाले की, आजच्या टी. व्ही. चॅनेल्सच्या जमान्यात नव्या पिढीला वाचनाकडे नेण्याचा उपक्रम स्तुत्य आहे. यातूनच लहान मुलांच्या मानसिक, वैचारिक व्यक्तिमत्वाला नवी दिशा मिळू शकेल. कामगार वर्गाच्या मुलांसाठी असलेल्या 'दिशा स्कूल' च्या विद्यार्थ्यांना ग्रंथपेटी प्रदान करण्यात आली. सुधा मेहता यांनी पेटीचा स्वीकार केला. या उपक्रमाचे समन्वयक विनायक रानडे यांनी 'ग्रंथ तुमच्या दारी' विषयी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमास बालवाचकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. डॉ. आवलगावकर यांचा परिचय श्रुती जोशी यांनी केला तर आभार हरी विनायक कुलकर्णी यांनी मानले.

**अभिनय व व्यक्तिमत्व विकास शिबीर**

दि. १६ मे २०११ ते दि. २१ मे २०११

स्वतःतले चांगले गुण शोधून त्यांना योग्य दिशा देण्याचे काम व्यक्तीमत्व शिबिरातून होत असते. अशी शिबिरे म्हणजे आनंद मिळविण्याचा एक भाग असतो. यातून आपल्यातील प्रभावी गुणांचा शोध घेणे म्हणजेच अष्टपैलूत्व सिद्ध करणे होय असे प्रतिपादन सुप्रसिद्ध अभिनेते व दिग्दर्शक सचिन शिंदे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिक व विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूटतर्फे आयोजित 'अभिनय व व्यक्तीमत्व विकास' शिबिराच्या समारोपप्रसंगी श्री. शिंदे बोलत होते. ते म्हणाले की, आजच्या टी.व्ही., चॅनेल्सच्या जमान्यात वाचन हरवत चालले आहे. वाचन ही जगण्याला समृद्ध करणारी गोष्ट आहे. त्यासाठी वाचन करणे म्हणजेच जगाकडे नव्या दृष्टीने बघणे होय. आपल्या मर्यादा ओळखून करिअर निवडा व त्यात सातत्य राखा, एकमेकांशी संवाद वाढवा, एकमेकांना जाणून घ्या, जगण्याची कला वाढवा असेही श्री. शिंदे म्हणाले.

कोल्हापूर येथील रंगकर्मी संजय हळदीकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिष्ठानच्या सभागृहात हे शिबीर संपन्न झाले. ५ ते १७ वर्षे वयोगटातील मुला-मुलींचा शिबिरास उदंड प्रतिसाद लाभला. यावेळी प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी शिबीर

आयोजनामागची भूमिका मांडली. लहान मुलांच्या सुप्त गुणांना व्यासपीठ उपलब्ध करुन देणे हा या मागचा उद्देश आहे, त्यातून निश्चितच उद्याची कलागुण संपन्न पिढी निर्माण होईल.

संजय हळदीकर म्हणाले की, मुला-मुलींच्या जडण-घडणीत शिक्षणाला जसे महत्त्व आहे तसेच आजच्या जगात सभाधीटपणा, संभाषण कला, निरीक्षण क्षमता, एकाग्रता, सुप्त गुणांचा विकास, स्वतःला सादर कसे करावे, वैचारिक सकसता, सादरीकरण, सांघिकता ह्या गुणांचा विकास होणे महत्त्वाचे आहे. यासाठी मुलांनी मनापासून प्रतिसाद दिला.

यावेळी शिबिरार्थींच्या वतीने ऋचा देशमुख व पूर्वा चिंचोलीकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच शिबिरार्थींनी एकपात्री प्रयोगाचे व दीर्घांकाचे सादरीकरण केले. सहभागी शिबिरार्थींना प्रमाणपत्राचे वाटप सचिन शिंदे यांचे हस्ते करण्यात आले. समारंभाचे स्वागत, प्रास्ताविक व सूत्रसंचालन हरी विनायक कुलकर्णी यांनी केले.

**'जागर मनाचा' - व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा मार्गदर्शक : शंतनु गुणे**

शुक्रवार, दि. १० जून २०११ ते रविवार, दि. १२ जून २०११

प्रत्येक व्यक्तीमधील सकारात्मक मूल्यधिष्ठित मानसिकता आणि कृतीशीलता हाच व्यक्तीच्या कुटुंबाच्या, समाजाच्या उद्योगाच्या, राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीचा पाया असतो. आज हा पाया डळमळीत होत चालला आहे. त्यासाठी सत्वाची नवी जाणीव आणि त्यामधून स्वतः कडे व जगाकडे पाहण्याची दृष्टी विकसित करण्याची गरज आहे. त्यातूनच मनाची मैत्री त्याच्या सामर्थ्यांची जाणीव व धारणा शक्ती आपल्याला होत असते असे प्रतिपादन सुप्रसिद्ध समुपदेशक व व्यवस्थापन तज्ज्ञ शंतनु गुणे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिक, विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट व सृजन यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागर मनाचा' या व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी श्री. गुणे यांनी आपला आणि सृष्टीतील जीवनाचा परस्पर संबंध व त्यातून आपली खरी ओळख सत्वाची जाणीव, व्यक्तिमत्वातील गरजा आणि त्यासाठी लागणारी ऊर्जा, आजची मानसिकता, मन नावाचे उपकरण समजून घेणे, मनाचे प्रोग्रॅमिंग, आजच्या वास्तवावर आधारीत भविष्याचे चित्र नेतृत्व क्षमतेचा विकास अशा विविध पैलूंवर कार्यशाळेत मार्गदर्शन केले. 'हे जगणे आनंदाचे' हा मंत्र त्यांनी यातून दिला.

कार्यशाळेचे उद्घाटन करताना प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर म्हणाले की, समाजात आज वाढत चाललेली नकारात्मक मानसिकता व बदलती कुटुंब व्यवस्था, ताणतणाव यांचा शोध घेऊन यावर उपाय म्हणजे अशा कार्यक्रमांचे आयोजन होय. यातून निश्चितच स्वतःच्या जीवनाचे नेतृत्व करणारी चारित्र्यसंपन्न पिढी निर्माण होईल. तसेच कर्तृत्वसंपन्न आनंदी जीवन जगण्यासाठी मानसिकतेमध्ये परिवर्तन करण्यासाठी, यशस्वी व्यक्तिमत्वासाठी या मार्गदर्शन कार्यशाळेचा निश्चितच उपयोग होईल.

या कार्यशाळेला शिबिरार्थींचा उत्साहवर्धक प्रतिसाद लाभला.

शनिवार, दि. २५ जून २०११

जातीच्या विळख्यात अडकलेल्या समाजात अलिकडच्या काळात मोठ्या प्रमाणावर बदल होत आहेत, समाजाची मानसिकता बदलत आहे, समाजात संपत्तीची निर्मिती करणे ही कोणाची मक्तेदारी असून नये, तंत्रज्ञानामुळे जग जवळ येत असल्याचे सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल होत आहे. अशा अस्थिर आणि सहनशीलतेच्या पलीकडे चाललेल्या समाजाची विधायक दृष्टीने वैचारिक मांडणी होणे गरजे आहे, असे प्रतिपादन लेखक डॉ. गिरीश जाखोटिया यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिक व गौतमी प्रकाशन, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित डॉ. जाखोटिया यांच्या 'स्टोरी ऑफ मारवाडी' या पुस्तकाचे प्रकाशन संपन्न झाले. 'बदलती परिस्थती आणि लोकांसमोरील आव्हाने' या विषयावरील व्याख्यानात डॉ. जाखोटिया बोलत होते. ते म्हणाले की, संपत्तीची निर्मिती एका समाजाची, राष्ट्राची मक्तेदारी असता कामा नये. सध्या समाजाचा वैचारिक गोंधळ सुरु आहे. वेगवेगळ्या अस्मितांमध्ये जग दुभंगले जात आहे. कल्पनेपलिकडचे हे सारे बदल आहेत. अनेक शहरांमध्ये काही कुटुंबे पिढ्यान्‌पिढ्या राजकरणात आहेत. तेथे बदलाची प्रक्रिया होताना दिसत नाही. शेतीचेही स्वरुप उद्योजकीय असायला हवे. पण गेल्या ६०-७० वर्षांत राजकीय प्रतिनिधींनी तशी दृष्टी दिली नसल्याचे डॉ. जाखोटिया यांनी सांगितले.

पुस्तकाचे प्रकाशन प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून अतूल

चांडक हे उपस्थित होते. यावेळी संजय पेठे यांच्या माय विश्व वेबासाईटतर्फे 'स्टोरी ऑफ मारवाडी'च्या ई-बुकचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी बोलताना विश्वास ठाकूर म्हणाले की, डॉ. जाखोटिया यांच्या लेखनात मराठी भाषा, मराठी जीवनशैली यांचे चित्रण आहे. तसेच जगाविषयीचे अर्थकारणाच्या मानसिकतेविषयीचे चिंतन आहे. हे पुस्तक समाज प्रबोधन करते त्याचबरोबर समाजाच्या बदलत्या आधुनिक मानसिकतेचा चेहराही समोर आणते. अतुल चांडक म्हणाले की, इंग्रजी अनुवादाच्या निमित्ताने या पुस्तकाची व्यापक पातळीवर नोंद होत आहे हे भूषणावह आहे. मराठी परंपरेचे, संस्कृतीचे जागतिक पातळीवर आदान-प्रदान करण्याचे अनुवाद हे प्रभावी माध्यम आहे.

या कार्यक्रमासाठी साहित्य व कलाक्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय लोळगे यांनी केले तर आभार गौतमी प्रकाशनाच्या संचालिका सारिका देशमुख यांनी मानले.

**रंगवर्षा कला उत्सव**

शुक्रवार, दि.२९ व शनिवार, दि. ३० जुलै २०११

श्रावणात रंगणारा ऊन पावसाचा खेळ कागदावर उतरवण्यासाठी जलरंग माध्यम अनुकूल आहे. हिरव्या, निळ्या, जांभळ्या रंगछटांमधून पावसाळी तरल वातावरण रसिकाला आनंद देते असे प्रतिपादन ज्येष्ठ निसर्गचित्रकार शिवाजीराव तुपे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिकतर्फे 'रंगवर्षा कला उत्सवाचे' उद्घाटन शिवाजीराव तुपे यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना त्यांनी चित्रकलेच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. अंजनेरी, त्र्यंबकेश्वर, गंगापूर या परिसरात केलेल्या निसर्गचित्रणाचे अनुभव सांगून नाशिकचा धुवाधार पाऊस, गोदेचा महापूर, त्र्यंबकेश्वर परिसरातील भातशेतीचे केलेले चित्रण यांच्या आठवणी नमूद केल्या.

या रंगवर्षा कला उत्सवात नाशिक कलानिकेतन संचलित चित्रकला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी रंगवलेल्या 'पाऊस आणि वर्षाऋतु' या विषयावरील चित्रकृतींचे प्रदर्शन म ांडण्यात आले होते. स्वागत व प्रास्ताविक प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष विश्वास

ठाकूर यांनी केले. ते म्हणाले, कलावंत मोठे झाले तर शहर समृद्ध होते. ते व्हावे, यासाठी नवी दिशा व नवा अविष्कार असे या उपक्रमाचे स्वरूप आहे.

चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य दिनकर जानमाळी उपस्थित होते. ते म्हणाले, सृजनाची नवी उर्मी वर्षाऋतु देतो. मुंबईत जसे मान्सून शो होतात, तसे हे व्यासपीठ विद्यार्थ्यांना मिळाले आहे. पावसाची विविध रूपे कल्पकतेने चित्ररूपात येथे मांडली आहेत. दोन दिवसीय कला उत्सवामध्ये चित्रकला म हाविद्यालयातील युवा चित्रकारांनी स्वत:च्या कल्पनेतील पावसाचे रंग कॅन्व्हासवर उधळून अनेकविध रूप प्रस्तुत केले होते. कोणी निसर्गामधील वैविध्य रंगवले, तर कोणी पावसामुळे उडालेली त्रेधातिरपीट, पावसात भिजलेल्या तरुणी, नदी-नाल्यांमध्ये उड्या मारताना मुले, पाण्यातले कीटक, बेडूक, तर फक्त लपून पावसाचा आनंद घेणारे मुले कॅन्व्हासवर हुबेहूब साकारलेले होते. या कला उत्सवाच्या निमित्ताने चित्रकार प्रा.संजय बागूल यांचे 'पोट्रेट' या विषयावर तर चित्रकार अशोक ढिवरे यांचे 'निसर्ग चित्रण' या विषयावर प्रात्यक्षिक झाले.

प्रा. संजय बागुल यांनी विद्यार्थ्याला समोर मॉडेल बसवून कॅन्व्हासवर बाह्यरेषा रेखाटली. ग्रे रंग छटेने पार्श्वभूमी रंगवली. शॅडो टू रंगकाम करून दोन तासात कृष्णवर्णी मॉडेलचे व्यक्तिमत्व साकारले व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. चित्रकार अशोक ढिवरे यांनी 'निसर्ग चित्रण' या विषयावरील प्रात्यक्षिक सादर केले. रंगलेपन, शैली, चित्राचा विषय समजून घेऊन त्यावर विचार करणे, आवश्यक रंगाचा वापर करून चित्ररूप साकारणे अशा विविध विषयांवर ढिवरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

कला उत्सवाच्या समारोपप्रसंगी प्रख्यात शिल्पकार राम थत्ते म्हणाले की, कलावंतांना अभिव्यक्त होण्यासाठी, सृजनशीलतेच्या विकासासाठी वाचन, मनन यांची गरज असून चौफेर निरीक्षण व साधनेत सातत्य हे महत्त्वाचे घटक चित्रांतून नवा आशय व्यक्त करायला मदत करतात. आजचे तरुण चित्रकार हे समकालीन व नवनवीन विषयांना घेऊन आपला अविष्कार सादर करीत आहेत हे कौतुकास्पद आहे. चित्रकलेतील विविध माध्यमांचाही कलाकारांनी चित्रनिर्मितीच्या अविष्कारासाठी उपयोग करावा.

रंगवर्षा कला उत्सवात उत्कृष्ट कलाकृतींना गौरविण्यात आले. यात 'अ' गटात स्नेहल गौल, कल्याणी गोडसे, समीर निंबेकर तर 'ब' गटात हर्षद पाचोरकर, आशिष चौधरी, जयेश बोरसे यांचा समावेश होता. कला उत्सवासाठी चित्रकार बाळ नगरकर, मुक्ता बालिगा, प्रफुल्ल सावंत, संजय साबळे, नंदू गवांदे, विनायक रानडे तसेच कलाक्षेत्रातील मान्यवर उपस्थित

होते. रंगवर्षा कला उत्सवात शंभराहून अधिक युवा चित्रकारांनी आपला सहभाग नोंदविला.

शनिवार, दि. ७ ऑगस्ट २०११

काश्मीरमध्ये सर्वेक्षणाचे काम करीत असताना अनाथ मुलांसाठी आधाराश्रम दिसले, मात्र मुलींसाठी काही व्यवस्था नव्हती. तेव्हापासून त्यांच्यासाठी काम करण्याचे ठरविले. काश्मीरमध्ये महिलांना समाजात मानाचे स्थान नाही. त्यांना ते स्थान देण्याचा प्रयत्न सुरू केला आहे, असे प्रतिपादन काश्मीरमधील अनाथ मुलींचा सांभाळ करणारे अधिक कदम यांनी आज येथे केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिकतर्फे झालेल्या कार्यक्रमात 'बॉर्डरलेस वर्ल्ड फाऊंडेशनच्या बसेरा-एतबस्सुम' याविषयी त्यांनी संवाद साधला. यावेळी त्यांच्या कार्याची माहिती देणारी ध्वनिचित्रफीतही दाखविण्यात आली. श्री.कदम म्हणाले की, महाविद्यालयात शिकत असताना राज्यशास्त्र अभ्यासक्रमाच्या रिसर्च वर्ल्ड सर्व्हेसाठी काश्मीरला गेलो होतो. तेव्हा काश्मीरमधील परिस्थिती बघितली. तेथे सेवाभावीपणे काम करण्याचे ठरविले. त्याला आता १४ वर्षे पूर्ण झाली आहेत. हे काम करताना अनेक अडचणी आल्या. हे काम पूर्ण होण्यास अजून बराच कालावधी लागणार आहे. काम पुढे सुरू राहील. यासाठी कार्यकर्त्यांची फळी तयार करण्यात येत आहे. समाजशास्त्राचा अभ्यासक्रम पूर्ण करणारे विद्यार्थी महाराष्ट्राबाहेर काम करण्यास जाण्यास तयार नाहीत. काश्मीरसारख्या ठिकाणी तर कुणीही जात नाही. सीमेरेषेवरून कुणीही येत असते. त्यांनी भीतीने प्रवेश दिला जातो. सीमेरेषे-वरील प्रश्न गंभीर आहेत. काश्मीरमध्ये दहशतवाद्यांचे हल्ले नेहमीच होतात. त्यामुळे आमच्या सोबत आलेले अनेक मित्र महाराष्ट्रात निघून आले. पाकिस्तानातून अनेक दहशतवादी येत राहतात. दहशतवादी आल्याची माहिती पुरविणाऱ्यांना भर चौकात शेकडो लोकांसमोर अत्यंत निर्दयपणे ठार केले जाते. तेथे काम करू द्यायचे नाही, आम्हाला अन्न, पाणी, राहायला जागा द्यायची नाही यासाठी तेथील मौलवींनी फतवा काढला होता; पण आम्ही गावागावांत काम केलेले असल्याने तेथील लोकांनीच आम्हाला सहारा दिला. हे काम करीत असताना अनेकदा दहशतवाद्यांनी पळून नेल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. सध्या बॉर्डरलेस वर्ल्ड फाऊंडेशनकडे जम्मू-काश्मीरसह इतर सीमावर्ती भागतील १९० मुली आहेत. या मुलींना आता विविध संस्थांची मदत होत आहे. आम्ही त्यांना आधार देण्याबरोबरच त्यांना सर्व सुविधा, शिक्षण देण्यासाठी कार्यरत आहोत. या मुलींच्या मनातील दहशत कमी होण्यासाठी देशातील विविध शहरात चांगल्या कुटुंबांमध्ये काही दिवस त्यांना ठेवण्याचा उपक्रम राबवून त्यांना प्रेमाचा ओलावा देण्याचा प्रयत्न करीत आहोत. विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून कुपवाडा, अनंतनाग तसेच इतर एका ठिकाणी सुसज्ज वसतिगृह व शाळा उभारण्याचे कार्य चालू आहे. यावेळी प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर, सीमा हिरे, विजय साने, पां.भा.करंजकर, देवदत्त जोशी, जितेंद्र भावे, विनायक रानडे व अनेक मान्यवर उपस्थित होते.

रविवार, दि.१४ ऑगस्ट २०११

कविता सादरीकरण करताना कवितेतला आशय तितक्याच समर्थपणे रसिकांपर्यंत पोहोचवणे ही कवितेची नवी जाणीव निर्माण करते. त्यासाठी कवितेचे आकलन, भाषिक सौंदर्य याचाही अभ्यास करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवी

किशोर पाठक यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिकतर्फे आयोजित कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित 'कविता सादरीकरण' स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात मार्गदर्शन करताना केले. यावेळी त्यांनी कुसुमाग्रजांच्या कवितेचे आशय सौंदर्य, भावगर्भता, सामाजिक भान याविषयी भाष्य केले. कुसुमाग्रजांची कविता चिरंतन जगण्याचा शोध घेते आणि जगण्याला बळ देते असेही ते म्हणाले.

याप्रसंगी बोलताना नाट्य कलावंत सदानंद जोशी म्हणाले की, कवितेचे सादरीकरण करणे म्हणजे कवितेची लय पकडणे होय. शब्दांमधली नादमयता आणि नाट्यमयता यांची सांगड म्हणजे आशय संपन्न कविता होय. कवितेतल्या कोऱ्या जागेतल्या अंतरालाही एक लय असते, त्यातूनच कवितेचा अर्थ प्रगट होतो त्यासाठी कवितेची साधना करणे गरजेचे आहे. यावेळी त्यांनी कुसुमाग्रजांचे माणूसपण, आदरभाव याविषयी आपले विचार व्यक्त केले व निवडक कवितांचे सादरीकरण केले. शब्दोच्चाराचे भानही कवितेच्या अर्थाशी निगडित बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले.

स्वागत व प्रास्ताविक करताना कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर म्हणाले की, कवी कुसुमाग्रजांच्या कवितेची थोरवी आणि समृद्धी नव्या पिढीला व्हावी व मानवतावादाचा विचार साहित्यातून मांडणाऱ्या कुसुमाग्रजांना अभिवादन करण्यासाठी अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन प्रतिष्ठानतर्फे करण्यात येत आहे. यावेळी

कवयित्री संजीवनी पाटील यांनी स्पर्धेत सहभागी झालेल्या कवितांवर विश्लेषणात्मक भाष्य केले.

'हसरा नाचरा जरासा लाजरा श्रावण आला' अशा श्रावणाच्या नवेपणाची चाहूल घेणारी कविता तसेच जगण्यासाठी बळ देणारी 'कणा' कविता 'मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा' रसिकांनी सादर केल्या. 'दूर देशी राहिलेले दीन त्याचे झोपडे बापुडा आज येथे पायवाटेला पडे' अशी आर्तता शब्दातून मांडत होते. 'एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार होता पायतळी अंगार, गर्जा जयजयकार, क्रांतीचा गर्जा जयजयकार' असा क्रांतीचा उद्घोष कवींनी शब्दातून मांडला.

कविता सादरीकरण स्पर्धेत खुल्या गटात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्रांजली बिरारी यांना तर द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक अरुण सोनवणे व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक सुखदा बेहेरे यांना मिळाले. उत्तेजनार्थ पारितोषिक वसंत मुळे व विजय वराडे यांना देण्यात आले.

इयत्ता ९वी ते १२वी गटात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक अश्विनी केळकर यांना, द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्रफुल्ल

लेले यांना तर तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्रथमेश कुलकर्णी यांना देण्यात आले.

इयत्ता ५वी ते ८वी गटात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक समृद्धी शुक्ल यांना, द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक श्रावणी शिंदे यांना तर तृतीय क्रमांकाचे पारितोषिक ज्ञानदा कुलकर्णी यांना देण्यात आले. उत्तेजनार्थ म्हणून दोन विशेष पुरस्कार मृण्मयी केंगे व ओमकार टिल्लू यांना देण्यात आले.

स्पर्धेसाठी शंभरहून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवला व जोरदार प्रतिसाद दिला. संपूर्ण स्पर्धेचे सूत्रसंचालन समन्वयक विनायक रानडे यांनी केले.

बुधवार, दि.५ ऑक्टोबर २०११

आनंद, दु:ख, पश्चाताप अशा विविध मानवी भावभावना सुप्रसिद्ध मनोविश्लेषक डॉ.आनंद नाडकर्णी यांनी उलगडल्या. 'रंग भावनांचे' या कार्यक्रमातून श्रोत्यांना मानवी स्वभावाची अनेक रहस्ये उकलली.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिक व कुसुमाग्रज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ते म्हणाले की, पश्चातापाची भावना चांगली असते, कारण व्यक्ती आपली चूक कबूल करून पुढे मार्गक्रमण करते. परंतु मनात सलत असलेली भावना मात्र प्रदीर्घ काळापर्यंत त्रास देते. याकरिता भावनिक विरेचन झाले पाहिजे. भावनिक संतुलन कसे राखावे,याविषयीही त्यांनी मार्गदर्शन केले.

९ ऑक्टोबर हा जागतिक मानसशास्त्र दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त विविध ठिकाणी मानसशास्त्र सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. गेल्या दहा वर्षांचा आढावा घेतला असता मानसिक असंतुलनाचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. त्याचबरोबर, नैराश्य व अस्वस्थतेमुळे आत्महत्त्येस प्रवृत्त झालेल्यांचे प्रमाण देखील वाढले आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनायकदादा पाटील यांनी स्वागत केले. यावेळी हेमंत टकले, अॅड.विलास लोणारी, नीलमताई किर्लोस्कर, डॉ.श्याम आष्टेकर, रत्नाकर पटवर्धन, वंदना अत्रे, अरविंद ओढेकर, अरुण ठाकूर आदी उपस्थित होते. लोकेश शेवडे यांनी प्रास्ताविक केले.

❑❑❑

# विभागीय केंद्र, लातूर
# कार्यवृत्त

**ईद ए मिलादनिमित्त कार्यक्रम :**

दि. १६/०२/२०११ रोजी ईद ए मिलाद निमित्त लातूर शहरातील मुस्लीम बांधवांना विभागीय केंद्राच्या वतीने हार्दिक शुभेच्छा देण्यात येवून हिंदू मुस्लीम ऐक्य वृध्दिंगत करण्यासाठी मुस्लीम बांधवांना या सणानिमित्त विनंती करण्यात आली.

**जलसंस्कृतीचे जनक शंकरराव चव्हाण :**

रविवार दि.२७/०२/२०११ रोजी नांदेड येथील लालबहादूर शास्त्री सभागृहात जलसंस्कृतीचे जनक शंकररावजी चव्हाण या विषयावर प्रा. डॉ. महादेव मोरे यांनी आपले मौलिक विचार मांडले. प्रारंभी विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यगीत व पाहुण्यांचे स्वागतगीत गावून सभागृहाचे लक्ष केंद्रित केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे सदस्य प्राचार्य डॉ.इंगोले हे होते. या कार्यक्रमात विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे व प्रा. उत्तमराव सूर्यवंशी यांनीही आपले अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला डॉ.जगदीश कदम, प्रा.प्रभाकरराव जाधव आदी मान्यवर व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. शिवाजी जाधव यांनी सर्वांचे मनोमन आभार मानले.

**जागतिक महिला दिन :**

मंगळवार दि. ८ मार्च रोजी महिलांचे आरोग्य, शिक्षण, स्त्रीभ्रुण हत्या या संदर्भात चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या चर्चासत्रात प्रा. साधनाताई जगताप, प्रा. कुसुमताई जोशी, प्रा. श्रीमती कमलाताई कुलकर्णी इ. भगिनींनी आपले मौलिक विचार मांडले.

**यशवंतराव चव्हाण यांची ९८ वी जयंती उत्सव :**

शनिवार दि. १२/०३/२०११ आज आपल्या देशात चंगळवादी व भोगवादी संस्कृतीने थैमान घातले असून विधी, वैद्यक, शिक्षण उद्योगधंदा व प्रशासन इ. सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचाराचे स्तोम माजल्याने व्यावसायिक नीतिमत्ता लोप पावत आहे. तिची परिणती आज वैचारिक व मूल्यात्मक दिशा ओस पडत असून निरपेक्षपणे सामाजिक प्रबोधन घडवून आणणाऱ्या विचारवंतांना समाज विघातक शक्तीकडून प्रतिबंध होत असून विचारवंताची व समाज प्रबोधनकाराची दुर्मिळ जात नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला आहे. अशा भयावह स्थितीत अखिल मानव जातीला अंगुलीनिर्देश करून मानवतेची दिशा दाखवणारा संस्कारक्षम यशवंतराव घराघरातून संस्कारक्षम मातापित्यांनी साकार करावा असा प्रखर आशावाद दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वामन पाटील यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र लातूरच्या वतीने आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार माजी उपपंतप्रधान मा.यशवंतराव चव्हाण यांच्या ९८ व्या जयंतीनिमित्त ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या बलदवा सभागृहात आयोजित कार्यक्रमात यशवंतराव चव्हाण व आजची व्यावसायिक निती या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून बोलताना व्यक्त केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. शिवाजी माडे हे होते.

**धुलीवंदन हे कसे व्हावे यानिमित्त बैठक :**

दि. १९/०३/२०११ रोजी लातूर येथील अंधश्रद्धा निर्मूलन जिल्हा शाखा व विभागीय केंद्र लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने रात्री ७.०० वा. लातूर शहरातून धुलिवंदन व रंगपंचमी यात होत असलेला वेडावाकडा खर्च व अश्लिल भाषा नको म्हणून शहरातून रॅली काढण्यात आली.

**धुलिवंदन व रंगपंचमी :**

रविवार दि. २०/०३/२०११ रोजी निष्कारण वृक्षाचे सरपण न जाळता रस्त्यावरील केरकचरा, घाणी दूर करून त्याला अग्नि पेटवून धुलिवंदन साजरी करण्यात यावी याबद्दल लोकात जागृती करण्यात आली.

**रंगपंचमी :**

रंगपंचमी वेगळे स्वरूप धारण करीत असून हे अनावश्यक स्वरूप टळले पाहिजे, त्यात घाणीचे आरोग्यावर होणारे परिणाम या पद्धती बंद करून एकमेकांना प्रेमाची देवाणघेवाण हीच रंगपंचमीची खरी ठेव, खरा सण साजरा करणे योग्य याचा प्रसार प्रचार करण्यात आला.

दि. ०३ एप्रिल २०११ :

पुढील दोन कार्यक्रमानिमित्त बैठक आयोजित करण्यात आली. १) महात्मा फुले जयंती व २) माजी कुलगुरू तथा विभागीय केंद्राचे खा. डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त घ्यावयाच्या कार्यक्रमाची पूर्वतयारी.

**गुढीपाडवा :**

गुढीपाडवा हा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा अत्यंत महत्त्वाचा जिव्हाळ्याचा सण असून या सणापासून शेतकरी आपल्या शेतीवर करावयाच्या कामाचे वर्षभराचे नियोजन ठरवतो. याच दिवशी शेतीवर काम करणाऱ्या सालगड्यांचे वर्ष ठरवले जाते. हा सण अत्यंत उत्साह आनंदात साजरा करून या सणापासून काळ्या मायभूमीची सेवा करण्याची जणू शेतकरी प्रतिज्ञाच करतात. या सणाला अनन्यसाधारण महत्त्व ग्रामीण भागात आहे. या सणानिमित्त विभागीय केंद्र लातूरच्या वतीने शेतकऱ्यांच्या त्यांच्या गावी घरी जावून कोनासा घेण्यात येतो व त्यांच्या आनंदोत्सवात सहभागी होता येते.

गुरूवार दि. १४/०४/२०११ रोजी भारत देशाच्या घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त हिंगोली येथे प्रा. डॉ. एस. बी. भाकरे यांचे भारताच्या नवनिर्मितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. उत्तमराव सूर्यवंशी हे होते. कार्यक्रमाच्या शेवटी विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी या कार्यक्रमाला सहकार्य करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे व उपस्थितांचे आभार मानले.

**भारतीय राज्यघटना व सद्यस्थिती :**

बुधवार दि. २०/०४/२०११ खानापूर जि. हिंगोली येथे प्रा. डॉ. व्ही. एन. इंगोले यांचे या विषयावर व्याख्यान झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे सचिव मा. हरिभाऊ जवळगे हे होते. याप्रसंगी मुख्याध्यापक श्री. संजय टाकळगव्हाणकर व प्रा. उत्तमराव सूर्यवंशी यांनी आपले मौलिक विचार मांडले. अध्यक्ष समारोपात श्री. हरिभाऊ जवळगे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आपल्या देशावर अनंत उपकार आहेत कारण, त्यांनी भारतीय घटना जगातील आगळीवेगळी घटना तयार केली असा आनंद शेवटी मुख्याध्यापक पवार यांनी सर्वांचे आभार मानले.

**महाराष्ट्र दिन :**

१ मे २०११ रोजी महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन साजरा करण्यात आला. यादिवशी सकाळच्या सत्रात महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सवाच्या सांगता समारंभात गेल्या वर्षभरात महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सवानिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने घेतलेल्या कार्यक्रमाचा आढावा विभागीय केंद्राचे सचिव मा. श्री. हरिभाऊ जवळगे व विभागीय केंद्राचे सदस्य प्रा. उत्तमराव सूर्यवंशी यांनी घेतला. महाराष्ट्र दिनाबद्दल प्रा. ए. डी. जाधव, प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख यांनी आपले विचार मांडले.

दुपारच्या सत्रात थोर स्वातंत्र्यसेनानी व कामगार नेते मा. श्री. मुरगप्पा खुमसे यांनी व इतर मान्यवरांनी मौलिक मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. एस. टी. लोखंडे हे होते. विभागीय केंद्राचे सदस्य प्राचार्य डॉ. रमेशराव दापके यांनी सर्वांचे आभार मानले. **रविवार दि. ०८/०५/२०११ रोजी शिऊर, ता.जि.लातूर** येथे पार पडणाऱ्या सामुदायिक विवाह सोहळ्याबद्दल येथील गावकऱ्यांबरोबर विभागीय केंद्राच्या वतीने विभागीय केंद्राच्या वतीने चर्चा करून या सामुहिक विवाह सोहळ्यात सहभागी होण्याचे ठरविण्यात आले.

**सामुदायिक विवाह सोहळा :**

रविवार दि. १५/०५/२०११

सध्याची जीवघेणी महागाई, वाढती लोकसंख्या, आजच्या तरुणातील फोफावत असलेला चंगळवाद, सर्वांकडे सामुदायिक व सार्वजनिक कामासाठी असलेला वेळेचा अभाव, बदलते ऋतुमान, पूर्वी होती तशी आता एकमेकाबद्दल सहकार्य जिव्हाळा प्रेमाची दुरावत असलेली भावना, सर्व जातीपंथातील सर्व स्तरातील जनता जनार्दनाचे अस्थिर जीवन अशा अवस्थेत सामुदायिक विवाह होणे गरजेचे आहे. हे सर्वच विवाह सोहळे घाईगर्दीत न उरकता किंवा पंचांग, ज्योतिष, हातरेषा जात पंथ यात पंथ यात वेळ न जाऊ देता विवाहपूर्वी वधूवराची आरोग्य तपासणी/एचआयव्ही तपासणी होणे त्या नववधूवराच्या व समाजाच्या दृष्टीने काळाची गरज आहे, असे भावनोत्कट उद्गार शिऊर ता. जि. लातूरचे सचिव मा. श्री. हरिभाऊ जवळगे यांनी विभागीय केंद्राच्या वतीने नववधूवरांचा सत्कार व त्यांना शुभाशिर्वाद देताना काढले. ते पुढे म्हणाले की, या लग्नसोहळ्यात रोज मोलमजुरी करणारे, तर राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्रा.सचिन सूर्यवंशी यांच्यासारखे वधूवर आहेत हे आनंददायी चित्र तरुणांनी निर्माण केले आहे. या चांगल्या उपक्रमाबद्दल आम्ही सर्व वधूवरांना विभागीय केंद्राचे पदाधिकारी व सदस्य अंतःकरणपूर्वक आशिर्वाद देतोय.

**बौद्ध पौर्णिमा :** मंगळवार दि. १७/०२/२०११ :

बौद्ध पौर्णिमेनिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने गौतम बुद्धांचे विचार या विषयावर लातूर येथे परिसंवाद आयोजित करण्यात आलेला होता. या परिसंवादात प्रा. डॉ. एस. बी. कुलकर्णी, जे. डी.देऊळगावकर, राजू गायकवाड इ. मान्यवरांनी गौतम बुद्धाबद्दलचे विचार मांडले. गौतम बुद्धांचे प्रेमाने जग जिंकण्याचे विचार या परिसंवादातून सर्वांच्या तोंडून ऐकावयास मिळाले.

**बैठक :**

११/०६/२०११ मातृदेवो भवः पितृदेवो भवः

१२/०६/२०११ नांदेड येथील कार्यक्रम योगप्रवर्तक यशवंतराव चव्हाण यांचे शेती व सहकारविषय विचार

१७/०६/२०११ राजमाता जिजाऊ स्मृतीदिन निमित्त कार्यक्रम

२६/०६/२०११ राजर्षी शाहू महाराज जयंती

३०/०६/२०११ राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनावर व्याख्यान

**यशवंतराव चव्हाण युगप्रवर्तक या विषयावर व्याख्यानमाला :**

दि. १२/०६/२०११ रोजी यशवंतराव चव्हाण यांच्या विचाराच्या प्रचार प्रसर म्हणून नांदेड येथील लालबहादूर शास्त्री सभागृहात युगप्रवर्तक यशवंतराव चव्हाण या विषयावर अनेक वक्त्यांनी आपले विचार मांडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. इंगोले हे होते तर उत्तमराव सूर्यवंशी, प्रा. एस. जी. कुलकर्णी इ. उपस्थित होते.

**राजमाता जिजाऊ स्मृतिदिन :**

विभागीय केंद्राच्या वतीने लातूर येथे विभागीय केंद्र कार्यालयात आजचे स्त्रीजीवन या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या चर्चासत्रात प्राध्यापिका एस.जी.हरोसकर, प्राध्यापिका पी.टी.कुलकर्णी, प्राचार्य डॉ. कुसुमताई पवार इ. नी आपला सहभाग नोंदवला.

लातूर येथील राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळ्यास विभागीय केंद्राच्या वतीने विनम्र अभिवादन करून तेथील उपस्थितांना दि. ३०/०६/२०११ रोजी लोकराजा शाहू महाराज यांच्या जीवनावर विभागीय केंद्राच्या वतीने महाराष्ट्रातील प्रसिद्ध व्याख्याते डॉ. सोमनाथ रोडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आल्याचे सांगण्यात आले. ही बातमी सर्व वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आली.

**महर्षी शाहू महाराज व्याख्यानमाला :**

प्राचीन व मध्ययुगीन काळात भारतात व जगात राजेशाही होती. राजेशाहीमध्ये 'राजा बोले नि दल हाले' या पद्धतीने कारभार चाले. प्राचीन काळातही सम्राट अशोक, राजा हर्ष यांच्यासारखे लोककल्याणकारी राजे होवून गेले. मध्ययुगीन काळात भारतात छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य निर्माण करून एक आदर्श घालून दिला. छत्रपती शिवाजी महाराज खऱ्या अर्थाने उपभोगशून्य स्वामी होते. १९ व्या व २० व्या शतकाच्या प्रारंभी राजर्षी शाहू महाराजांनी शिवछत्रपतीच्या संकल्पनेतील रयतेचे राज्य स्थापन केले. शाहू महाराजांना लोकराजा म्हणून ओळखला. कारण १०० वर्षापूर्वी राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात जनहिताचे, दलित उद्धाराचे अनेक निर्णय घेतले. राजघराण्याच्या माध्यमातून सत्ता व संपत्ती त्यांच्या पायात लोळत होती परंतु त्यात न रमता लोककल्याणाच्या कार्यातच शाहू महाराज रममाण झाल्याचे दिसून येते. शाहू महाराजांनी हयातभर खपून मानवी धर्माचा, समतेच्या तत्त्वाचा पुरस्कार केला.

असे प्रकट विचार परवा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र लातूरच्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीप्रित्यर्थ ज्ञानेश्वर ज्यू. कॉलेज, लातूर येथील कार्यक्रमात शाहू महाराजांनी स्वातंत्र्यपूर्व काळात समाजउद्धारासाठी पाहिलेले कृतीयुक्त स्वप्न या विषयावर आपल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानातून प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांनी काढले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष खा. डॉ. जनार्दन वाघमारे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव मा. श्री. हरिभाऊ जवळगे यांनी केले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना खा. डॉ. जनार्दन वाघमारे म्हणाले की, राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या क्रांतीकारक कार्यातून एक लोकपर्व निर्माण केले. एक महान कल्पक व दृष्टा लोकराजा म्हणून राजर्षी शाहू महाराजाचे चरित्र स्मरणीय असेच आहे. शाहू महाराजांनी १०० वर्षापूर्वी घेतलेला ५० टक्के आरक्षणाचा मुद्दा हा परिवर्तनशील विचाराचा महत्त्वपूर्ण गाभा होय. इतिहासाला कलाटणी देणारे कार्य शाहू महाराजांनी केले. म्हणूनच आपण राजर्षी शाहूच्या वाटेने जाण्या प्रयत्न करावा असे आवाहन शेवटी खा. डॉ. वाघमारे सरांनी केले. या कार्यक्रमाला शहरातील विविध स्तरातील नागरिक, प्राध्यापक, शिक्षक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात व्यासपीठावरील प्रमुख उपस्थितात जेष्ठ विधीज्ञ अॅड. मनोहरराव गोमारे, के. ए. हरिदास, सूर्यकांत वैद्य, सुधाकरराव देशमुख, प्रा. धाराशिवे, प्रा. कांबळे सर इ. मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य शिवाजीराव माडे यांनी विभागीय केंद्राच्या वतीने सर्व पाहुण्यांचे व उपस्थितांचे आभार मानले.

**डॉक्टर्स डे :**

शुक्रवार दि. १ जुलै २०११ रोजी औसा जि. लातूर येथील प्रसिद्ध डॉ. असलम अरब हे गरीबाचे डॉक्टर म्हणून ओळखले जातात. या डॉक्टरचा सत्कार विभागीय केंद्राच्या वतीने १ जुलै म्हणजे डॉक्टरांच्या सत्काराचा दिवस यादिवशी त्यांचा ह्दयस्पर्शी सत्कार औसा येथे त्यांच्या निवासस्थानी जावून विभागीय केंद्राचे सचिव मा. श्री. हरिभाऊ जवळगे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी डॉ. अरब यांचे जिवाभावाचे मित्र व औसा तालुक्याला एक निश्पृह व्यक्तीमत्त्व म्हणून परिचय असलेले माजी आमदार शिवशरणप्पा उटगे हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. भगीरथराव पाटील व मा. श्री कुमारजी देशमुख इ. मान्यवर मंडळी उपस्थित होते. याप्रसंगी या सत्काराला उत्तर देताना डॉ. अरब म्हणाले की, आमच्या व्यवसायात चुकीच्या पद्धतीने पैसे कमवता येतात. कारण, ज्यांचा या बाबतीत अनभिज्ञ असते. विशेषतः आजारी पडलेला माणूस यांना काहीच सुचत नसते. आम्ही मेडिकल कॉलेजमध्ये शिकत असताना आम्हाला सेवाभावीवृत्तीचे प्राध्यापक होते. ते नेहमी सांगत की, तुम्ही तुमचे रूप ईश्वराचे रुप असे तुम्ही समाजामध्ये कशा पद्धतीने जीवन जगता यावरच तुमचे यश अवलंबून आहे. आज जो सत्कार होत आहे तो यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने चालणाऱ्या एका मोठ्या संस्थेच्या वतीने होतो आहे. आणि आज योगायोग म्हणजे शुक्रवार दि.१ जुलै हा आम्हा मुस्लिम बांधवाचा प्रार्थनेचा दिवस असतो. यादिवशी मला विभागीय केंद्राच्या वतीने विभागीय केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे यांनी पांघरू घातलेली ही उबदार शाल मला माझ्या जीवनात खूप काही सांगून जाईल. माझा व्यवसाय मी खूपच तळागाळातल्या लोकांपर्यंत नेण्याचा प्रयत्न करेन. यावेळी प्राचार्य डॉ. रमेशराव दापके यांनी सर्वांचे आभार मानले.

**गुरूपौर्णिमा :**

१५ जुलै गुरूवार

सकाळी गुरूपौर्णिमेनिमित्त आजच्या जीवनात आदर्श शिक्षक म्हणून ज्या मान्यवर मंडळींनी आपल्या व्यवसायात नावलौकिक मिळवला आहे अशा शिक्षक बांधवाचा विभागीय केंद्राच्या वतीने सत्कार करण्यात आला. या सत्कारप्रसंगी दयानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वामनराव पाटील यांनी आपले मौलिक विचार मांडले. ते म्हणाले की, सद्यस्थितीत शेतकरी आणि शिक्षकच या देशाला तारू शकेल. विभागीय केंद्राच्या वतीने गुरूपौर्णिमेचे औचित्य साधून हा उपक्रम घडवून आणल्याबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

**श्रीमती साधनाताई आमटे यांना भावपूर्ण श्रद्धांजली :**

देशविदेशातील हजारो कुष्ठरोग्यांची मनोमन आपल्या हातून सेवा करणारे थोर समाजसेवक बाबा आमटे यांच्या पत्नी श्रीमती साधनाताई आमटे यांचे वृद्धापकाळाने आनंदवन जि. चंद्रपूर येथे निधन झाले. आमटे कुटुंबियाचे लातूरशी फार जवळचे संबंध होते ते आजही आहेत. या दुःखद प्रसंगी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र आणि अंनिस जि. लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांना लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयात श्रद्धांजलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात अंनिसचे कार्यवाहक श्री. माधवराव बावगे, लातूर जिल्हाध्यक्ष प्राचार्य अनिरूद्ध जाधव इ. मान्यवरांनी श्रद्धांजली वाहली.

**ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत शेतकरी मेळावा :**

**२४ जुलै २०११ शेळगाव (गौरी) ता. नायगाव जि. नांदेड येथे**

ग्रामस्वच्छता अभियान शेळगाव (गौरी) या नावाने राष्ट्रपती व राज्य सरकारचे अनेक पारितोषिके पटकावली आहेत. गावात सिमेंट रस्ते, शाळा सभागृह, नळयोजना, जातीभेदाच्या भिंती पार करून उभी राहिलेली आंतरजातीय घरे, प्रत्येक घरी स्वच्छतागृह, महिलांसाठी स्वतंत्र कपडे धुण्याची सोय, व्यायामशाळा, वृक्ष व सार्वजनिक बाग आहेत. शेळगाव येथे शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला होता. प्रमुख वक्ते म्हणून खा. डॉ. जनार्दन वाघमारे हे होते. प्रमुख पाहुणे प्रा. उत्तमराव सूर्यवंशी व हरिभाऊ जवळगे हे होते. अध्यक्षस्थानी श्री. माधवराव पाटील शेळगावकर होते.

**क्रांतिदिन :**

९ ऑगस्ट २०११ रोजी विभागीय केंद्राच्या वतीने क्रांतीदिन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना बोलावून घेवून या दिनाचे महत्त्व विशद करण्यात आले.

**भारतीय स्वातंत्र्यदिन :**

१५ ऑगस्ट रोजी विभागीय केंद्राच्या वतीने भारतीय स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला.

शनिवार दि. १६ ऑगस्ट रोजी विभागीय केंद्राच्या वतीने महावीरांचा संदेश याविषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्राला अनेक मान्यवर मंडळींनी आपला सहभाग नोंदवला.

**शेतकरी मेळावा :**

पळसप ता. जि. उस्मानाबाद येथे दि. २२ ऑगस्ट २०११ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र लातूरच्या वतीने भव्य शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. विक्रमजी काळे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय केंद्राचे अध्यक्ष खा. डॉ. जनार्दन वाघमारे होते. या कार्यक्रमाचा विषय जैविक खते जनजागृती अभियान. सध्या रासायनिक खतामुळे आपली मायभूमी काळीमाता जमीनीचे नुकसान होत आहे. सेंद्रिय खते वापरणे किती गरजेचे आहे यावर प्रामुख्याने या शिबीरात चर्चा करण्यात आली. या शिबिरात प्रमुख पाहुणे खा. डॉ. जनार्दन वाघमारे म्हणाले, आज कोरडवाहू शेतकऱ्याची केविलवाणी स्थिती निर्माण झालेली आहे. निसर्गात झालेल्या आमुलाग्र बदलामुळे शेतकऱ्याच्या पदरी अमाप कष्ट करूनही काहीच मिळेनासे झाले आहे. त्यातून शेतीवर काम करणाऱ्या सालगडी, मजूर यांचा प्रश्न भेडसावत आहे. याबाबतीत रोजगार हमी योजनेवर काम करणारे मजूर शासनाने कायदा करून शेतीवर राबविण्यासाठी आपल्या शेतकरीबांधवाला सहकार्य केल्यास हा त्रास बराचसा कमी होईल. याबाबी लवकर होणे खूप गरजेचे आहे. अन्यथा हा शेती व्यवसाय कोणत्या बिकट अवस्थेत पोहचेल याची कल्पना करू शकत नाही. याप्रसंगी ग्यानदेव सुरवसे, बालाजी नवनाथ सरडे, विश्वास बप्पा लाकाळ, जगबहादूर पटेल इ. शेतीनिष्ठ शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून मा. श्री. अनिलजी काळे, प्रदिपजी लाकाळ, विश्वासजी लाकाळ, लक्ष्मणजी सरडे, शिवाजी सरडे, अॅड. तानाजी चौधरी यांची उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे उस्मानाबाद सदस्य प्राचार्य डॉ. रमेशराव दापके यांनी केले. तर सर्वांचे आभार विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी मानले.

१७ सप्टेंबर २०११ हा मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा दिन साजरा करण्यात येवून याप्रसंगी थोर स्वातंत्र्यसेनानी श्री. गोविंदराव लांडगे, एस.पी.बारबोले, नारायणराव सावंत इ. चा विभागीय केंद्राच्या वतीने सत्कार करण्यात आला.

**गावपांढरी कादंबरीवर चर्चासत्र :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र लातूरच्या वतीने दि.२४/०९/२०११ रोजी प्रा. महेश मोरे लिखित गावपांढरी या कादंबरीवर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार सुधाकरराव डोईफडे होते, प्रमुख वक्ते म्हणून खा. डॉ. जनार्दन वाघमारे व प्रा. इंद्रजित भालेराव होते. याप्रसंगी बोलताना डॉ. वाघमारे म्हणाले, गावपंढरी ही कादंबरी संपूर्ण ग्रामीण भाषेत असल्याने वाचकांच्या मनाची पकड घेते. मराठवाडी बोलीचा वापर केल्यामुळे तत्कालीन हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील खेड्याचे चित्र नजरेसमोर येते. या कादंबरीचा मूळ नायक गाव असून हे तिचे वैशिष्ट्ये आहे. प्रा. इंद्रजित भालेराव व प्रकाशक श्रीकांत उमरीकर यांची भाषणे झाली. प्रा. महेश मोरे यांनी या कादंबरीमागील प्रेरणा विषद केली. प्रास्ताविक उत्तमराव सूर्यवंशी यांनी केले. आभार हरिभाऊ जवळगे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी साहित्यिक, विद्यार्थी, प्राध्यापक, महिला व स्वातंत्र्यसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ज्येष्ठ नागरिक दिन :**

२ ऑक्टोबर २०११

विभागीय केंद्राच्या वतीने ज्येष्ठ नागरिक आनंद महोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी अॅड. नारायणराव पाटील, अॅड. कमलाकररावजी कुलकर्णी, डॉ. एस.जी साबदे, श्रीमती मिनाताई जाधव इ. जेष्ठ नागरिकांचा या आनंदोत्सवात सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अॅड. कमलाकर कुलकर्णी, प्रमुख पाहुणे म्हणून अॅड नारायणराव पाटील यांची उपस्थिती होती. याप्रसंगी अॅड. कमलाकर कुलकर्णी म्हणाले, सर्व स्तरातील जेष्ठांच्या समस्या असतातच, पण त्या आगळ्यावेगळ्या पद्धतीने आपल्या निरीक्षणास येतात. आपण आपले जीवन हे या वयात कशा पद्धतीने व्यतित करणार आहोत हे ज्या त्या जेष्ठ नागरिकांवर अवलंबून असते. या वयात निराश न होता आहे त्या स्थितीत घरातील घरगुती समस्यांकडे नकारात्मक दृष्टीने न पाहता त्या व्यतित कराव्यात. याप्रसंगी अॅड. नारायण पाटील यांनी जेष्ठांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सदस्य लातूरातील जेष्ठ विधिज्ञ अॅड. मनोहरराव गोमारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन हरिभाऊ जवळगे यांनी मानले.

❑❑❑

# Yashwantrao Chavan Pratishthan's Academy of Information Technology

Everyday one sees success stories in the media. New gadgets to make life simpler and more exciting are flooding the market. New millionaires and billionaires are the toast of the media. Behind almost every such success story is background of IT.

Several colleges and institutions provide courses in IT. Students who have undergone this training still struggle to get placed.

Yashwantrao Chavan Pratishthan's Academy of Information Technology conducted training for Students as well as the employees of different organizations which enable them to be successful in future, endeavors

**PG-Diploma in Advanced Computing (PG-DAC)**

1. DAC course is a 6 Months fulltime course. Students are admitted to the course on the basis of Common Entrance Test (CET). Free Common Entrance Test Training was provided by YCP's AIT. Technical abilities and HR Interview (stage II & III) are part of their admission procedure of DAC Course.
2. A Batch of the Advanced Computing Course August 2010 was concluded 05th February 2011 and 95% student were placed in good organizations.
3. DAC February 2011 batch started on 15th February 2011 and it would be concluding on 30th July, 2011. Placement for DAC February 2011 batch is about to start from July 2011.
4. Free common Entrance Test training was held on 18th June 2011; 33 students attended the training.
5. Common Entrance Test for DAC August 2011 batch was held on 21st May and 25th June 2011. 80 students appeared for the CET from our center.

**Basic Computer Training and Animation Courses.**

6. Diploma In Information Technology is a three months part-time Course. This course helps candidates to get introduction to Computers as well as it helps to understand Office Automation Tools.
7. Special Summer Vacation batch was held in month of March and April 2011 and we got good response for these batches. S.S.C. and H.S.C. candidates applied for these courses.
8. Diploma In Multimedia Creation is a Four months part-time course. Six Batches of the Diploma in Multimedia Creations (DMC) course were conducted.
9. As per the students request, YCP's AIT conducted Special Summer Vacation batches for school students. Weekend batches for the students and working professionals were also conducted. The response to this training is good.
10. YCP's AIT conducted a course, Certificate course In Multimedia Creations (CCMC) for four months. This course was specially conducted for working professionals.
11. YCP's AIT conducted special KIDS batches in the Summer Vacation for basic and Multimedia Creation. There was good response from School children.

**PG Diploma In Advanced Computer ARTS (DACA)**

12. DACA course is a 6 months full-time course. Students will be admitted to the course on the basis

of Common Entrance Test (CET). Free Common Entrance Test Training was provided by YCP's AIT. Technical abilities and HR Interview (stage II & III) are part of the admission procedure for the DACA Course.

13. The batch was started on 15th February and is concluding on 30th July 2011.

**Certificate Course in Programming Using "c"**

14. A Special Course Certificate Course in Programming using 'C' (CCPC). It was launched by YCP's AIT for students who are interested to improve their knowledge of C language. Six batches were conducted for this course.

15. YCP's AIT conducted Free CCPC (PRE DAC) course for preparing students for the DAC CET. 33 students were admitted for this course.

16. As per the students request YCP's AIT conducted Modular Courses for Basic, Power Point, Photoshop and Flash.

**Corporate Training**

17. YCP's AIT conducted 2 batches of Certificate Course in System Admin. (CSA) for Maharashtra State Co-operative Bank in the month of March 2011.

18. A batch for Certificate course in Computer Operating was specially conducted for Intelligence Bureau (SIB)

19. A batch for Certificate course In Network Administration was conducted for the employees of the Maharshtra State Co-operative Bank in the month of June 2011.

20. A batch for Certificate Course in Database Technologies was conducted for the employees of the Maharashtra State Co-operative Bank in the month of June 2011.

**Free Workshop conducted by YCP's AIT:**

21. A presentation for PG-DAC and PG DACA course was held on 12th March 2011 at S.N.D.T. College and 30 students attended.

22. Free Multicore programming workshop (Guest Lecture) was held on 26th March 2011. We got good response.

23. YCP's AIT made presentations for PG-DAC course to colleges at Gwalior between 04th June 11th June 2011. Colleges names are follows:-

a) Maharana Pratap College of Technology

b) Madhav College of Engineering

c) Gwalior Engineering College

d) NRI Institute of Technology

24. YCP's AIT participated in the Vision career fair under the Pawar Charitable Trust, Mumbai and Navyuva Maharashtra Abhiyan, at Thane on 13th, 14th and 15th May 2011 and Badlapur on 20th, 21th and 22nd May 2011. We got good response.

25. YCP's AIT participated in Mumbai Education Festival at Ravindra Natya Mandir on 2nd, 3rd and 4th June 2011.

26. Cybage HR Head Mr. Elston Pimenta visited YCP on 25th June 2011. He talked with DAC students as well as DAC CET candidates.

27. We are in the touch with students with the help of social networking site www.facebook.com.

28. All the updates are available on our website: www.ycpait.org.

**Training**

29. Centralized Course End Examination (CCEE) for DAC February 2011 batch was conducted on 09th July 2011, for 151students.

30. The PG-DAC and PG-DACA courses, which had started on 15th February 2011, were concluded on 30th July 2011.

31. The selection process for PG-DAC Course for August 2011 batch was conducted between

25th to 29th July 2011. 134 students opted for admission to our center. We offered admission to 120 students.

32. PG-DAC course for August 2011 batch was started on 16th August 2011.

33. FREE training for Common Entrance Test (CET) and Stage 2 & 3 Selection process of PG DAC August 2011 batch was conducted from 12th to 21st July 2011. We got good response for this training.

34. Schedule for PG-DAC for February 2012 batch will be shortly announced. The preparatory course for the Common Entrance Test was started on 20th September 2011.

35. As per the students requirements we conducted training for Basic computers and the basic multimedia creations (Animations).

36. Certificate Course in Computer Operations was conducted for SIB. New batches are awaited.

37. The examination for Maharashtra State Security Council was conducted on 06th August 2011 under the supervision of YCP's AIT. 121 candidates participated for the same.

38. YCP's AIT announces Diwali and Christmas Vacation Batches for Kids. In Kids course we focus on the Basic Computers and Multimedia Creations. Kids are very much encouraged by our ANIMATION sessions.

39. A Career Seminar will be held in November 2011 for aspiring graduates.

40. A workshop on up-coming technology is also planned in Month of November 2011.

41. Examination for ESIC would take place in the month of December 2011.

FORTH COMING EVENTS

42. Launching of a C-DAC certified HIGH PERFORMANCE COMPUTING PROFESSIONAL CERTIFICA nON PROGRAMME (CCHPCP) as a prometric testing center.

43. Online examination process with TCS for various prestigious corporates I PSU s.

44. Seminar on CLOUD computing.

45. Senior Citizens' program on 23 Oct. 2011.

46. Centralized id Course Examination (CMCE) for PG-DAC August 2011 batch will be conducted on 29th and 30th October 2011. 106 students are appearing for the same.

❑❑❑

# भावपूर्ण श्रद्धांजली

## मा. ज्ञानेश्वर खैरे

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे संस्थापक सदस्य माजी विश्वस्त, प्रतिष्ठान विभागीय केंद्र, पुणे यांचे माजी अध्यक्ष, कृषी व सहकार व्यासपीठाचे माजी निमंत्रक व माजी आमदार मा. ज्ञानेश्वर खैरे याचे शनिवार दिनांक ३० एप्रिल २०११ रोजी वयाच्या ७९ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.

मा. ज्ञानेश्वर खैरे यांचा जन्म कोडीत, तालुका-पुरंदर, जिल्हा पुणे येथे ३० नोव्हेंबर १९३१ रोजी झाला. त्यांनी बी.ए., बी.कॉम आणि एल.एल.बी. या पदव्या संपादन केलेल्या होत्या. या काळातच ते मा. यशवंतराव चव्हाण यांच्या सहवासात आले.

मा. खैरे सन १९६२ व १९७२ या कालावधीत पुरंदर विधानसभा मतदार संघातून विधान सभेवर निवडून गेले. त्यांची अभ्यासू लोकप्रतिनिधी अशी ख्याती असल्याने मा. यशवंतराव व मा. वसंतराव नाईक यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात शासनाच्या विविध समित्यांवर त्यांनी काम केले. पुरंदर तालुक्यामध्ये लघुपाटबंधारे प्रकल्पांतर्गत नाझरे, गराडे, पिलाणवाडी, माहूर येथे त्यांच्या प्रयत्नांमुळे धरणांची निर्मिती झाली.

मा. ज्ञानेश्वर खैरे हे भूविकास बँक, सांगली बँक व महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे संचालक होते. तसेच विशाल सह्याद्री ट्रस्टचे विश्वस्त होते. त्यांनी पुरंदर तालुक्यामध्ये श्रीनाथ शिक्षण प्रसारक मंडळ या शैक्षणिक संस्थेची स्थापना करुन कोडीत व चांबळी येथे माध्यमिक शाळा सुरु केल्या.

मा. ज्ञानेश्वर खैरे यांचा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या स्थापनेपासूनच प्रतिष्ठानच्या सर्वच कामात सक्रिय सहभाग होता. विशेषत: त्यांनी कृषी व सहकार व्यासपीठाच्या वतीने राष्ट्रीय व राज्यस्तरीय परिषदा घेऊन कृषी व सहकार या क्षेत्राच्या कामकाजामध्ये व धोरणामध्ये आमूलाग्र बदल करण्याचे मसुदे तयार करुन शासनास सादर केले होते. प्रतिष्ठानच्या सर्व कामात वेळ देऊन कामकाजात ते तत्परतेने भाग घेत असत. तसेच त्यांनी पुणे विभागीय केंद्राच्या अध्यक्षपदाच्या काळात उल्लेखनीय काम करुन प्रतिष्ठानला नावलौकीक वाढविण्याचे मोलाचे काम केले आहे.

त्यांच्या निधनाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईने एक दूरदृष्टी असलेले व कर्तृत्ववान व्यक्तिमत्व गमावले आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.

◆◆◆

## मा. बी. बी. मोरे

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे आजीव सदस्य मा. बी.बी. मोरे यांचे दिनांक १५.३.२०११ रोजी निधन झाले. मा. मोरे हे ठाणे महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते होते. तसेच ते आदर्श विकास मंडळाचे संस्थापक अध्यक्ष होते. त्यांचा ठाण्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक व क्रीडा आदी क्षेत्रांत जवळचा संबंध होता. मा. मोरे यांची एक अभ्यासू नगरसेवक म्हणून ओळख होती. त्यांची विरोधी पक्षनेते म्हणून कारकीर्द गाजली होती. त्यांच्या निधनाने प्रतिष्ठानने एक हितचिंतक गमावला आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.

# प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने :

| | | किंमत रुपये |
|---|---|---|
| ०१. | यशवंतराव चव्हाण : विधिमंडळातील निवडक मराठी भाषणे - भाग १<br>संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २००.०० |
| ०२. | वाय. बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस-विधिमंडळ - भाग २<br>संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ०३. | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट-वाय. बी. चव्हाण - खंड १ ते ४<br>संपादन : राम प्रधान | प्रत्येकी २५०.०० |
| ०४. | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन - ना. धों. महानोर | ३.५० |
| ०५. | सह्याद्रीचे वारे - यशवंतराव चव्हाण | ३०.०० |
| ०६. | म. जोतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन - प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ०७. | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास - संपादक - वि. स. पागे | ३५.०० |
| ०८. | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन - संपादन - अण्णासाहेब शिंदे | ६०.०० |
| ०९. | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन - शरदराव पवार - भाषणसंग्रह - संपादन - दादासाहेब रूपवते | ७५.०० |
| १०. | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास - संपादन पी. बी. पाटील | १००.०० |
| ११. | नवभारत : परिवर्तनाची दिशा - संपादन - पी. बी. पाटील | १००.०० |
| १२. | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास -<br>संशोधक /लेखक - लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३. | महिलांसंबंधीचे धोरण : स्वयंसिद्धतेकडे वाटचाल - डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४. | यशवंतराव चव्हाण - चरित्र - लेखक - अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५. | शब्दाचे सामर्थ्य - संपादन - राम प्रधान | ३७५.०० |
| १६. | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी)<br>(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७. | बाऊंटीफूल बनियन - डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र - खंड ४ (इंग्रजी) बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १८. | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९. | अजिंठा - (काव्यसंग्रह) लेखक - ना.धो. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०. | 'ई' बुक (मराठी/इंग्रजी) (यशवंत साहित्य/फोटो) | १५०.०० |
| २१. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २२. | शैक्षणिक गुणवत्ता : आव्हान आणि आवाहन | २००.०० |
| २३. | हवामान बदल आणि महाराष्ट्र | ५०.०० |
| २४. | उपक्रम: वेचक-वेधक - डॉ वसंत काळपांडे | १००.०० |
| २५. | स्त्री रत्न सावित्रीबाई फुले - श्रीनिवास भालेराव | २०.०० |
| २६. | स्त्रियांचे कायदे, आरोग्य आणि योजना - सुप्रिया सुळे | २०.०० |
| २७. | 'संवादिनी - सुप्रिया सुळे | २०.०० |
| २८. | Appraising Schools - डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००.०० |

# व्हिडिओ कॅसेट्स

- मी एस. एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट
- प्रवासी पक्षी : सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट
- पु. ल. वृत्तान्त : पु.ल. देशपांडे यांचा जीवनपट
  वरील चारही व्हिडिओ कॅसेट्सची निर्मिती दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी पार पाडली.
- कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शन - श्री. राम गबाले
- येस आय ॲम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट, दिग्दर्शन - विनय नेवाळकर
- 'बशर नवाज : ख्वाब, जिंदगी और मैं' माहीतीपट, दिग्दर्शक - जयप्रद देसाई
- 'जागर हा जाणीवांचा -----' लघुपट, दिग्दर्शक - चंद्रकांत कुलकर्णी

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
अपंग हक्क व विकास मंच
संचलित

# फिरते बहुविध अपंग पुनर्वसन केंद्र

संकल्पना : **सुप्रिया सुळे**



## उपलब्ध सुविधा

• अपंगत्वाची मोफत तपासणी • कृत्रिम अवयव व साधनांची निर्मिती
• श्रवण चाचणी (RHAS) • बुद्ध्यांक व अभिक्षमता चाचणी
• स्पीच आणि फिजिओथेरपी • बहुद्देशीय मोफत सल्ला व मार्गदर्शन केंद्र



















**लाभार्थी जिल्हे**

पुणे । सोलापूर । औरंगाबाद । धुळे । नंदुरबार । ठाणे
बीड । जळगाव । जालना । हिंगोली । वाशीम । परभणी । लातूर । नागपूर

**राज्यातील चौदा जिल्ह्यांमधील सुमारे ८५०० हून अधिक अपंग लाभार्थ्यांना केंद्राचा लाभ**

: सहकार्य :
**पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई । महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद**
www.supriyassule.com

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा...

## निमंत्रक : सुप्रिया सुळे

स्त्रीभ्रूणहत्येविरोधात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव ते पुणे

**युवती पदयात्रा व भव्य युवती परिषद**

२५ ते २८ ऑगस्ट २०११

www.supriyassule.com



- पदयात्रेत राज्यभरातील सुमारे एक हजार युवतींचा सहभाग
- युवती परिषदेला राज्यभरातून सुमारे पाच हजार युवतींची उपस्थिती
- अपंग व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलींचाही सहभाग
- ठीकठिकाणी पदयात्रेचे जल्लोषात स्वागत
- सर्व युवतींनी घेतली स्त्रीभ्रूणहत्या न करण्याची शपथ
- विविध संस्था, संघटना व राजकीय पक्षांतील मान्यवरांचा पदयात्रेत सहभाग व पाठिंबा

